२८३९
म. ग्रं. सं. ठाणे
विषय निबंध
सं. क्र. ५११
RFFBK-0004348

REFBK-0004348



प्रो० ना. सि. फडके,
एम्. ए.

किर्लोस्कर मासिकाची उत्कर्षमाला
पुष्प ११ वें

# आजचे तरुण स्त्रीपुरुष व त्यांजपुढील प्रश्न

लेखक— ना. सी. फडके एम्. ए.

प्रकाशक
किर्लोस्करवाडी प्रेस किर्लोस्करवाडी
(जि. सातारा, सं. औंध)

सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन

१९३१

किंमत १ रु.

## ४॥ रु. स दोन उत्कृष्ट मासिकें !

# किर्लोस्कर

या मासिकासारखा तुह्मांस स्फूर्तिदायक व उत्साहवर्धक साह्यकर्ता मित्र मिळणार नाहीं. दरमहा १ तारखेस प्रसिद्ध. वार्षिक. वर्गणी २ रु. व्ही. पी. नें २८९

# स्त्री

हें स्त्री वर्गास आवश्यक व उपयुक्त माहिती पुरवून त्यांचे भरपूर मनरंजन करितें. दरमहा १९ तारखेस प्रसिद्ध होतें. आजच वर्गणीदार व्हा !

वार्षिक वर्गणी ३ रु. व्ही. पी. नें ३८९

**किर्लोस्करवाडी प्रेस,**

किर्लोस्करवाडी ( जिल्हा सातारा )

१९३०--३१ च्या

अभूतपूर्व सत्याग्रह महायुद्धांत

ज्या

# तरुण स्त्री-पुरुषांनीं

हिंदभूमीची सेवा करतां करतां
आपले प्राण अर्पण केले

त्यांस

हें पुस्तक सद्गदित अंतःकरणानें
मी अर्पण करितों.

—

ना. सी. फडके

# अनुक्रमणिका


| प्रकरण | | पान |
|---|---|---|
| १ | संसार असार | १ |
| २ | तरुणांची मनोभूमिका | १४ |
| ३ | स्वार्थत्यागाची पूर्वतयारी | २९ |
| ४ | कर्तबगारी कशी वाढवावी ? | ४४ |
| ५ | आर्यसंस्कृतीचें बुजगावणें | ६१ |
| ६ | प्रापंचिक आनंदाची थोरवी | ७५ |
| ७ | वडील व तरुण यांच्यातील स्नेहभाव | ७९ |
| ८ | समाज व्यवस्थेंत प्रणयाचें स्थान | १०३ |
| ९ | विवाहाचें दिव्य | ११८ |
| १० | पतिपत्नींतील सुहृद्भाव | १३१ |
| ११ | समाजसेवेंतील रहस्य | १४४ |
| १२ | नामर्दांचा दयाघन | १५७ |

# आजचे तरुण स्त्रीपुरुष

# व

# त्यांजपुढील प्रश्न

## प्रकरण १ लें

## 'संसार असार ?'

प्रस्तुत लेखमाला हातीं घेतांना माझें मन क्षणभर कचरलें. वाटलें, कोणी विचारतील 'तुह्मी काय हो मोठे आजोबा लागून गेलांत कीं, तुह्मी वृद्धत्वाचा आव आणून आजच्या तरुण पिढीला उपदेशाच्या गोष्टी सांगू पाहतां ?' कोणी ह्मणतील 'काय हो, तुमचा हा चरित्रक्रम काय मोठा निर्दोष आहे तर तुह्मी तरुण पिढीपुढचे प्रश्न सोडवण्याचें अवसान आणावें ?' कोणी किंचित् तुच्छतापूर्वक हंसतील व ह्मणतील 'आतांशा ज्यानें उठावें त्यानें तरुण पिढीला उपदेशामृत पाजीत सुटावें; जणुं कांहीं तरुण पिढी ह्मणजे सगळ्या वक्त्यांची व लेखकांची हक्काची मिरा-

सच, तिला वेठीला धरावें आणि हवें तें चऱ्हाट हवा तितका वेळ वळावें ! '

पण या शंका मनांत आल्या व लगेच विरल्या. विचार केला, कीं हे आक्षेप मुळीं आपल्याला लागूंच पडत नाहींत. कारण पहिली गोष्ट अशी कीं तरुण पिढीपुढील अनेकविध प्रश्नांबद्दल जें कांहीं लिहावयाचें आपल्या मनांत आहे तें स्वतःकडे वयाचा किंवा ज्ञानाचा मोठेपणा घेऊन लिहिण्याचा आपला हेतूच मुळीं नाहीं. किंबहुना वक्ता आणि श्रोता यांमध्यें गुरुशिष्याचें नातें अंशतः तरी काल्पिल्याखेरीज व्याख्यान संभवतच नाहीं. हें जरी खरें असलें, तरी श्रोत्याहून अगदींच भिन्न भूमिकेवर वक्ता उभा असेल तर त्याचें वक्तृत्व अरण्यरुदनवत् होण्याचाच संभव फार अशी माझी स्वतःची समजूत आहे.

साठीच्या पलीकडे गेलेलीं वृद्ध माणसें नुकती मिसुर फुटलेल्या तरुण बांडांना हिताच्या चार गोष्टी सांगतात व शेवटीं निराशेनें उद्गारतात ' छे छे ! अलीकडचीं हीं पोरं साफ बहकलीं ! आमचं कांहीं सांगणं यांना पटतच नाहीं ! ' अशा वेळीं खरी गोष्ट अशी असते कीं हीं वृद्ध माणसें उपदेश करतात तो तत्त्वतः जरी वाईट नसला तरी तो करतांना तरुणांच्या तारुण्याची वृद्धांनीं आठवण ठेवलेली नसते. तरुणांविषयीं वृद्धांना कळकळ वाटते, काळजी वाटते,त्यांचें कल्याण व्हावें अशी त्यांची प्रामाणिक इच्छा असते. परंतु तरुणांशीं समरस होऊन मग त्यांच्या वागणुकींतील गुणदोष पाहिले पाहिजेत ही गोष्ट वृध्दांच्या सहसा ध्यानांत रहात नाहीं.

वृध्द माणसें असतात तीं संसाराच्या नदीचें गढूळ पाणी बऱ्या वाईट रीतीनें तोडून पलीकडच्या कांठावर जाऊन बसलेलीं असतात. पैलतीर गांठण्यासाठीं जीव तोडून हात टाकीत गेल्यामुळें त्यांना दम लागलेला असतो. पोहण्याच्या आनंदापेक्षां पोहण्याच्या श्रमाचीच जाणीव त्यांच्या मनांत अधिक ताजी असते. पाण्यांत उतरतांना ज्या अनंत रम्य कल्पना मनांत आल्या, ज्या अनेक रोमहर्षक अनुभवांची अपेक्षा मनांत उभी राहिली, पाण्याच्या गढूळ रंगानें आणि पाण्यांतील भोंवऱ्यांनीं साहसी बुध्दि डिवचली जाऊन पराक्रमाची जी गोड लालसा विद्युल्लहरीसारखी अंगभर थरारून गेली, त्या सर्वांचा त्यांना साहाजिकपणेंच विसर पडलेला असतो.

स्वत:चें जीर्ण शरीर त्यांना सगळ्यांत आधीं दिसत असतें व स्वत:च्या श्रान्त, गलित, निवलेल्या अंत:करणाचा अनुभव त्यांना सगळ्यांत जवळचा असतो. आपण ज्या कांठावरून पाण्यांत उडी घेतली त्या कांठावर उत्साहानें, उन्मादानें उभ्या राहिलेल्या तरुणांचीं मनें आणि शरीरें ताजीं तवानीं आहेत ही कल्पना त्यांना सुचत नाहीं. ते ज्या कांठावर कुडकुडत, भिजलेलें अंग कोरडें करीत, दांतखीळ वाजवीत उभे असतात तेथें भोंवतालचे सारेच लोक अनेक अर्थांनीं दांत पडलेल्या स्थितींत असलेले त्यांना दिसतात त्यामुळें तरुणांशीं समरस होऊन आपल्या अनुभवाचा फायदा देण्याची पात्रता त्यांच्या अंगीं रहात नाहीं.

वृद्धांनीं तरुणांस उपदेश करावा, तरुणांनीं त्याकडे लक्ष देऊं नये, व मग सबंध तरुण पिढी मर्यादेबाहेर गेली असें वाटून

वृध्दांनीं उसासे टाकावे हा जो प्रकार आपण नेहमीं पाहतों त्याचें बऱ्हंशीं कारण हें कीं वक्ता व श्रोता यांच्यांत वयाचें अंतर फार असतें, व त्यामुळें समरसाची व सहानुभूतीची भूमिकाच बनत नाहीं. या दृष्टीनें पाहतां मी वृद्ध नाहीं ही मला अनुकूल अशीच गोष्ट आहे. तरुणांशीं बोलतांना 'तुह्मी' असें दूरचें नातें दर्शविणारा शद्ब वापरण्या ऐवजीं 'आपण' असा जिव्हाळ्याचा शद्ब मला वापरतां येईल ही किती तरी आनंदाची गोष्ट होय!

संसारसरितेच्या पुरांत मीहि तरुणांप्रमाणें अलीकडल्या कांठाशींच पोहत आहे. थोड्या अंतरावर गेलों असलों तरी कांठावरच्या गुजगोष्टी मला ऐकूं येत आहेत व समजत आहेत. सारांश, प्रस्तुत विषयावर लिहितांना मी वृद्धत्वाचा आव आणीत नाहीं. इतकेंच नव्हे तर मीहि तरुणांपैकींच एक आहे ही माझ्या हेतूला अनुकूल अशीच एक गोष्ट आहे असें मी समजतों.

अर्थात् उंच व अंतरावर उभें राहून उपदेशामृताचें तुषार तरुणांवर टाकण्याचा जसा अभिनिवेश नाहीं, त्याचप्रमाणें स्वतःकडे सर्व गुणसंपन्नता घेण्याचें अवसानही माझ्या या प्रयत्नांत नाहीं. स्वतःच्या डोळ्यांतलें मुसळहि दिसत नाहीं या न्यायानें माझ्या जीवनक्रमांतील अवगुणस्थलें इतरांस अधिक स्पष्ट दिसत असतील. पण माझी मलाहि त्यांची अस्पष्ट कां होईना पण कल्पना आहे. तेव्हां मी जें कांहीं विवेचन करायचें योजलें आहे तें निवडक, जिव्हाळ्याच्या विषयांवर तरुणांशीं मनमोकळे-

पणानें विचारविनिमय करावयाच्या बुद्धीनेंच मी करणार आहे. येवढा प्रास्ताविक खुलासा वाचकांनीं अवश्य लक्षांत ठेवावा.

आजचे तरुण स्त्रीपुरुष व त्यांच्यापुढील प्रश्न असे शब्द मी मथळ्यादाखल सहज लिहून गेलों खरा, पण विषयाला प्रारंभ करतांना असें मनांत आल्याखेरीज रहात नाहीं कीं आमच्या तरुण स्त्रीपुरुषांत किती तरी मंडळी अशी आहेत, कीं त्यांच्या-पुढें मुळीं कांहीं प्रश्नच नाहींत. अमुक अमुक प्रश्नांचा मनाशीं नीट निकाल केल्याखेरीज आयुष्यक्रम सुव्यवस्थित होणें शक्य नाहीं ही जाणीव त्यांना कधीं शिवलेली दिसत नाहीं. फुलझाडा-वरचीं फुलें उमलतात व कोमेजतात त्याप्रमाणेंच आपण जीवि-ताच्या त्रिविध दशांतून काळ कंठायचा अशी त्यांची समजूत असते. नदीकांठच्या जुनाट वृक्षाची एखादी मोठी पारंबी लोंबत असावी व नदीचें पाणी सहजगत्या तिला चाटून जात असावें त्याप्रमाणें जीवनाच्या ओघांत ते अजाणता उभे असतात.

जन्माला यायचें व मरायचें हें जसें आपल्या बुद्धीवर, विचा-रावर किंवा योजनेवर अवलंबून नाहीं, तसेंच जगायचें कसें या-बद्दलहि आपण चिकित्सा करण्याचें कारण नाहीं असें हे लोक समजतात. जगतों ह्मणून जगायचें अशा बुद्धीनें ते राहतात. असे तरुण स्त्रीपुरुष एका दृष्टीनें सुखीहि असतील कदाचित्. नाहीं कसें ह्मणावें? पण त्या सुखाला जडावस्थेच्या सुप्तिसुखा-पेक्षां अधिक काय किंमत?

पण नवल असें कीं या सुप्तिसौख्यांत आमचीं किती तरी माणसें खुशाल पडलीं आहेत. ऐहिक जीवित ही कांहीं महत्वाची बाब आहे असें जणूं त्यांना वाटतच नाहीं. या जीवितासंबंधीं जे अनेक प्रश्न विचारवंतापुढें उभे राहणें अपरिहार्य आहे ते त्यांना कधीं स्वप्नांतहि जणूं दिसतच नाहींत; व दिसले तरी त्यांकडे भर दृष्टीनें पाहण्याचा ते कधीं धीरच करीत नाहींत. आळशावरून गंगा वहात जावी तद्वत् कालौघ त्यांच्यावरून वहात जातो.

ते तरुण होते व आतां ह्यातारे झाले हें वाटलें तर अमुक कालखंड संपला असा हिशोब धरण्यासाठीं तुह्मी ह्मणा. पण त्यांच्या वृत्तींत कोठलाच भेद तुह्मांला दिसत नाहीं. वार्धक्यांतच त्यांची मान नन्ना ह्मणेल असें नाहीं. तारुण्यांतहि ते प्रत्येक प्रश्नाला नन्नाच देत असतात. स्वतःच्या जीविताकडे त्यांनीं कधीं मोठया कौतुकानें व जिज्ञासेनें पाहिलेलेंच नसतें. बाह्य सृष्टि आणि अंतरात्मा या दोन्ही वस्तूंचा अद्भुत रम्यपणा त्यांच्या मनांत कधीं आलेला नसतो. सारांश, इहलोकीं जगणें म्हणजे एक अत्यंत चातुर्याचा, सात्विक ईर्षेचा व उल्हास व आनंद प्राप्त करून देणारा डाव आहे, हें न ओळखणारीं आमच्या तरुण पिढींत किती तरी माणसें आहेत.

ह्मणून तरुण पिढीला उद्देशून लिहावयाच्या या लेखमालेंत मला प्रथम हेंच दाखविलें पाहिजे कीं आयुष्य ह्मणजे शैथिल्यानें कशीबशी स्वीकारण्याची वस्तू नसून प्रत्येकानें आपापल्या बुद्धीनें, विचारानें, उद्योगानें व पराक्रमानें उज्वल आणि आनंददायी करण्याची वस्तू आहे.

तरुण स्त्रीपुरुषांनीं आधीं शैथिल्य टाकलें पाहिजे. तरुण पिढीपुढें उभे राहण्यासारखे प्रश्न कोणते कोणते आहेत याचा विचार करूं लागलें कीं, आधीं त्या विविध प्रश्नांची जाणीव बाळगण्याइतकीं आमचीं तरुण माणसें तरतरीत कशीं होतील व केव्हां होतील हा प्रश्नच लिहिणाऱ्यापुढें उभा राहतो. भूमितींतील सिद्धांताइतकाच या ऐहिक जीविताचा प्रश्न खुबीनें सोडविण्यांत गंमत आहे हें आमच्या तरुण स्त्रीपुरुषांनीं प्रथम लक्षांत ठेवलें पाहिजे.

एखाद्या सुंदर काव्यांतील हृदयंगम वर्णनस्थलाइतकीच या ऐहिक जीविताचा विचारपूर्वक अन्वयार्थ लावण्यांत मौज आहे हें त्यांनीं ओळखलें पाहिजे. हें न ओळखणाऱ्या स्त्रीला किंवा पुरुषाला खरें तारुण्य कधीं प्राप्तच झालें नाहीं असें मी समजेन. कॉलेजांत शिकणाऱ्या तरुणांचें मी सूक्ष्म अवलोकन केलें आहे. त्यांत कित्येक असे असतात कीं, ते ह्मणतात ‘ आह्मांला हजार भानगडींत पडून करायचं आहे काय? परीक्षा झाली न झाली त्याचीहि आह्मांला फारशी फिकीर नाहीं, अन् बाकीच्या दहा चळवळींत शिरायचं तर आह्मांला कांहींच कारण नाहीं. ’

अशा तरुणांना विचारावें ‘ कां हो अशी कां तुमची वैराग्य–वृत्ति ? ’

कीं ते उत्तर देतात ‘ सर, आह्मांला घरचं कांहीं कमी नाहीं. ’

‘ असं कां ? किती आहे उत्पन्न ? ’

‘ आहे दोघां भावांत वर्षाचे चारशे रुपये वाटून घेण्या–इतकं ! ’

अशीं उत्तरें ऐकलीं कीं मला विस्मय व विषाद वाटतो. केवळ वर्षाकाठीं दोनशे रुपयांच्या आश्वासनानें या तरुणाच्या तारुण्या-वर पाणी पडावें हें केवढें आश्चर्य ! जीविताची ही किती अनु-कंपनीय कोती कल्पना !

पण असे तरुण स्त्रीपुरुष आपल्या समाजांत कितीतरी आहेत. भात आमटी खाऊन जगतां आलें ह्मणजे त्या जगण्याला 'जीवित' ह्मणायला आह्मी तयार आहोंत. राहायला घरटें आणि खायला चार दाणे या पक्षीकोटीच्या कल्पनेहून आमची आयुष्याची कल्पना फारशी उच्च नाहीं. या ऐहिक जीवितांत अखंड सौख्य प्राप्त करून घेणें शक्य आहे. हें आयुष्य सुखदुःखांची सरमिसळ आहे यांत संशयच नाहीं पण तसें असलें ह्मणून येणाऱ्या सुख–दुःखांच्या पायदळीं अजागळासारखें पडून राहणें वेगळें, आणि विचारपूर्वक सायीच्या जागीं उभें राहून दुःखाची वावटळ आणि सुखाच्या मंद सुगंध लहरी अंगावर घेणें वेगळें.

आमच्या तरुणांना मुळीं अजागळ वृत्तीची संवयच परंपरेनें जडलेली ! जीविताच्या जातिपुष्पांतून शक्य तितका सुवास पिळून काढून उपभोगावा हा विचारच त्यांना सहसा सुचत नाहीं. कोणी ह्मणतील ' अहो कसल्या जातिपुष्पाच्या आणि सुवासाच्या बाता मारताहांत ! देश पारतंत्र्यानें गांजलेला, दारिद्र्य जिकडे तिकडे पसरलेलें, नोकरी मागायला माणूस निघाला तर त्याच्या तळव्याला घट्टे पडल्याखेरीज त्याला महिना वीस पंचवीस चांदीचे तुकडे दिसत नाहींत ! आणि तुह्मी सांगताहांत तरुणांनीं जीविताविषयीं जिज्ञासा दाखवली पाहिजे ! चांगला न्याय ! '

ही विचारसरणी वरवर मोठी बिनतोड वाटते. पुष्कळ लोकांच्या तोंडून मी ती ऐकिली आहे. पण जरा खोल विचार केला तर ही विचारसरणी भ्रामक असल्याचें दिसून येईल. आपला देश स्वतंत्र नाहीं. कबूल. देश दरिद्री आहे. कबूल. पण या अडचणी कॉलेजांत शिकणाऱ्या तरुण स्त्री-पुरुषांना कशा काय जाचक होतात हें कळणें कठीण आहे. कोणाचाहि आधार नसतांना, शिकवणी किंवा कारकुनी करून स्वतःच्या पायावर उभें राहून अभ्यास करणारे तरुण कॉलेजांतील विद्यार्थ्यांत शेंकडा फार तर तीन चार सांपडतील. या कष्टाळू, स्वावलंबी विद्यार्थ्यांनीं देशाच्या दारिद्र्याविषयीं व पारतंत्र्याविषयीं रड गाऊन जीविताविषयीं शैथिल्य दाखविलें तर गोष्ट निराळी. पण गंमत अशी कीं हे तरुण सहसा रड गात नाहींत. संकटांशीं झगडण्यांत त्यांच्या अंगीं क्षात्रवृत्ति निर्माण झालेली असते व जीविताविषयीं चहूबाजूंनीं नीट विचार केला पाहिजे हें त्यांना पटतें.

या स्वकष्टांवर जगणाऱ्या विद्यार्थ्यांची गोष्ट सोडून दिली तर कॉलेजांत शिकणाऱ्या बाकीच्या तरुणांना देशाच्या पारतंत्र्याची व दारिद्र्याची झळ कशी व कोठें लागत असते हें समजणें कठीण आहे. त्यांचे पालक वाटेल तें करून त्यांच्या विद्यार्जनाची सोय करीत असतात. ते पालकांपासून दूर रहात असले तरी महिन्याच्या महिन्याला पोष्टाचा खाकी शिपाई ठरीव रक्कम त्यांच्या खोलींत आणून मोजीत असतो. ज्या शिक्षणसंस्थेंत ते शिकत असतात तेथें जिकडे तिकडे स्वातंत्र्याचें वातावरण भरलेलें असतें.

सारांश, विलायती नाजूक वेल इकडे लावायची झाली म्हणजे या देशच्या उष्ण हवेची झळ तिला लागूं नये म्हणून खास शीत-कुंजांत तिची लागवड व जोपासना करतात. तद्वत् देशाचें पार-तंत्र्य व दारिद्र्य यांचा स्पर्शहि कधीं होऊं नये अशा सुख-सोयींत बहुतेक तरुण स्त्रीपुरुषांचें शिक्षण चाललेलें असतें. मग अशा स्त्रीपुरुषांनीं जीविताची जिज्ञासा, आस्था, उत्सुकता दाखवूं नये हें कसें समर्थनीय ठरणार ?

मला वाटतें या स्त्रीपुरुषांच्या आंगीं शैथिल्य दिसतें याचें खरें कारण आम्हां हिंदूंची संसारविन्मुखेतची परंपरा हेंच आहे कीं काय कोण जाणे ! ऐहिक जीवित हें केवळ आभास होय असें मान-ण्याची संवय कित्येक पिढ्यानूपिढ्या आमच्या रोमरोमीं मुरली आहे. ऐहिक जीवितांत शक्य तेवढा आनंद उत्पन्न करावा अशी तीव्रताच आमच्या अंगीं नाहीं; व याचें कारण पारतंत्र्य नव्हे व दारिद्र्यही नव्हे.

तसें असतें तर आपल्या प्रत्येक शहरांतील सराफकट्ट्यांतल्या कोट्याधीश व्यापाऱ्यांची राहतीं घरें गौळवाड्याइतकीं गलिच्छ व कोंदट असलेलीं आढळतात, तशीं आढळलीं नसतीं आणि रेल्वे-च्या थर्ड क्लासांतील संडासाला टेंकून प्रवासांतली रात्र काढणारा प्राणी दुसऱ्या दिवशीं पहावा तों बाजारपेठेंत लाखों रुपयांची उलाढाल करतांना दिसतो तसा दिसला नसता. ऐहिक सुख-सोयींची किंमतच आम्हाला कळत नाहीं. इहलोकींच्या सुखांना क्षणभंगुर मानण्याचा वेदांती बोधाचा कित्ता आह्मी इतक्या विकृत रीतीनें वळविला आहे कीं, ऐहिक जीविताविषयीं सुव्यवस्थित

ग्रा. ११

विचार न करणें म्हणजेच धर्माचरण होय, अशी आमच्या समाजाची समजूत झाली आहे.

ऐहिक जीवन हेंच सर्वस्व नव्हे हें खरें. ऐहिकापलीकडे कांहीं तरी आहे यांत शंका नाहीं आणि त्या पारलौकिक हिताचा विचार मनांत बाळगला पाहिजे याबद्दलही वाद नाहीं; पण ऐहिक जीवित म्हणजे एकंदर सारें जीवित नसलें तरी त्या जीविताचा एक महत्वाचा भाग आहे हें तर खरें ? आणि एकंदर निश्रेयसाचा एक अंश या नात्यानें तर ऐहिक जीवित व्यवस्थित करण्याचें महत्व नाहींसें होत नाहीं ? पण हें विसरून आम्ही आमच्या ऐहिक जीविताकडे सर्वस्वीं विचारशून्य वृत्ति स्वीकारावयाला शिकलों आहोंत. परलोकाच्या निदिध्यासानें इहलोकाकडे आमचें लक्ष नाहींसें झालें आहे. आकाशांतल्या तारकांकडे पहात चालून विहिरींत पडणाऱ्या तत्त्वज्ञान्याप्रमाणें आमच्या समाजाची अवस्था झाली आहे.

ऐहिक जीवितांत काव्य उत्पन्न करून त्याचा उपभोग घेण्याच्या कलेकडे आमच्या समाजानें कधीं आस्थेनें लक्ष दिलेलेंच नाहीं आणि समाजाचा हा दोष आमच्या तरुणांच्या मनोवृत्तींत रोप धरून राहिलेला असल्यामुळेंच जीविताविषयीं शोधक बुद्धीनें विचार करण्याची व अवश्य त्या प्रश्नांची छाननी करण्याची तयारी तरुण स्त्रीपुरुषांच्या ठिकाणीं फारशी दिसून येत नाहीं.

म्हणून आम्ही तरुण स्त्रीपुरुषांनीं पहिली गोष्ट केली पाहिजे ती ही कीं, ऐहिक जीविताविषयीं औत्सुक्य व कळकळ बाळगिली पाहिजे. ऐहिक जीवित प्रसन्न, शक्य तेवढ्या सुखासमाधानाची

६४७८
२०१३२

प्राप्ति करून घेण्याचा आपल्यापैकीं प्रत्येकाला खचित अधिकार आहे व तसेंच शक्य तेवढें सात्विक सुखसमाधान इतरांस देण्याची जबाबदारीही आपल्यापैकीं प्रत्येकावर खचित आहे. पण या अधिकाराचा उपयोग व जबाबदारीचें परिपालन आपल्या हातून व्हावयास तरुण या नात्यानें आपल्यापुढें कोणकोणते प्रश्न उभे राहतात व ते आपण कशा रीतीनें सोडविले पाहिजेत याची आपल्याला शक्य तेवढी स्पष्ट व रेखीव कल्पना असली पाहिजे. ही नसल्यानें आपलें जें नुकसान होत आहे त्याला परिमिति नाहीं.

आंधळेपणानें वाट चालणें व डोळे उघडून वाट चालणें यांत केव्हांही अंतर असणारच. उघड्या डोळ्यानें वाट चाललें कीं ठेच लागणें शक्य नाहीं असें नाहीं, लागेल; पण ती लागतांनाही मनुष्य सावध राहील व तोल चटकन् सावरील. मात्र तरुण स्त्री-पुरुषांपुढील प्रश्नांबद्दल चर्चा करतांना 'तरुण' हा शब्द सर्वांत महत्वाचा आहे हें विसरतां कामा नये. हें विसरल्यानें वृद्धांनीं सद्धेतुपूर्वक केलेला उपदेश कसा वाया जातो तें प्रथमच मी दर्शविलें आहे. तरुण स्त्रीपुरुषांची नैसर्गिक मनोभूमिका कशी असते याचा पूर्ण विचार करून मगच त्यांजपुढील प्रश्नांचें विव-रण केलें पाहिजे.

कोणत्याही विषयाची उभारणी मानसशास्त्राच्या पायावरच झाली पाहिजे हें तत्व आतां विद्वन्मान्य झालेलें आहे. शिक्षण, व्यापार, राजकारण इत्यादि प्रत्येक विषयाचा विचार करतांना आधीं मानसशास्त्राचे सिद्धांत नजरेपुढें ठेवण्याचा आतां प्रघात पडला आहे. जीवित म्हणजे अनेक लहानमोठ्या प्रश्नांचा समु-

च्चय आहे. मनुष्याचें जीवित व्यक्तिव्यक्तींतील व्यवहारावांचून आणि कुटुंब, समाज, धर्म, राजसत्ता अशा संस्थांशीं त्यानें संलग्न झाल्यावांचून होत नाहीं. या व्यवहारांतून व 'संस्थां'तून असे अनेक प्रश्न उत्पन्न होतात कीं त्यांचा यथायोग्य विचार तरुण स्त्रीपुरुषांनां केलाच पाहिजे.

मात्र तो विचार यथायोग्य व्हावा यासाठीं तरुणांची मनोरचना उत्तम प्रकारें समजून घेतली पाहिजे व सतत लक्षांत ठेविली पाहिजे. म्हणून पुढील लेखांकांत तरुण स्त्रीपुरुषांच्या भावना, आकांक्षा, वासना, विचार, वृत्ति इत्यादींचें मानसशास्त्रदृष्ट्या विवेचन करण्याचें ठरवून हा उपोद्धात येथेंच संपवूं.

## प्रकरण २ रें

# तरुणांची मनोभूमिका

तरुण स्त्रीपुरुषांनीं अमुक बाबतींत अमुक प्रकारें वागणें इष्ट आहे किंवा तमुक प्रकारें वागणें अनिष्ट आहे असें ठरविण्यापूर्वी तरुणांची निसर्गप्राप्त मनोरचना कशी असते याचा शास्त्रशुद्ध विचार झाला पाहिजे, हें माझें म्हणणें कदाचित् कांहीं वाचकांस एकदम पटणार नाहीं. ते म्हणतील, नीतिनियम ठरवितांना मानसशास्त्राचा विचार कशाला पाहिजे? "वाडवडिलां सेवित जावें" असा शकुंतलेला उपदेश करण्यापूर्वी कण्वऋषींनीं मानसशास्त्र समजून घ्यावयास पाहिजे होतें कीं काय? किंवा विद्यार्जन संपवून घरीं निघालेल्या पांडुकुमारांस उपदेश करावयाच्या आधीं भीष्मद्रोणाचार्यांनीं मानसशास्त्राचे सिद्धांत लक्षांत घेतले नसल्यास ते वेडे ठरतील कीं काय?

तरुणांचीं कर्तव्यें खरें पाहतां उघड आहेत, आणि तरुणांच्या निसर्गसिद्ध मनोरचनेशीं त्यांचा संबंध जोडण्याचें कारण नाहीं. कर्तव्य झटलें कीं तें केलेंच पाहिजे. करणाराच्या मनांतल्या प्रवृत्तीवर तें अवलंबून ठेवून कसें चालेल? "सत्य सदा बोलावें" हा नियम खरा. बोलणाराला अमुक वेळीं तो मोडण्याची जोराची इच्छा झाली ह्मणून तो बदलतां थोडाच येणार आहे?

या ह्मणण्यांत थोडासा तथ्यांश असला तरी तें सर्वांशीं ग्राह्य मानतां येणार नाहीं. केवळ व्यक्तीव्यक्तींच्या क्षणिक लहरीवर नीतिनियम अवलंबून ठेवावे असें म्हणणें वाजवी होणार नाहीं.

पण तसें माझ्ं ह्मणणेंच नाहीं. त्याचप्रमाणें हेंहि मला मान्य आहे कीं, मानसशास्त्राची विशेष चिकित्सा न करतां, घालून देतां येतील असे कांहीं सामान्य, ढोबळ नीति-सिद्धांत आहेत. पण या दोन गोष्टी कबूल केल्यावरही तरुण स्त्रीपुरुषांच्या आजच्या विशिष्ट परिस्थितीचा व त्यांच्यापुढील प्रश्नांचा उहापोह करतांना, आणि तरुणांनीं कसें वागलें पाहिजे हें ठरवितांना मानसशास्त्रांतील कांहीं सिद्धान्त डोळ्यापुढें ठेवले पाहिजेत हें माझें ह्मणणें शिल्लक राहतेंच.

कारण असें कीं, कोंकणांतल्या जमिनीला उद्देशून जर आपण असा उपदेश करूं लागलों कीं ' बाई, तुला आपल्या मालकाचें खरें कल्याण व्हावें अशी कळकळ असेल तर भातासारखें भिकार पीक द्यावयाचें सोडून कापसाचें श्रीमंती पीक प्रसविणें तुझें कर्तव्य आहे, ' तर तो उपदेश कितपत सूज्ञपणाचा ठरेल ? किंवा वटवृक्षाला आपण सांगूं लागलों कीं ' बाबा, तूं दमल्याभागल्यांना छाया देतोस हें ठीक आहे, पण त्या जाईच्या वेलीकडे आणि द्राक्षवेलीकडे जरा पहा आणि त्यांच्यासारखीं सुवासिक पुष्पें आणि सुरस फळें धारण करण्याचा धडा शीक, ' तर आपलें हें सांगणें कितपत योग्य ठरेल ?

सारांश, जो निसर्गसिद्ध स्वभाव आहे त्यापलीकडे ध्येयभूत असें कांहीं नसावें या म्हणण्यांत जसा अर्थ नाहीं, त्याप्रमाणें निसर्गाचा विचार न करतां ध्येयाचा सांचा घालून त्या सांच्यांत निसर्गाला बलात्कारानें कोंबलेंच पाहिजे या म्हणण्यांतही अर्थ नाहीं. ध्येयाच्या जलसंचयावांचून मानवी व्यवहार रुक्ष आणि

# प्रकरण २ रें

# तरुणांची मनोभूमिका

तरुण स्त्रीपुरुषांनीं अमुक बाबतींत अमुक प्रकारें वागणें इष्ट आहे किंवा तमुक प्रकारें वागणें अनिष्ट आहे असें ठरविण्यापूर्वीं तरुणांची निसर्गप्राप्त मनोरचना कशी असते याचा शास्त्रशुद्ध विचार झाला पाहिजे, हें माझें म्हणणें कदाचित् कांहीं वाचकांस एकदम पटणार नाहीं. ते म्हणतील, नीतिनियम ठरवितांना मानसशास्त्राचा विचार कशाला पाहिजे? "वाडवडिलां सेवित जावें" असा शकुंतलेला उपदेश करण्यापूर्वीं कण्वऋषींनीं मानसशास्त्र समजून घ्यावयास पाहिजे होतें कीं काय? किंवा विद्यार्जन संपवून घरीं निघालेल्या पांडुकुमारांस उपदेश करावयाच्या आधीं भीष्मद्रोणाचार्यांनीं मानसशास्त्राचे सिद्धांत लक्षांत घेतले नसल्यास ते वेडे ठरतील कीं काय?

तरुणांचीं कर्तव्यें खरें पाहतां उघड आहेत, आणि तरुणांच्या निसर्गसिद्ध मनोरचनेशीं त्यांचा संबंध जोडण्याचें कारण नाहीं. कर्तव्य ह्मटलें कीं तें केलेंच पाहिजे. करणाराच्या मनांतल्या प्रवृत्तीवर तें अवलंबून ठेवून कसें चालेल? "सत्य सदा बोलावें" हा नियम खरा. बोलणाराला अमुक वेळीं तो मोडण्याची जोराची इच्छा झाली ह्मणून तो बदलतां थोडाच येणार आहे?

या ह्मणण्यांत थोडासा तथ्यांश असला तरी तें सर्वांशीं ग्राह्य मानतां येणार नाहीं. केवळ व्यक्तीव्यक्तींच्या क्षणिक लहरीवर नीतिनियम अवलंबून ठेवावे असें म्हणणें वाजवी होणार नाहीं.

खरें पहातां विचार, भावना व संकल्प हीं एकाच मानसिक क्रियेचीं तीन अंगें होत. मनुष्याच्या मनाची क्रिया घडत असली कीं विचार, भावना व संकल्प हे तिन्ही अंगभूत व्यापार कमी-अधिक प्रमाणांत चालू असतात. सर्वस्वीं संकल्पहीन किंवा सर्वस्वीं विचारशून्य किंवा भावनाविरहित अशी मानसिक क्रिया दाखवितां यावयाची नाहीं. इंद्रधनुष्याचा अगदीं लहानसा खंड जरी पाहिला तरी त्यांत जसे धनुष्यांतले सारे रंग दिसावयाचेच, किंवा भरजरीच्या शालूची बोटभर चिंधी कापून पाहिली तरी तिच्यांत जसे उभे आडवे चमकदार धागे दृष्टीस पडावयाचेच तसेंच विचार, भावना व संकल्प यांचें आहे. एकाच सूर्यकिरणाचीं तीन आरशांत तीन प्रतिबिंबें पडावीं व त्यांना सोयीसाठीं आपण तीन नांवें द्यावीं तशी विचार, भावना व संकल्प हीं सोयीसाठीं दिलेलीं वेगवेगळीं नांवें आहेत. वस्तुतः तीं एकाच मनोव्यापाराचीं अंगोपांगें होत.

मात्र, वेगवेगळ्या मनोव्यापारांत या तीन अंगभूत क्रियांचें प्रमाण वेगवेगळें असतें. एकाच माणसाच्या बाबतींत कधीं त्याच्या मनोव्यापारांत विचारांचा जोर अधिक दिसून येईल तर कधीं भावनांचा पूर उसळलेला दिसेल. तसेंच व्यक्तीव्यक्तींच्या मनोरचनेकडे पाहिलें तर एका व्यक्तीच्या मनोव्यापारावर नेहमींच विचाराची छाया अधिक दिसेल, तर दुसऱ्या व्यक्तीच्या मनोव्यापारावर भावनांचा पगडा अधिक दिसेल. याच दृष्टीनें समाजांतील निरनिराळ्या वर्गांकडेहि पाहतां येईल. अशिक्षित व सुशिक्षित, खेडवळ व नागर, स्त्री व पुरुष, गरीब व श्रीमंत असे जे समाजांत विविध वर्ग असतात त्या प्रत्येक वर्गाची मनोरचना

विचार, भावना किंवा संकल्प यांपैकीं कोणत्या तरी एका उपांगाच्या प्राधान्यानें विशिष्ट प्रकारची बनलेली असते.

याच न्यायानें एकाच हिंदुस्थानांतील निरनिराळ्या प्रांतांची मनोरचना निरनिराळ्या प्रकाराची आहे असें मानतां येतें. बंगाली लोक भावनाप्रधान आहेत, महाराष्ट्रांतील माणसें विचारप्रधान आहेत असें आपण नेहमीं म्हणतोंच कीं नाहीं ? इतकेंच काय, सबंध जगाच्या राजकारणाचा विचार करतांना निरनिराळ्या राष्ट्रांची तुलना करण्याची जेव्हां पाळी येते तेव्हां पाश्चात्य राष्ट्रांची अमुक एक विशिष्ट मनोरचना आहे व पौर्वात्य राष्ट्रांची मनोभूमिका अमुक एका विशिष्ट जातीची आहे असें मानावें लागतेंच कीं नाहीं ? ह्मणूनच तरुण स्त्रीपुरुषांचा एक स्वतंत्र वर्ग मानला ह्मणजे त्या वर्गाची एक स्वतंत्र, विशिष्ट मनोभूमिका आहे हें मानणें क्रमप्राप्तच आहे व त्या मनोभूमिकेचा विचार आपल्या प्रस्तुत विषयाच्या दृष्टीनें अत्यंत उपयुक्त व अत्यंत मनोरंजक ठरेल यांत संशय नाहीं.

## तरुणांची मनोभूमिका

या मनोभूमिकेचें विवरण करण्याचें मी योजिलें खरें, पण हें विवरण करणें सोपें कां आहे ? तरुणांची मनोभूमिका म्हणजे खरें पाहतां एक रम्य रहस्य होय. कवींनीं कितीहि काव्यें रचलीं किंवा कादंबऱ्या लिहिल्या तरी त्या रहस्याचा उलगडा होत नाहीं ! फक्त त्याच्या आकर्षकतेचा मनावर परिणाम होऊन वाचकांस एक अवर्णनीय आल्हाद होतो ! इतक्या विविध आणि

सूक्ष्म विचार विकारांच्या धाग्यांनीं तरुणांची मनोभूमिका बनलेली असते, कीं एक तर व्यवस्थित रीतीनें त्यांची गणना करणें अशक्य वाटतें आणि शिवाय पृथःकरणाच्या धक्क्यानें त्यांतले कांहीं नाजूक धागे तुटणार तर नाहींत ना अशी भीति वाटल्याशिवाय रहात नाहीं.

पण असें असूनही त्या मनोदधीचा थोडासा ठाव काढावयाचाच ह्मटलें तर पहिली गोष्ट दिसून येते ती ही कीं, त्यांत भावनांचा कल्लोळ अधिक असतो आणि विचार व संकल्प या दोन्ही क्रिया त्यांच्या तरंगावर वहात असतात. मनुष्याची मानसिक शक्ति त्याच्या कायिक शक्तीहून भिन्न आहे असें आपण नेहमीं मानतों व कधीं कधीं जड कायेला अगदींच क्षुल्लक लेखून आपण असेंहि प्रतिपादण्यास कमी करीत नाहीं कीं केवळ आपल्या मानसिक सामर्थ्याच्या साधनानें मनुष्याला आरोग्य, बल आणि दीर्घायुष्य प्राप्त करून घेतां येईल. जड वस्तूंचें महत्व कमी ठरवून चित्‌शक्तीला प्रधान स्थान देण्याचा मोह आपल्याला सहसा टाळतां येत नाहीं. पण हा मोह खोटा आहे. काया ही जड वस्तू असली तरी तिचें महत्व नाहींसें होत नाहीं. किंबहुना मनोव्यापारांवर सर्वांत अधिक परिणाम कशाचा होत असेल तर तो कायिक अवस्थेचा.

आधुनिक मानसशास्त्रवेत्त्यांपैकीं कांहींचें तर असें ह्मणणें आहे कीं मनुष्याच्या जीविताचे कायिक व मानसिक असे दोन विभाग आपण व्यर्थ कल्पिले आहेत. खरें पाहतां ज्या असंख्य सूक्ष्म पेशींचा ( Cells ) देह बनलेला आहे त्या पेशी कांहीं एका ठरा-

विक रीतीनें नवसंस्काराचें ग्रहण करीत असतात व त्या रीतींचा अभ्यास करणें या पलीकडे वास्तविक मानसशास्त्र असें निराळें कांहींच नाहीं. हा वाद एकांगी ह्मणून सोडून देऊं. पण इतकें खचित कीं कायिक व मानसिक अवस्थांचा अन्योन्य संबंध फार निकट आहे. आणि हें जर खरें तर यौवनदशेंतील मनोधारणेचा विचार करतांना यौवनांतील कायिक अवस्था कशी असते तें अवश्य लक्षांत घेतलें पाहिजे.

'तरुण स्त्रीपुरुष' हा शद्बप्रयोग योजतांना माझ्या डोळ्यांपुढें आठरावीस वर्षांपासून तों सुमारें पंचवीस वर्षांपर्यंतचे स्त्रीपुरुष विशेषतः आहेत. या कालावधींत शरीरधर्मांत विलक्षण स्थित्यंतर घडून येत असतें. बाल्यदशेंत सुप्तावस्थेंत राहिलेल्या कित्येक ग्रंथीं जाग्या होऊन त्यांची क्रिया सुरू होते. रक्तवाहिन्या, स्नायू इत्यादिकांच्या व्यापारांत बदल होऊन रक्तप्रवाहाचाही धर्म बदलतो आणि निरनिराळ्या स्रावांना भर येतो. आम्रवृक्षाला मोहराचा बहर यावा तसें शरीराचें होतें. ज्वालामुखीच्या पोटांतली शक्ति पोटांत मावेनाशी झाली ह्मणजे त्याचा स्फोट सुरू व्हावा, तद्वत् शरीरांतली कांहीं एक शक्ति जणूं उद्रेकासाठीं घावरी होते. भूगर्भांतील गुप्त क्रिया कांहीं एका मर्यादेपलीकडे जोरावल्या कीं धरणीकंप व्हावा त्याप्रमाणें देहांतील गुप्त तेज प्रगट व्हावयासाठीं अस्थिर होतें आणि सबंध देहांत एक प्रकारचा कंप, स्फुरण, स्फोट उत्पन्न होतो.

तंतवाद्यावर ढिली राहिलेली तार खुंटीनें पिळली ह्मणजे सुरावर स्थिर होण्यापूर्वी जशी ती क्षणभर कांपत राहते त्याप्रमाणें

यौवनदशेंत शरीर थरथरत असतें. आणि शरीरधर्माचें हें वैशिष्ट्य मनोधर्मांतहि दिसून येतें. बाल्यावस्थेंतील मुग्धता नष्ट झालेली असते, आणि वृद्धावस्थेंतील प्रशांत गांभीर्य यावयास फार अवकाश असतो. यौवनांतील मनोव्यापार ह्मणजे अधणाचें सळसळणारें पाणी, त्यांत थंडपणा आढळायचा नाहीं आणि तरुण स्त्रीपुरुषांना कोणी थंडपणाचा उपदेश केला तर तो उगी-चच्या उगीच पटायचा नाहीं. यौवनदशेंत सारे मनोव्यापार स्फुरणशील असतात. ते गतिप्रिय असतात. निश्चलपणा त्यांना वावडा असतो. त्यांना धांवायला हवें असतें व जेथें त्यांना धांवायला मिळेल तेथेंच ते रमतात. यौवनांत भावनेची सत्ता सर्वांत प्रबळ असते असें जें सामान्यपणें समजण्यांत येतें त्याचा अर्थ असा आहे.

वाटल्यास या गोष्टीची फोड आणखी थोड्या वेगळ्या रीतीनें करतां येईल.

आयुष्यांतील निरनिराळ्या अवस्थांमध्यें मनुष्यमात्राच्या चित्त-वृत्ती निरनिराळ्या विषयांत रमतात. रंगीबेरंगी खेळणीं, किल्ली देतांच धांवणाऱ्या खेळांतल्या गाड्या, डोळे मिचकावणाऱ्या व टाळ्या वाजविणाऱ्या बाहुल्या, अशा वस्तूंत लहान मुलांचें चित्त चटकन् रमतें. बाहुलीचा रंग आकर्षक असला किंवा तिचे केस कुरळे असले कीं लहान मुलाचें प्रेम तिच्यावर जडायला वेळ लागत नाहीं. त्या बाहुलीच्या मनांत कोणते विचार चालू अस-तील, ती अंत:करणानें सुशील असेल कीं नाहीं, तिचें आपल्यावर उलट नि:सीम प्रेम असेल कीं नाहीं, असल्या चवकशा लहान

मुलांस सुचत नाहींत. किंबहुना बाहुलीवर सर्व प्रकारच्या सुंदर विचारांचा आरोप करूनच मुलें तिच्याशीं खेळत असतात.

याच्या उलट, वार्धक्यांत माणसाला दुसऱ्या माणसाच्या अंत:करणाच्या सौंदर्याची तहान असते. बाह्यरूपापेक्षां विचारांच्या सौंदर्यावर लुब्ध असण्याचा हा काळ असतो. उंच, गंभीर, व्यापक विचारांवर वृद्धाचें मन झटकन् जडतें, आणि अशा विचारांच्या प्राप्तीनें वृद्धांना नि:सीम आनंद होतो. जग रंगारूपांनीं प्रतीत होण्याऐवजीं विचारांच्या योगानें प्रतीत होत असतें. वेलीवेलींवर उडणाऱ्या व फडफडणाऱ्या फुलपाखरांच्या मागें लहान मुलें धांवतील, उलट, वृद्धांना शांत व उद्बोधक विचारांची हौस वाटेल.

पण यौवनदशेंत चित्तवृत्ती, कांहीं निराळ्याच स्वरूपाच्या असतात. या दशेंत जिनगरी भावल्यांशीं खेळणाऱ्या बालकांचा आनंद खुळेपणाचा वाटत असतो, त्याचप्रमाणें शंकराचार्य किंवा रामानुजाचार्य यांच्या विचारसागरांत निमज्जन करण्यांत तल्लीन होणाऱ्या वृद्धांचा आनंदहि पोकळ, खोटा, वेडेपणाचाच वाटत असतो. बाल्यांतील मुग्धता नाहींशी झालेली असते व केवळ विचारांच्या सौंदर्यावर मोहून जाण्याचा विवेक अंगीं आलेला नसतो. स्वत:च्या अंत:करणांत भावना उचंबळत असतात, व ज्यायोगें त्या तशा अधिक उचंबळतील अशा वस्तू, अशा व्यक्ती, असे प्रसंग आणि अशीं ध्येयें हवीशीं वाटत असतात. आपल्या दुग्धधारांनीं तान्हुल्याला न्हाऊं घालावें असें जसें स्त्रीला वाटत असतें तसें आपल्या भावनांच्या धारा कशावर तरी मन:पूत सोडतां याव्यात अशी तळमळ त्यांना लागलेली असते.

भावना उद्दीपित करणारें जें जें कांहीं असेल तें तें त्यांस प्यार वाटत असतें. देशासाठीं मरण्याची कल्पना बहारीची वाटते. प्रेमाखातर सर्वनाश करून घेण्याचा विचार मादक वाटतो. जेथें सौंदर्य दिसेल तेथें प्राणांची कुरवंडी करून टाकावी आणि त्या सौंदर्याचा उपभोग घ्यावा असें वाटत असतें. देहांतील चैतन्य प्रगट व्हावयासाठीं जसें धडपडत असतें तशाच भावना प्रगट होण्यासाठीं क्षुब्ध झालेल्या असतात. कायिक व मानसिक अवस्थांचा अन्योन्य संबंध अत्यंत निकट असल्यामुळें तरुणांच्या शरीराप्रमाणेंच मनोव्यापारावरहि कामविकाराचा पगडा सर्वांत अधिक असतो. कारण भावनांची विलक्षण खळबळ उडाल्यामुळें मनाला जी एक अवर्णनीय ग्लानि येते तिच्या इतकी आनंददायक गोष्ट तरुणांना दुसरी कोणतीच वाटत नसते; आणि भावनांचा समुद्र तुफान हालवून सोडण्याचें सामर्थ्य, तरुणांच्या बाबतींत कामविषयाइतकें दुसऱ्या कोणत्याच विषयांत नसतें.

या गोष्टी निसर्गप्राप्त आहेत. त्यांचा स्पष्ट उल्लेख केल्याबद्दल कांहीं वाचकांच्या भुंवया वक्र होतील हें मी जाणतों. पण त्यांच्या रोषांपेक्षांहि ज्या गोष्टी मी येथें स्पष्ट लिहीत आहे व लिहिणार आहे त्या डोळ्याआड केल्यामुळें होणाऱ्या अनर्थांची जाणीव मला अधिक आहे. तरुण स्त्रीपुरुषांच्या मनोव्यापारांवर कामुकतेचें दडपण सर्वांत अधिक असलें तर तें हिशेबांत धरून सामाजिक व्यवहारांस वळण देणें अधिक शहाणपणाचें कीं तें दृष्टिआड करून खोट्या बंधनांच्या जाळ्यांत साऱ्या समाजाला जखडून टाकणें अधिक हिताचें ? जें निसर्गदत्त आहे, किंबहुना

ज्याला निसर्गाची अत्यंत रमणीय, रहस्यमय आणि काव्यमय योजना ह्मणतां येईल, तें कबूल करण्यांत शरम कसली ?

आपल्या भावनांचें सिंचन करण्याची आणि ज्यावर तें सिंचन करायचें त्याची प्रतिक्रिया घडून आपल्या अंतःकरणांत उसळणाऱ्या भावनांचा उन्मादक अनुभव घेण्याची तरुण स्त्रीपुरुषांना ओढ लागलेली असते. ही भावनांची मिजास राखण्यासाठीं तरुण स्त्रीपुरुष वाटेल तो त्याग करावयास कचरणार नाहींत, सांगाल तें दिव्य करतांना हाय ह्मणणार नाहींत, उघड उघड वेडेपणाचा अत्याचार करावयासही कमी करणार नाहींत. वर्षाकालीं वृष्टि व्हावी ह्मणून लहान मोठे जलसंचय आधीं आपलें सर्वस्व रविकिरणांपुढें ठेवतात, त्याप्रमाणें कोणत्या तरी वस्तूवर, व्यक्तीवर, ध्येयावर, संस्थेवर आपल्या साऱ्या भावना ओसंडाव्या आणि त्यामुळें उत्पन्न होणाऱ्या भावनांच्या अनुभवांत तल्लीन असावें हें यौवनदशेंतील जीवित होय. या सत्याकडे दुर्लक्ष करून समाज चालेल तर त्याला क्षणोक्षणीं ठेंचा लागल्यावांचून राहणार नाहींत. उलट, मानसशास्त्रांतील हा सरळ सिद्धांत ध्यानांत ठेवून समाज तरुणांना वागवील तर समाजाचें कल्याण झाल्यावाचून रहाणार नाहीं.

थांबा. कोणाला वाटेल कीं तरुण स्त्रीपुरुषांना मोकाट सोडण्याच्या उपदेशाचीच प्रस्तावना मी करीत आहे. तसें नाहीं. तरुणांना मनःपूत वागूं दिलें पाहिजे असें ह्मणण्याचें माझ्या स्वप्नींदेखील नाहीं. पण उलट, तरुणांच्या भावनांना ज्यांत काडीइतकाहि वाव नाहीं असें आपलें सामाजिक जीवन असेल

तर तें सर्वस्वी त्याज्य, दांभिक आणि अनीतींचें आहे असें मी स्पष्ट ह्मणतों. तरुणांचे जसे कांहीं हक्क आहेत तशीं त्यांची कांहीं पवित्र कर्तव्येंहि आहेत हें मी जाणतो.

पण तरुण स्त्रीपुरुषांच्या हक्कांची किंवा कर्तव्यांची चर्चा करतांना त्यांचे मनोधर्म विसरून चालणार नाहीं. तरुणांच्या वासना, आकांक्षा, आशा– या सर्व गोष्टींचें केंद्रस्थान भावना होत. भावनांच्या या सरीमुळें तरुणांची मनोरचना विलक्षण गुंतागुंतीची व पाहणारास क्षणभर घोंटाळ्यांत टाकणारी वाटते. तेथें आत्यंतिक स्वार्थत्याग दिसेल तर एखादे वेळीं आत्यंतिक स्वार्थपरायणत्वाह दिसेल, द्वेषाचा अतिरेक झालेला दिसेल तर औदार्य मर्यादेबाहेर गेलेलें आढळेल. निष्ठा कळसाला पोंचलीशी वाटेल तर नास्तिक्याला ताळ उरला नाहीं असा भास होईल. भावनेच्या केंद्रस्थानाला जी दिशा मिळेल तिकडे मनोवृत्ती जातील हें लक्षांत ठेवलें ह्मणजे या वैचित्र्याचें आश्चर्य वाटणार नाहीं.

तरुणांच्या ठिकाणीं भावनाचा भर असतो याचा अर्थ त्यांच्या अंगीं कर्तृत्वाची तयारी सर्वांत आधिक असते असाच केला पाहिजे. मानसशास्त्राचा असा सिद्धांत आहे कीं माणसाचे हात पाय हालविणारी खरी शक्ति जर कोणती असेल तर ती भावनाच होय. शरीराकडून प्रत्यक्ष क्रिया घडवून आणण्याचें सामर्थ्य केवळ विचारांच्या अंगीं मुळींच नसतें. केवळ विचार केल्याने संकल्प ठरत नाहीं आणि क्रियाहि घडत नाहीं.

उलट संकल्प लांबणीवर टाकावयाचा असेल, क्रिया घाईनें होऊं नये असें वाटत असेल तर विचार करण्यास प्रारंभ करावा. विचारामुळें संकल्पाचा उपक्रम होण्याऐवजीं निरोध होतो. बागेंतल्या वाफ्यांत वाहणाऱ्या पाण्याच्या पाटाची गति थांबवायची किंवा बदलायची असली ह्मणजे आपण बांध घालतों. विचारांना त्या बांधांचीच उपमा साजेल. ते बांध ह्मणजे पाणी नव्हे त्याप्रमाणें विचार ह्मणजे क्रिया नव्हे. विचार स्वतः वांझोटे आहेत. केवळ विचारामधून संकल्प व कृति बाहेर पडतील हें शक्य नाहीं. संकल्पाला व क्रियेला चालना देणारी शक्ति भावना होय.

बागेंत फुललेल्या गुलाबाच्या फुलाविषयीं आपण केवळ विचार करीत राहिलों तर अनेक तऱ्हेच्या बौद्धिक कल्पना आपल्या डोक्यांत येऊन जातील. पण त्यापलीकडे कांहीं होणार नाहीं. परंतु तेंच त्या फुलाबद्दल आपल्या मनांत वासना उत्पन्न होऊन आपल्या भावना हालल्या, 'हें फूल गुलाबाचें आहे ' असल्या कोरड्या विचाराच्या जोडीला जर 'अहाहा! हें माझ्या प्रिय ××× च्या सुंदर केशकलपांत किती शोभेल!' अशी भावना उत्पन्न झाली तर लगेच आपलें पाऊल पुढें पडून आपल्या हातून तें फूल खुडलें जाईल! केवळ बौद्धिक व्यापार लुलेपांगळे आहेत. भावनेच्या खांद्यावर बसल्यावांचून विचारांना कोठलाच पल्ला गांठता यावयाचा नाहीं.

भावना आंधळी आहे, पण तिच्यांत चलनशक्ति आहे. क्रमिक पुस्तकांतील आंधळा व पांगळा यांच्याप्रमाणें विचार व भावना यांचें परस्पर नातें आहे असें ह्मणावयास हरकत नाहीं. नुसत्या

भावना भडकल्या तर त्या आंधळेपणानें कोठें तरी जाऊन आदळतील. विचारांच्या मदतीवाचून त्यांना डोळसपणा येऊं शकत नाहीं. पण हें जितकें खरें तितकेंच स्वतः विचार कितीहि डोळस असले तरी कारकशक्ति त्यांच्यांत मुळींच नसते. बुद्धीची खात्री पटली तरी माणसें त्याप्रमाणें वागत नाहींत हा आपला नेहमींचा अनुभव नाहीं काय ? नुसत्या बुद्धीनें तत्वज्ञान स्वीकारून चालत नाहीं, भावनेनें 'हूं' ह्मणावें लागतें, तरच संकल्प ठरून कृति होते.

विचारांच्या अंगीं धग नाहीं. विझलेल्या कोळशासारखे ते थंड गार असतात. उलट भावना स्फुलिंगासारख्या असतात. भावनेची एक ठिणगी उडायचा अवकाश कीं तोंपर्यंत स्तब्ध राहिलेलें सारें विचारांचें रान पेटून कृतीचा भडका उडायला वेळ नाहीं. मोटार गाडीला डायनॅमो असतो त्याप्रमाणें माणसाच्या संकल्परथाला भावनांचा डायनॅमो जोडलेला आहे. किंवा संकल्पाला नौकेची उपमा देऊन असें ह्मणतां येईल कीं, विचार हें नौकेचें सुकाणूं असून भावना म्हणजे त्या नौकेचें शीड होय. नुसतें सुकाणूं कितीहि हालविलें तरी नौकेला गति येणें शक्य नाहीं; आणि वाऱ्यानें भरलेलें शीड नेईल तिकडे नौका जाऊं दिली तर ती कोठल्या खडकावर जाऊन आपटेल किंवा कोठल्या दलदलींत जाऊन रुतून बसेल त्याचा नेम नाहीं !

यावरून कर्तृत्वाचें केवढें बीज तरुणांच्या ठिकाणीं असतें याची वाचकांस कल्पना झालीच असेल. अर्थात् हें कर्तृत्व वाया जाऊं देण्याऐवजीं त्याचा योग्य उपयोग करून घेण्याकडे

स्वतः तरुण स्त्रीपुरुषांनीं व समाजधुरीणांनीं लक्ष द्यावयास पाहिजे. एका व्यक्तीपुरतें बोलावयाचें झाल्यास भावनांना जशी आपण डायनॅमोची उपमा दिली, तद्वत् एकंदर समाजाबद्दल बोलावयाचें झाल्यास त्या समाजांतील तरुण स्त्रीपुरुषांचा जो वर्ग त्यालाच डायनॅमो ह्मटलें पाहिजे. सामाजिक प्रगति तरुणांच्या हातीं असते याचें कारण हेंच होय. तरुण स्त्रीपुरुष ह्मणजेच समाजाची जिवंत उपक्रमशक्ति होय. जगाला थक्क करून सोडणाऱ्या राष्ट्रीय क्रांति तरुण स्त्रीपुरुषांच्याच हातून झाल्या आहेत व होतील याचेंहि कारण हेंच होय.

वैदिक पुरुषसूक्ताची नवी आधुनिक आवृत्ति काढायची वेळ आली तर विराट पुरुषाच्या अंगचा जो कांहीं पराक्रमी अंश असेल त्याचीच उपमा तरुण स्त्रीपुरुषांच्या वर्गाला द्यावी लागेल. तेव्हां सबंध समाजाचा व राष्ट्राचा अभ्युदय ज्यांच्या हातीं आहे त्या तरुण स्त्रीपुरुषांची उपरिनिर्दिष्ट मनोभूमिका ध्यानांत घेऊन त्यांजपुढील विविध प्रश्न सोडविणें किती अगत्याचें आहे हें मी आणखी सांगावयास कां पाहिजे ?

# प्रकरण ३ रें

# स्वार्थत्यागाची पूर्वतयारी

गेल्या प्रकरणांत तारुण्यसुलभ मनोवृत्तींचें विवरण केल्यानंतर माझी मलाच क्षणभर अशी शंका आली कीं, आपल्या देशांतील तरुण स्त्रीपुरुषांना हें विवेचन सर्वांशीं लागू पडेल काय? तरुणांचा स्वभावधर्मच असा आहे कीं, त्यांच्या स्वतः-च्या अंतःकरणांत भावना उचंबळत असतात व ज्यायोगें त्या तशा अधिक उचंबळतील अशा वस्तू, अशा व्यक्ती, असे प्रसंग आणि अशीं ध्येयें त्यांस हवीशीं वाटतात असें मी मागच्या प्रकरणांत ह्मटलें. आपल्या भावनांचें सिंचन करण्याची आणि ज्यावर तें सिंचन करावयाचें त्याची प्रतिक्रिया घडून आपल्या अंतःकरणांत उसळणाऱ्या भावनांचा उन्मादक अनुभव घेण्याची तरुण स्त्रीपुरुषांना ओढ लागलेली असते असेंहि मी ह्मटलें. कोणत्या तरी व्यक्तीवर, ध्येयावर, संस्थेवर साऱ्या भावना ओसंडाव्या आणि त्या अनुभवांत तल्लीन असणें हें यौवनदशें-तील जीवित होय असेंहि मी लिहून गेलों. पण पुनः मनांत आलें, मानसशास्त्रदृष्ट्या आपण केलेलें हें विवेचन आपल्या भोंवतालीं दिसणाऱ्या तरुण स्त्रीपुरुषांस लागू पडत आहे काय? उलट आमच्या समाजांतील तरुणांचें बोलणें, चालणें व वागणें पाहिलें तर हें विवेचन केवळ पुस्तकी वाटण्याचा संभव नाहीं काय?

मानसशास्त्राच्या तत्वानुसार पाहिलें तर यौवनांत भावनांची सत्ता सर्वांत प्रबळ असावयाची, सारे मनोव्यापार स्फुरणशील व गतिप्रिय असावयाचे हें खरें; पण आजूबाजूस पहावें तों याचें प्रत्यंतर फारच थोडें येतें. शाळाकॉलेजांत शिकण्याऐवजीं धंद्यांत किंवा नोकरींत पडलेले जे तरुण स्त्रीपुरुष आहेत त्यांची गोष्ट तर सोडूनच द्या; पण जें उच्च शिक्षण घेत आहेत आणि ज्यांना उच्च वातावरणांत वावरायला मिळत आहे त्यांच्या ठिकाणींहि सुसंस्कृत भावनांची आणि त्या भावनानुसार उत्पन्न होणाऱ्या तीव्रतेची अपेक्षा करावी तर ती चुकीची ठरेल.

" इंग्लंडमध्यें आज अशी स्थिति झाली आहे कीं अविवाहितांची वागणूक विश्वहितांसारखी आहे आणि गृहस्थाश्रमी लोकांना ब्रह्मचर्य पाळण्याशिवाय गत्यंतर उरलें नाहीं " असें बर्नार्ड शॉनें एकदां ह्मटलें होतें. आमच्या समाजासंबंधीं असें उलट सुलट तोलबंद विधान करतां यावयाचें नाहीं. पण आह्मां तरुणांची वर्तणूक म्हाताऱ्यासारखी आहे असें एखाद्या निरीक्षकानें ह्मटलें तर त्याच्या पदरांत उलट माप घालण्याचा प्रयत्न साधावयाचा नाहीं. आह्मां तरुणांकडे पाहिलें तर अंतःकरणांतील प्रखर भावनांची साक्ष देणारी एक तरी गोष्ट कोणाला झटकन् दिसेल कां ? कॉलेजांत जाणाऱ्या एखाद्या मुलीकडे पहावें तों 'करायचें ह्मणून करायचें' अशा वृत्तीनें तिच्या साऱ्या गोष्टी चाललेल्या असतात.

आपल्या समाजांत स्त्रियांना फारसें स्वातंत्र्य नाहीं ह्मणून असें होत असेल असें ह्मणावें, तर कॉलेजवाल्या तरुण मुलाच्या

भावना तरी कोठें कशासाठीं उचंबळत असतात ? तोहि झोंपेंत चालणाऱ्या माणसासारखा शिक्षणपथावर पावलें टाकीत असतो. शिक्षण परकी सरकारच्या हातीं असल्यामुळें क्रमिक पुस्तकें नीरस असतात व त्यांत चित्र रंगाविणें शक्य नसतें या ह्मणण्यांतही पळवाट काढण्यापलीकडे स्वारस्य नाहीं. पण तेंहि मान्य केलें तरी असें विचारतां येईलच कीं भिकार अभ्यासापायीं जाणाऱ्या पांच सहा तासांची गोष्ट सोडून बाकीच्या वेळांतल्या व्यवहारांत तरी तरुणांच्या ठिकाणीं काय मोठी भावनांची आंच दिसते ? शाळाकॉलेजांतल्या स्त्रीपुरुषांना अभ्यासाची तळमळ तर नाहींच नाहीं, पण खेळण्याबागडण्याचीहि हौस त्यांच्या ठिकाणीं नाहीं, कांहीं कलाकुसर शिकण्याचाहि अमर्याद शोक त्यांना नाहीं, इतकेंच काय शाळाकॉलेजांत कांहीं चतुराईच्या खोड्या करण्याबद्दल कोणी बक्षीस ठेवलें तर तेंहि बहुतेक वर्षानुवर्ष गंजत पडेल.

या सर्व प्रकाराचें मूलकारण जीविताचा चिकित्सापूर्वक विचार करण्याचा प्रयत्नच आमच्या तरुणांनीं कधीं केलेला नसतो हेंच होय. थोडासा विचार करतांच हें पटण्यासारखें आहे कीं, आपले आईबाप, आपले आप्तेष्ट, आपला समाज, आपला देश, अशा वाढत्या परीघाच्या वर्तुळाच्या केंद्रस्थानीं प्रत्येक व्यक्ति आहे, व केंद्रस्थानावरील व्यक्तीचा त्या त्या परीघावरील व्यक्तींशीं संबंध आला, कीं एक एक बिकट प्रश्न उत्पन्न होतो. या प्रश्नांच्या सोडवणुकीवर सबंध समाजाचें स्वास्थ्य अवलंबून असतें. आज स्थिति अशी आहे कीं, तरुण स्त्रीपुरुषांपैकीं

शेंकडा पांचांनाहि या प्रश्नांची आगाऊ जाणीव नसते व त्यामुळें बेसावध शिकाऱ्यापुढें एकदम जनावर येऊन उभें राहिलें ह्मणजे गांगरून कोठें तरी निशाण धरावयाचें व बार काढावयाचा असें तो करतो त्याप्रमाणें ते करतात. तरुणांपैकीं ज्या शेंकडा दोघांचौघांना विविध प्रश्नांचा विचार करावासा वाटतो ते त्या प्रश्नांची संख्या व महत्व पाहून बावरून जातात व त्यांच्या विचारांत प्रमाणशीरपणा न राहिल्यानें त्यांची दिशाभूल होते.

प्रमाणशीरपणा रहात नाहीं याचा अर्थ असा. वर मी ह्मटलेंच आहे कीं, प्रत्येक व्यक्तींचा इतर अनेक व्यक्तींशीं क्रिया-प्रतिक्रिया न्यायानें संबंध येत असतो व या व्यक्तींपैकीं कांहीं निकट व कांहीं कमी अधिक अंतरावर असतात. हें अंतर ओळखून व त्या अंतराच्या मानानें त्या त्या हितसाधनास महत्व देऊन माणसाच्या हातून वागणूक झाली कीं त्याच्या वागणुकीनें त्याला व इतरांस सुखाची प्राप्ति होते; व असें वागणाऱ्या माणसांची संख्या जसजशी वाढेल तसतसा एकंदर समाज सुखी व समृद्ध होतो. तरुणांच्या भावना प्रज्वलित असतात व असाव्यात हें खरें पण त्या भावनांच्या शक्तीवर भलतींच चक्रें फिरूं लागलीं तर हिताऐवजीं अहितच होईल.

यौवनदशेंत कायिक, बौद्धिक, भावनारूप अशी विविध शक्ति माणसाच्या ठिकाणीं स्फुरण पावत असते, व या शक्तींचा कशावर तरी व्यय केल्यावांचून मनुष्याला समाधान व शांति वाटत नाहीं. ऐन बहराच्या दिवसांत गुलाबाच्या झाडाला आंतून एक

प्रकारच्या अवर्णनीय शक्तीचें पाझर फुटत असतात व ही शक्ति नाना तऱ्हेच्या रंगांत व गंधांच्या रूपानें जगाच्या सुखलोलुप इंद्रियांवर फेंकल्याखेरीज त्या झाडाचें जीवितसाफल्यच होत नाहीं. याप्रमाणें यौवनांत भावनांचे फवारे कशावर तरी सोडल्याशिवाय मनाची तळमळ थांबायची नाहीं हें खरें. पण भावनांचा हा अभिषेक भलत्याच कारणीं झाला ह्मणजे त्या व्यक्तीला समाधान मिळत नाहीं, आणि समाजाचेंहि कल्याण साधत नाहीं.

स्वार्थत्याग हें समाजाचें आधारतत्व होय, आणि भावनावश तरुणाला असला त्याग करायला सांगितला तर ते ताबडतोब तो करतील. पण तरुणांना स्वार्थत्यागाचा उपदेश करण्याच्या भरांत आपण दोन गोष्टी विसरतों; आणि स्वार्थत्यागाचा मादक विचार ज्यांच्या कोंवळ्या हृदयांत कांहीं निमित्तानें भिनला तो अल्पवयी तरुणही यांच दोन गोष्टींचा विचार ठेवीत नाहीं. त्या दोन गोष्टी ह्या:—

१ आपल्या आंगीं व्यक्तित्व आल्यावांचून आपल्या त्यागाला कांहीं किंमत नाहीं.

२ अंतरावरच्या वाफ्याला पाणी द्यायसाठीं जवळच्या वाफ्यांतलीं रोपटीं तुडवून पुढें होण्यांत शहाणपणा नाहीं.

तरुण स्त्रीच्या किंवा पुरुषाच्या मनांत आपल्या देशाच्या अवनतीचा प्रश्न आला व या बाबतींत आपलें कर्तव्य काय आहे? अशा सवालाचा ध्वनि अंतःकरणांत उठला कीं, सगळ्यांत साहजिक गोष्ट ही आहे कीं, भावनांची गर्दी उसळून असें वाटतें.

या भावनांची भूक शमविण्यासाठीं आपल्या आयुष्याची होळी करून देशोद्धार अल्पांशानें तरी करावा. आपले हजारो बांधव निरक्षर आहेत याची चीड येऊन वाटतें कीं हातांत कुबडी आणि कमरेला लंगोटी लावून रामदासी बाण्यानें ठायीं ठायीं हिंडावें आणि साऱ्यांना साक्षरतेची दिव्य दृष्टि आणून द्यावी. समाजांत पसरलेलीं व्यसनें दिसलीं कीं वाटतें फाकिरी पत्करावी लागली तरी हरकत नाहीं पण पापपंकांत खोल खोल जाणाऱ्या आपल्या भावंडांना त्यांतून वर काढून समाजशुद्धि साधावी. राष्ट्रांतील कला नामशेष झालेली पहावत नाहीं व वाटतें कीं उभें आयुष्य त्याकारणीं खर्चून आपल्या राष्ट्रीय कलेचा उजळा परत आणावा. देशाच्या पारतंत्र्यापोटीं होणाऱ्या विटंबना झोंबल्या ह्मणजे तर वाटतें कीं जीवाचें बलिदान करावें लागलें तरी हंसत करावें आणि स्वातंत्र्याच्या रविबिंबाला हनुमानाप्रमाणें हात घालून जवळ ओढावें.

भावनांचा हा सारा कल्लोळ यौवनाला शोभण्यासारखा आहे. पण अशा क्षणीं तरुण स्त्रीपुरुषांनीं विवेकाचें सुकाणूं ढिलें ठेवूं नये. माणसाच्या ठिकाणच्या भावना या नौकेच्या शिडासारख्या आहेत, व विचार सुकाणूंसारखा आहे. नुसतें शीड वाऱ्यावर पसरून सोडलें तर नौका वाऱ्याच्या झोतानें कोठें तरी जाऊन आपटेल. तद्वत् आज परिस्थिति पाहतांच हृदय फाटत असलें आणि माझ्या देशासाठीं मी कोणतें दिव्य कवटाळूं असें वाटून स्वार्थत्यागासाठीं मन उचंबळून येत असलें तरी त्याग करण्यासाठीं संपत्ति आपल्याठिकाणीं सांठलेली असल्यावांचून त्यागाला कांहीं अर्थ नाहीं हें तरुणानें केव्हांहि विसरतां कामा नये.

कोणत्याहि व्यक्तीचा त्याग फलदायक होण्यास त्या व्यक्तीच्या ठिकाणीं आधीं व्यक्तित्व आलेलें पाहिजे. त्याग करण्याच्या इच्छेला किंमत नाहीं असें नाहीं, पण देऊन टाकायला जवळ

जेवढें असेल तेवढें त्या इच्छेचें चीज होईल. संन्याशाला दातृत्वाचा उमाळा आला तरी तो काय देणार? किंवा वांझोटीला पान्हा फुटला तरी काय उपयोग? भुईमुगाच्या रोपट्याला पुष्कळ वाटलें कीं येणाऱ्या जाणाऱ्या श्रान्त वाटसरूंना छाया देऊन त्यांचा श्रमपरिहार करावा तरी त्यापासून काय निष्पन्न होणार?

तारुण्याच्या कालांत सर्वांत प्रबळ इच्छा हीच असते, व असावयास पाहिजेच, कीं प्रेम करावें आणि परत प्रेमाचा आनंद लुटावा. हें प्रेम प्रणयाच्याच स्वरूपाचें असेल असें समजण्याचें कारण नाहीं. आईबापांची भक्ति, सद्गुरुची उपासना, देशाचा अभिमान इत्यादि अनंत प्रकारांनीं तें प्रेम व्यक्त होईल. निराकार विषयावर प्रेम करण्यापेक्षां किंवा सजातीय व्यक्तीवर प्रीति करण्यापेक्षां विजातीय व्यक्तीवर प्रीति ठेवणें अधिक निसर्गसिद्ध व सुलभ आहे, आणि त्यांत शारीरिक संमीलनाची जोड मिळून अंतःकरणांच्या संमीलनाचा उन्माद वाढतो ह्मणून तारुण्यसुलभ त्यागबुद्धि बहुतेक प्रणयाच्या रूपांतच आपल्याला दिसते ही गोष्ट वेगळी. पण प्रणयाचीसुद्धां तात्विक मीमांसा केली, इतकेंच नव्हे तर वैषयिक आचरणांतील मूलतत्त्व पाहिलें तर सारें अंतर तोडून टाकून आत्मसमर्पण करण्याची इच्छाच तेथें दिसून येते.

या इच्छेवरच सारी सृष्टि चाललेली आहे, आणि या इच्छेची अद्भुत परंपरा तरुणांवाचून कोणी राखूं शकणार नाहीं.

आत्मसमर्पणाची तीव्र इच्छा हेंच तारुण्यकालांतील जीवितांचें सार होय. पण समर्पण करावयास जवळ कांहीं तरी संचय हवा ना? सुंदर तरुणीवर प्रीति करून तिला वश करावयाचें झालें तरी तिच्यासाठीं जितका त्याग हातून घडेल तितकी तिची प्रीति जडेल, आणि त्याग करण्यासारखें अंगीं जितकें अधिक बळ असेल तितका त्याग मोठा ठरेल. इतर प्रेमप्रकारांचेंहि असेंच आहे. आपला अधिकार जितका मोठा असेल, आपली क्षमता जेवढी अधिक असेल, तेवढा आपल्या स्वार्थत्यागाचा परिणाम अधिक होईल व त्या त्यागामुळें आपल्या क्षुब्ध भावनांना उन्मादशांतीचें सौख्य मिळावें ही जी आंतली इच्छा असते ती अधिक अंशानें पूर्ण होईल.

आपल्या अंगीं घेण्याचें सामर्थ्य जितकें अधिक आलेलें असेल तेवढें आपल्या त्यागाचें मोल वाढेल. ज्याच्या अंगीं घेण्याची ताकद नाहीं त्यानें न घेतलें तरी त्या त्यागाला कांहीं अर्थच नाहीं. राजलक्ष्मी आणि संसारसौख्य पायांवर लोळत असतांना मानवजातीच्या उद्धारासाठीं भिक्षु होणाऱ्या बुद्धाचा त्याग अलौकिक ह्मणावयाचा. उपासमार टाळण्यासाठीं सैन्यांत दाखल होणाऱ्या बारगिरानें देशासाठीं स्वार्थत्याग केला असें कोणी मानणार नाहीं. मन मानेल तर हातीं आलेली कल्याण सुभेदाराची सून आपली ह्मणतां येईल असा अधिकार असतांनाहि तिला 'माते' ह्मणून हांक मारणाऱ्या शिवाजीमहाराजांचा

त्याग अलौकिक ठरतो. सतरा विश्वे दारिद्र्याच्या मालकानें नूरजहानवर पापी नजर टाकली नाहीं तर त्यांत काय ? मिळविण्याची सत्ता जितकी मोठी तितकी त्यागाची शोभा अधिक.

अमक्यासाठीं कांहीं तरी करावें, अमक्या व्यक्तीवर निरतिशय प्रेम करावें, अमक्या स्त्रीचें हृदय जिंकावें, समाजासाठीं झिजावें, देशासाठीं उडी घ्यावी, या सार्‍या भावना तरुण हृदयांत कमी-ज्यास्ती प्रमाणांत उठणारच. पण या भावनांची तहान खरोखर भागवायची असेल तर तरुण स्त्रीपुरुषांनीं आपली क्षमता वाढविण्याकडे दुर्लक्ष करूं नये. तारुण्यांत अंतःकरणाची धाव चालू असते, उज्वल कृत्यें करावीशीं वाटत असतात, कधीं कधीं हें करूं कीं तें करूं अशी घाई होऊन स्थलकालमर्यादा झटपट ओलांडाव्यासें वाटतें याचा अर्थ काय ? हें शिकूं कीं तें शिकूं ? कोठवर शिकूं ? लग्न केव्हां करूं ? कोणाशीं करूं ?- सामाजिक सुधारणेसाठीं झटूं कीं व्यापारांत शिरून बुद्धिप्रभाव दाखवूं ? कुटुंबाचें कल्याण साधूं कीं सारा भार देवावर टाकून देशासाठीं मरणाच्या वाटेवर पाऊल टाकूं ? अशा प्रकारचे हजार प्रश्न तरुण स्त्रीपुरुषांच्या मनाचा गोंधळ उडवितात याचा अर्थ काय ?

याचा अर्थ इतकाच कीं दुसर्‍या कोणाला तरी सुखी करून त्यांत मिळणार्‍या अवर्णनीय आनंदाचा उपभोग घ्यायसाठीं तरुणाचा जीव उत्सुक असतो. आपण सुखाचें केंद्र व्हावें, आपल्यापासून दशदिशांना सुखाची किरणें फांकावीं अशी यौव-नांत जीवाला ओढ लागलेली असते. पण जीवाचें हें कोड-

कौतुक पुरवावयाचें असेल तर सुखोत्पादक शक्ति आपल्या अंगीं आधीं भरपूर सांठली पाहिजे हें विसरतां कामा नये. विजेच्या बॅटरीच्या योगानें पुढें शेकडों दीपज्योति प्रज्वलित व्हावयासाठीं आधीं ती भरावी लागते. त्याचप्रमाणें चहूंकडे सौख्यकिरणें फेंकणाऱ्या बिंदूची स्थिति आपल्याला यावी असें वाटत असेल तर तारुण्याच्या पूर्वकालांत तशी योग्यता अंगीं आणण्यासाठीं अहर्निश झटलें पाहिजे. शेतकरी गोफण मारतो तें कधीं पाहिलें आहे काय? त्या गोफणींतला दगड गोफणीचा कडाड् आवाज होऊन सुटल्याबरोबर सूंऽदिशीं जाऊन टिपण साधतो. पण तें साधण्यासाठीं आधीं कांहीं वेळ गोफण शेतकऱ्याचा डोक्यावर फिरावी लागते. तशी ती फिरल्याशिवाय दगड निशाणावर पडणार नाहीं.

सारांश, त्यागाची तळमळ आमच्या तरुण स्त्रीपुरुषांना लागली पाहिजे हें जितकें खरें, तितकेंच त्या त्यागाची उत्तम फलश्रुति होण्यासाठीं तरुणांनीं आपली योग्यता सर्व प्रकारें आधीं वाढविली पाहिजे हेंहि खरें. आज आभाळ सगळीकडूनच फाटलेलें दिसत असल्यामुळें आमचीं माणसें भांबावून गेलीं आहेत. तरुणांचीं अधीर अंतःकरणें तर अधिकच भांबावून जात आहेत. पण अशा वेळींच वरील विवेचन कटाक्षानें लक्षांत ठेवावयास हवें.

आणखी ज्या एका गोष्टीचा अशा वेळीं विसर पडतो पण जी सतत ध्यानांत वागविली पाहिजे म्हणून वर एकदां मीं म्हटलें ती ही कीं जवळच्याची आबाळ करून दूरच्यांचें हित साधण्यासाठीं

त्याग करण्यांत शहाणपणा नाहीं. प्रत्येक व्यक्ती अनेक वाढत्या परीघांच्या वर्तुळांच्या केंद्रस्थांनीं आहे असें मागें एके ठिकाणीं सांगितलेलें वाचकांस आवडत असेलच. या प्रत्येक वर्तुळावरील व्यक्तींशीं, संस्थांशीं किंवा तत्त्वांशीं व्यक्तीचा प्रसंगानुसार संबंध येत असतो व ज्या जोराचें आकर्षण घडेल त्या मानानें भावनांची भरती येऊन स्वार्थत्यागाचा मोह वाटत असतो.

या मोहामुळें पुष्कळदां असें होतें कीं, अखेरच्या वर्तुळावरील व्यक्तींसाठीं स्वार्थावर लाथ मारण्याच्या भरांत अगदीं निकटच्या वर्तुळावरच्या आपल्या जिव्हाळ्याच्या माणसांना कष्टांच्या व हाल-अपेष्टांच्या खाईत आपण लोटतों. हा प्रकार कितपत समर्थनीय आहे याची मला जबर शंका वाटते. कोणच्या कल्याणासाठीं कोणच्या कल्याणावर पाणी सोडावें किंवा सोडूं नये हें निश्चितपणें सांगतां येणें कठीण आहे हें कबूल. कार्याकार्य विचार सोपा नाहीं. तो सोपा नसल्यामुळेंच अर्जुनासारखा पराक्रमी आणि ज्ञानी पुरुष घटकाभर स्तंभित व मूढ होऊन गेला.

देशासाठीं घरादारावर तुळशीपत्र ठेवणेंही क्षम्यच नव्हे तर कर्तव्यच म्हणावें लागत असेल; पण मला वाटतें, तें असामान्य निकराच्या वेळीं. मायदेशावर शत्रू चालून येऊन समरकुंडच पटल्यावर बायकोला वैधव्य येईल या भीतीनें घरीं राहणारा माणूस शहाणा ठरणार नाहीं याबद्दल वादच नाहीं. पण हें

नीतिशास्त्र अपवादभूत निकराच्या घटकेपुरतें. नैमित्तिक. तेंच नित्याचें मानणें चुकीचें आहे.

परंतु ही चूक आमच्या तरुण स्त्रीपुरुषांपैकीं पुष्कळांच्या हातून होत आहे. गांवांत मोफत वाचनालयें स्थापणाऱ्याच्या घरांत निरक्षरता माजलेली मी पाहिली आहे. मजुरांचे कष्ट कमी करण्यासाठीं व्याख्यानांची झोड उडविणाऱ्याच्या घरांत थकलेली आई आणि कोंवळ्या वयाची बायको मजुरासारखी राबून कसाबसा संसार उभा राखण्यासाठीं धांपा टाकतात, अशीं उदाहरणें मला माहीत आहेत. एखाद्या संस्थेचा वार्षिकोत्सव साजरा करण्याच्या तयारींत गुंतल्यामुळें घरीं आजारानें पडलेल्या बायकापोरांकडे लक्ष द्यावयास ज्यांना वेळ नाहीं, असे स्वयंसेवक मला आढळले आहेत. देशाभिमानप्रवर्तक गाणीं गात फिरावयाची कामगिरी पतकरल्यामुळें ज्यांनीं आपल्या घरच्या माणसांना नीटनेटकें खायलाप्यायला मिळतें कीं नाहीं याची कधीं दादही घेतली नाहीं अशीं माणसें माझ्या अवलोकनांत आलीं आहेत.

देशाच्या आजच्या स्थितींत असल्या प्रकारावर अभिप्राय देणें कठीण आहे व हे प्रकार अनिष्ट होत असें ह्मणावयाचें ह्मणजे सत्य व प्रिय दोन्ही बोलल्याचें समाधान लाभणें शक्य नाहीं. पण इतकें म्हटलें पाहिजे कीं हे प्रकार सर्वस्वीं इष्ट तरी खचित नव्हेत आणि तरुणांनीं आपल्या वर्तनांत थोडीशी तरी प्रमाणबद्धता आणल्यास ते टळतील.

देशासाठीं संसारावर निखारे ठेवण्याच्या अपवादात्मक घटके-पेक्षां सामान्य काळांत व सरमिसळ सामान्य परिस्थितींत तरुण स्त्रीपुरुषांचें कर्तव्य कोणतें याचाच विचार येथें कर्तव्य आहे व त्या दृष्टीनें हें सांगितलेंच पाहिजे कीं राजकारणाचीं दूरचीं रोपटीं जगविण्यासाठीं आप्तस्वकीयांच्या कल्याणावर पाय देणें योग्य नव्हे. स्वार्थत्याग केव्हांही उदात्तच खरा; पण त्यांत प्रमाण-बद्धता असली तर तो निवळ उग्रच नव्हे तर चित्तवेधक आणि सुपरिणामी ठरेल. आधीं घरांत रमणीयता आणावी आणि मग देशाचें सौंदर्य वाढविण्याचा उद्योग करावा.

याचा अर्थ तरुणांनीं स्वार्थांत मग्न राहून घरांतली तिजोरी फुगवावी असा विपर्यासानें करूं नये. संपत्तीखेरीज संसारांत इतर हजार प्रकारचें सौंदर्य असावें लागतें. आम्हांला त्याची कल्पनाही नसते व त्यामुळें आमच्या घरांना खाणावळ आणि रेल्वेस्टेशना-वरची वेटिंगरूम असें मिश्र स्वरूप आलेलें दिसतें. घर सुंदर कर-ण्याचें व घरच्यांना सुखासमाधानांत ठेवण्याचें कर्तव्य क्षुद्र नाहीं. किंबहुना या कर्तव्याकडे सर्वांनीं लक्ष दिलें तर सारीं घरें सुख-संपन्न होऊन एकंदर राष्ट्राचा प्रश्न कांहीं अंशीं आपोआप सुटेल. प्रत्येक झाड टवटवीत राहिलें तर एकंदर बगीच्याची शोभा आपोआप बरीचशी वाढल्यावाचून रहावयाची नाहीं. पैपैसा सांठ-वायची खबरदारी घेतली कीं मोहरा आपोआप सांठतात असें म्हणतात तें खोटें नाहीं. निदान मी तरी तरुणांनीं कर्तव्याचा

अनुक्रम उगीचच्या उगीच उलटासुलटा करूं नये असें म्हण-णाऱ्यापैकीं आहे. सार्वजनिक सभेंत स्वयंसेवक म्हणून मिरविणाऱ्या तरुणापेक्षां घरीं माहेरपणास आलेल्या बहिणीचीं मुलें हौसेनें कडेखांद्यावर फिरावयास नेणारा तरुण मला अधिक आवडतो. भावनांची प्रखरता आणि त्यागाची हौस तरुण स्त्रीपुरुषांच्या ठिकाणीं अवश्य असावी; पण ती हौस भागवितांना प्रमाणबद्धता सुटूं नये.

स्वार्थत्यागांत प्रमाणबद्धतेचें महत्व मानलें पाहिजे आणि त्याग करण्यापूर्वी तरुणांनीं आपली योग्यता व क्षमता शक्य तेवढी वाढविली पाहिजे. या दोन मुद्द्यांवर मी आतांपर्यंत जोर दिला. अर्थात् ही क्षमता कशी वाढवितां येईल हा प्रश्न येथें उपस्थित होतो व त्याचाच विचार पुढच्या प्रकरणांत करूं.

## प्रकरण ४ थें

# कर्तबगारी कशी वाढवावी?

———×———

तरुण स्त्रीपुरुषांच्या ठिकाणीं विचारापेक्षां भावनांचा भर अधिक असावा, आणि कशासाठीं किंवा कोणासाठीं तरी त्याग करून त्या त्यागाचें अनुपम सौख्य उपभोगण्याची त्यांस ओढ लागलेली असावी हें निसर्गसिद्ध होय. परतु येवढ्याच समजुतीवर तरुणांनीं अविचारानें ऐनवेळीं लहर येईल तो स्वार्थत्याग करावा असें कोणी ह्मटलें तर तें तर्कशुद्ध ठरणार नाहीं. मानसशास्त्राच्या दृष्टीनें तरुणांच्या मनोभूमिकेचें जें विवेचन मी मागें एके ठिकाणीं केलें तें वाचकांनीं विसरूं नये. आत्मसमर्पण करण्याची जी दिव्य इच्छा तरुणांच्या हृदयांत असते, तिचें मूळ स्वरूप कोणतें तें लक्षांत ठेवलें पाहिजे. जीवाकडे जीव आकर्षित व्हावा व या आकर्षणापासून आणि या आकर्षणाच्या वेळीं जो अभिन्नभाव दोन जीवांत उत्पन्न होतो त्यापासून त्या दोन्हीं जीवांना अवर्णनीय सुख व्हावें हें जीवसृष्टीचें एक मूलभूत तत्व आहे. या तत्वावरच जीवसृष्टीचा पसारा चालला आहे. कामाचाराची शास्त्रीय दृष्टीनें मीमांसा केली तर या तत्वाचेंच तें एक उत्तान स्वरूप आहे असें ह्मणावें लागेल. आपण जिला स्वार्थत्यागाची तयारी ह्मणतों व जी निसर्गतः तरुणांच्या आंगीं विशेष प्रमाणांत व ऐन जोमांत दिसून येते तीहि याच तत्वाचें रम्य स्वरूप होय. अर्थात जीवशास्त्राच्या कठोर दृष्टीनें पाहतां काम-

लालसा आणि ऐन तारुण्यांतली त्यागाची तळमळ यांत फारसा फरक करतां यावयाचा नाहीं. माझीं हीं विधानें ज्यांना विस्मय-कारक वाटतील त्यांनीं शांतपणें खोल विचार करून पहावा म्हणजे त्यांचाहि विस्मय नाहींसा होईल. आणि मी हीं विधानें या ठिकाणीं केलीं यांतील हेतु इतकाच कीं तारुण्यांतील त्याग-कृतीच्या मुळाशीं आनंदप्राप्तीची अपेक्षा असतेच हें कोणी विसरूं नये.

स्वार्थत्याग आणि सुखाची अपेक्षा हे शब्दप्रयोग परस्पर-विरोधी दिसतात खरे. पण त्यांचा एकमेकांशीं काडीमात्र संबंध नाहीं असें वास्तविक म्हणतां येईल काय? त्याग करणारा मनुष्य स्वतःच्या कायिक सुखोपभोगांवर पाणी सोडतो यांत शंकाच नाहीं. पण तें सोडतांनाही अमुक एक उद्दिष्ट किंवा ध्येय त्याच्या नजरेपुढें असतेंच कीं नाहीं? आणि आपल्या त्यागकृतीनें तें ध्येय सिद्ध झालेलें पाहून त्यागी व्यक्तीला एक प्रकारचें समाधान होतेंच कीं नाहीं? या समाधानाला सुख किंवा विलास असले ग्राम्य शब्द लावतां यावयाचे नाहींत; या समाधानाला सात्विक आनंद म्हणा किंवा आणखी गौरवाचे शब्द काढून त्याचें वर्णन करा. पण त्यागांतही अंतःकरणाच्या समाधानाचा व तदुद्भव आनंदाचा भाग आहे हें नाकबूल करतां यावयाचें नाहीं. देशा-साठीं हातावर शिरकमल घेऊन लढणाऱ्या तरुणालाहि आपल्या प्राणाहुतीनें देशाचा उद्धारकाल जवळ आलाच पाहिजे या दृढ श्रद्धेच्या आनंदाचा आधार असतोच. कुटुंबासाठीं स्वतःच्या हितावर पाणी सोडणाऱ्या व्यक्तीलाहि आपल्या आप्तस्वकीयांची सुस्थिति पाहून आपल्या त्यागाचें चीज झालें अशा प्रत्ययाचा

आनंद पुढें मिळतोच. इतकें कशाला, कांहीं एका कारणासाठीं आपल्या प्रेमाचा त्याग करणाऱ्या तरुणालाहि तो त्याग करतां येतो याचें कारण त्या त्यागामुळें ज्या स्त्रीवर आपण प्राणापलीकडे प्रेम केलें ती निरंतर सुखी झाली या जाणीवेचा आनंद त्याला कायमचा लाभतो हेंच होय.

स्वार्थत्यागाची थोरवी खोटी ठरविण्याच्या हेतूनें मी हें लिहीत नाहीं. स्वार्थत्यागाबद्दलच्या भ्रामक कल्पना व त्या कल्पनांवर आधारलेल्या सामान्य समजुती दूर करण्यासाठीं हें लिहावें लागत आहे. अर्थात् पुढें लाभणाऱ्या आनंदाच्या व समाधानाच्या उद्देशानें माणूस त्याग करतो असें मी प्रतिपादीत नाहीं. त्यागकृतीच्या वेळीं कर्त्याच्या मनांत त्या भावी समाधानाचा हेतु यत्किंचित्‌हि नसेल. पण हें जितकें खरें तितकेंच तें त्याला पुढें लाभतें यांत संशय नाहीं व तें लाभलें ह्मणजे आपल्या त्यागाचें साफल्य झालें असें त्याला वाटतें यांतहि शंका नाहीं.

वरील विवेचन थोडेसें पारिभाषिक व दुर्बोध झालें असल्यास माझा इलाज नाहीं. त्याचा थोडक्यांत मथितार्थ इतकाच कीं, स्वार्थत्याग करणाऱ्या व्यक्तीला त्या त्यागाचें चीज झाल्याचा प्रत्यय जितका येईल तितका एक अवर्णनीय सात्विक आनंद लाभेल.

आणि स्वार्थत्यागाचें चीज केव्हां होतें ?

जेव्हां त्याग करणाऱ्या व्यक्तीच्या आंगीं मोठेपणा असतो तेव्हां.

ह्मणून तरुण स्त्रीपुरुषांनीं आपल्या अंगीं आधीं व्यक्तित्व आणलें पाहिजे. हत्याराला धार आल्याशिवाय त्याचा उपयोग नाहीं, तद्वत व्यक्तित्वाखेरीज स्वार्थत्यागाची फलश्रुति नाहीं.

त्यागाच्या मानसिक तयारीचेंहि तत्वत: मोल आहेच. परंतु भावनांचें जें समाधान तरुणांना मिळावयास हवें तें आततायी त्यागानें प्राप्त होत नाहीं. यासाठीं तरुण स्त्रीपुरुषांनीं शक्य तितकें अधिक व्यक्तित्व संपादलें पाहिजे. लोकांना सुख द्याव-याचें असेल तर सुख निर्माण करण्याचें आपलें सामर्थ्य वाढविलें पाहिजे. सृष्टींतील व संसारांतील आनंदाचा व आल्हादाचा अंश वेंचून तो भोंवतालच्या लोकांस देण्याची पात्रता प्रत्येक तरुण स्त्रीपुरुषानें अंगीं आणली पाहिजे. ही कशी आणावयाची हा मोठा प्रश्न आहे. त्याचाच आपण आतां विचार करूं.

तारुण्याचे पूर्वकाल व उत्तरकाल असे दोन भाग कल्पिले तर असें ह्मणतां येईल कीं उत्तरकाल हा अंगच्या कर्तबगारीच्या व्ययासाठीं आहे व पूर्वकाल हा कर्तबगारीचा संचय करण्यासाठीं आहे. "काय करावें हो, अमुक केलें कीं आह्मी सुखी होऊं हें आह्माला कळतें आणि लोकांसाठीं अमुक गोष्टी केल्या पाहिजेत हेंहि आह्माला स्पष्ट दिसतें. पण — आमच्यांत बळच नाहीं त्याला काय करावें!" असें दीनवाणीनें ह्मणणारीं माणसें कांहीं थोडथोडकीं भेटत नाहींत. या लोकांनीं आपल्या तारुण्याचा पूर्वकाल सर्वथा वाया घालविलेला असतो. तारुण्याच्या पूर्व-कालाच्या वेळीं असमंजसपणामुळें त्या काळाचें महत्व आपण ओळखीत नाहीं. पुढें पश्चात्ताप करण्याचे प्रसंग आले आणि मान वळवून मागें पाहिलें ह्मणजे मात्र सोन्याच्या डोंगरावरून आपण चालत आलों आणि चिमटभरसुद्धां सोनें उचलून घेतलें नाहीं असा उमज पडतो. पण या पश्चात्तापाचा कांहीं उपयोग नसतो. एकदां वर्षाकाल निघून गेल्यावर नदीला कितीहि वाटलें

कीं आपण जलसमृद्ध असायला पाहिजे तरी त्याचा काय उपयोग ?

ह्मणून तारुण्याचा पूर्वकाल अत्यंत मोलाचा आहे. व्यक्तित्वाचा विकास करण्याचा खरा काल हाच होय. अंगीं अनेक प्रकारचें तपश्चर्य, अनेक प्रकारचें सामर्थ्य, अनेक प्रकारची सिद्धि सांठविण्याचा योग्य काल हाच होय. अखेरी साधण्याचें महत्व गंजीफांच्या डावांत असेल, पण जीविताच्या डावांत सुरवात साधण्याचेंच महत्व अतिशय आहे.

या पूर्वकालांत तरुण स्त्रीपुरुषांनीं शिक्षण संपादन करावयाचें असतें हें सर्वांनाच समजतें. वाचकांपैकीं सतरापासून तों बावीस वर्षांपर्यंतचे जे असतील ते शाळेंत किंवा कॉलेजांत, किंवा कोठल्या तरी धंदेशिक्षणाच्या किंवा इतर शिक्षणसंस्थेंत असतीलच. शाळेंत किंवा कॉलेजांत जाणाऱ्या मुलाची व मुलीची अशी समजूत असते कीं, आपण शिक्षण घेतच आहोंत तेव्हां आपण आपल्या कर्तव्यांत कसूर करीत नाहीं, आपल्या व्यक्तित्वाचा जो कांहीं विकास व्हावयाचा तो आतां आपोआप होईल. पण ही समजूत किती भ्रामक आहे ! त्यांच्या व्यक्तित्वाचा विकास खरोखरच होत असतो काय ? स्वतःला आनंद प्राप्त करून घेण्याचें व इतरांना संतुष्ट करण्याचें सामर्थ्य त्यांच्या अंगीं खरोखरच येत असतें काय ?

मी एकदां एका गांवीं व्याख्यानानिमित्त गेलों व एका गृहस्थांच्या घरीं पाहुणा ह्मणून उतरलों. त्यांचे दोन मुलगे व दोन पुतणे कॉलेजांत जाणारे होते. जेवणाच्या वेळीं पंक्तींतून आधीं उठूं नये वडील माणसें अंगावरून वावरत असतांना तक्याल.डांन

टेंकून लोळूं नये, पाहुण्याला निरोप देतांना डोक्याला कांहीं तरी घालावें, या साध्या गोष्टीही त्यांच्या गांवीं नव्हत्या. ते मुलगे हुशार नव्हते असें मुळींच नव्हे. पण लोकांचीं अंतःकरणें जिंकण्याच्या कलेचा त्यांना गंधही नव्हता. अशा मुलांच्या अंगीं व्यक्तित्व आलें असें ह्मणतां येईल काय ?

एकदां संध्याकाळच्या वेळीं फिरावयास गेलों असतांना कॉलेजांतला एक हुशार मुलगा मला भेटला. बोलतां बोलतां मीं त्याला ह्मटलें,

'तुला गांतां येतं कां ?'

'नाहीं, सर'

'शिकायला मिळालं नाहीं कीं आवडत नाहीं ?'

(स्तब्ध !)

'चित्रकलेचा तरी नाद आहे कां ?'

('नाहीं' अशी मानेची खूण.)

'इथें बाबूरावांचा मोठा स्टूडिओ आहे तो पाहिला आहेस कां ?'

'नाहीं.'

मीं मनाशीं ह्मटलें 'नशीब' व पुढें विचारलें,

'मी दाखवीन तुला. पाह्यचा आहे कां ?'

'मला काय समजणार त्यांतलं, सर ?'

यावर मी गप्प बसण्याशिवाय दुसरें काय करणार ?

हाही मुलगा कॉलेजांत हुशार ह्मणून गणला जाणारा होता. पण त्याचें व्यक्तित्व विकास पावत होतें काय ? संसारांतला

आनंद घ्यायची पात्रता त्याच्या अंगीं येत होती काय? इतरांचा आनंद वाढविण्याचें तर लांबच राहिलें.

मी एकदां एका स्नेह्यांच्याकडे बसावयास गेलों असतांना त्यांचा कॉलेजांत शिकणारा थोरला मुलगा त्यांना विचारावयास आला,

'दादा, मी महाबळेश्वरास जाऊं कां?'

'कां?'

'भिडे सावकारांचा नाना तेथें जाऊन राहिला आहे, त्याचं पत्र आलं आहे ये ह्मणून.'

'पण तुझी ताई कालच माहेरपणाला इथें आली; अन् तूं निघून जाणार?'

बापाच्या या मोडत्यानें तो मुलगा इतका नाराज झाला कीं आठ दिवस त्यानें घरांत सर्वांशीं अबोला धरला.

हा मुलगासुद्धां अभ्यासांत चांगला होता. पण त्याच्या अंगीं आत्मसंयमन आलें होतें काय? तारुण्याचा पूर्वकाल त्यानें सत्कारणीं लावला होता काय?

शिष्टाचार, जिज्ञासा, आत्मसंयमन यांवाचून कोणत्याहि प्रकारचा थोरपणा अंगीं येणें शक्य नाहीं; आणि थोरवी अंगीं असल्याखेरीज स्वार्थत्यागाचें बीज होणें शक्य नाहीं हें तर निःसंशय होय. हे गुण आमच्या मुलांमुलींमध्यें दिसत नाहींत याबद्दल सध्यांच्या प्रचलित शिक्षणक्रमाला दोष देण्यांत अर्थ नाहीं. आपल्या सामाजिक, धार्मिक किंवा राजकीय जीवनांत कोणताही उणेपणा दिसला कीं त्याचें खापर प्रचलित शिक्षणक्रमावर

फोडण्याचा परिपाठ पडून गेला आहे. पण हा निवळ त्रागा होय. उठल्या सुटल्या दाराशीं बांधलेल्या कोंकराच्या पाठींत दांडके घालून आपला त्रैताग शमविण्यांत शहाणपणा कोणता ?

शाळा कॉलेजांतला शिक्षणक्रम सदोष असेल. त्यांतील दोषांचीच चिकित्सा करावयाची झाली तर मीही एक रामायण लिहून दाखवीन. पण त्या दोषांचा भलत्याच गोष्टींशीं नसता कार्यकारण संबंध जोडण्यांत काय स्वारस्य आहे ? शिष्टाचार, जिज्ञासा आत्मसंयमन इत्यादि सद्‌गुणांचा प्रत्यक्ष परिपोष करण्याची कुवत चालू शिक्षणक्रमांत नसेल. पण या सद्‌गुणांचा विध्वंस करण्यासारखें तर कांहीं या शिक्षणक्रमांत नाहीं ? किंबहुना, या सद्‌गुणांविषयीं ज्याला अभिरुचि आहे त्याला ज्यायोगें थोडेंफार उत्तेजन मिळेल असा कांहीं अंश तरी या शिक्षणांत आहेच ना ?

वस्तुस्थिति अशी आहे कीं ज्यायोगें नोकरीसाठीं अर्ज करण्याची पात्रता अंगीं येते तें शिक्षण अशा भावनेनेंच आमचीं मुलें शिक्षणक्रमांतील पुस्तकांकडे व विषयांकडे पहात असतात. त्यामुळें जो थोडा फार चांगला अंश प्रचलित शिक्षणक्रमांत आहे त्याचाही फायदा त्यांना घेतां येत नाहीं. मुलांमुलींनीं ही भावना टाकून दिली पाहिजे. इतकेंच नव्हे तर शाळा कॉलेजांत मिळणारे जें शिक्षण तें शिक्षण ही संकुचित समजूतही सोडली पाहिजे. ज्या शिक्षणामुळें तारुण्यांतील विविध भावांचा परिपोष होतो आणि स्वतःचें व आपल्या समाजांतील व राष्ट्रांतील लोकांचें जीवित सुखमय करण्याची पात्रता अंगीं येते, तें खरें शिक्षण होय. पण या शिक्षणाच्या शाळा किंवा कॉलेजें कोठें

४३७८

सांपडावयाचीं नाहींत. या शिक्षणाची संस्था ज्यानें त्यानें आपआपल्या अंत:करणांत स्थापन करावयाची असते.

तरुणांच्या ठिकाणीं विचारापेक्षां भावनांचें प्राबल्य अधिक असतें व समाजाला किंवा राष्ट्राला तरुणांचा कांहीं उपयोग व्हावयाचा असेल तर तो त्यांच्या भावनांच्या द्वारेंच व्हावयाचा असतो हें सदा ध्यानांत वागविलें पाहिजे. अर्थात् तरुणांच्या भावना अत्यंत सुसंस्कृत असावयास पाहिजेत. त्यांत राष्ट्राच्या अभ्युदयाचें बीज आहे. आपल्या भावना शक्य तितक्या सुसंस्कृत करण्यासाठीं तरुण स्त्रीपुरुषांनीं आपल्या तारुण्याच्या पूर्वकालांत झटलें पाहिजे. जीं तरुण मुलें शाळा कॉलेजांत नाहींत, कारखान्यांत शिकत आहेत किंवा पैसे मिळवून पोट भरण्यांत गुंतलीं आहेत त्यांनीं देखील 'काय करावें, आपण शिक्षणाला मुकलों' असें वाटून घेऊं नये. खऱ्या शिक्षणाचा जो अर्थ मीं वर सांगितला त्या अर्थी स्वत:चें शिक्षण चालू ठेवणें त्यांनाही शक्य आहे. खऱ्या शिक्षणाच्या शाळेचें दार खुलें आहे. तेथें कोणासहि प्रतिबंध नाहीं. सृष्टींतील विविध वस्तूंपासून आणि संसारांतील विविध अनुभवांपासून आनंद प्राप्त करून घेण्याची व इतरांना तो देण्याची कला ज्याला अवगत आहे तो खरा सुशिक्षित तरुण होय. मात्र सुखाची किंवा आनंदाची शिदोरी कांहीं कोठें तयार करून खुंटीला अडकवलेली नाहीं. ती आयती शिदोरी काढावी आणि सोडावी अशांतला प्रकार नाहीं. आनंद ज्याला निर्माण करतां येतो त्याच्यासाठीं आहे. आणि आनंद निर्माण करण्याची ही शक्ति अंगीं आणावयाची असेल तर सृष्टीकडे व

संसाराकडे पाहण्याची एक विशिष्ट पद्धति साध्य करून घेतली पाहिजे हें तरुणांनीं लक्षांत घ्यावें.

या पद्धतीचें महत्व कोठवर वर्णावें ? ज्यांना सुखसोयींची समृद्धि आहे असे लोक रडक्या तोंडानें कण्हत कुथत असलेले पाहिले व त्यांच्या या दैन्याचें कारण शोधूं लागलें कीं ही पद्धति, हें वळण त्यांनीं स्वतःला लावून घेतलें नाहीं ह्मणून ते रडगाणें गात बसले आहेत असें दिसून येतें. उलट वस्तुतः अगदीं सामान्य परिस्थितींत असूनहि जीं माणसें हंसतमुख राहतात व सर्वांना हवीशीं वाटतात त्यांच्या समाधानाचें कारण शोधूं लागलें तर त्यांनीं ही पद्धती ओळखली व अंगिकारली ह्मणून त्यांना सुखसमाधान लाभलें व इतरांना देतां आलें असें दिसतें. ज्या मनुष्याला स्वतःची अशी कांहीं भूमिकाच नाहीं त्याची स्थिति आंधळ्यासारखी होय. वस्तुमात्राचे विविध चित्तवेधक रंग जसे आंधळ्याला नसल्यासारखेच होत तद्वत् ज्याला मी ह्मणतों ती भूमिका नाहीं त्याच्यावरून सृष्टींतील आणि संसारांतील सुखाचे प्रवाह कितीही वाहून गेले तरी व्यर्थच होय. त्याचें दैन्य कोरडें ठणठणीत रहाणार. उलट सृष्टीकडे व संसाराकडे पाहण्याची विवक्षित दृष्टि ज्याला तारुण्याच्या पूर्वकालांत लागली त्याच्या हातीं स्वतः सुखी होण्याचें व आपला स्वार्थत्याग सफल करण्याचें एक मोठें साधन आलें असें समजावें.

ही भूमिका साध्य करावयाची असेल तर तरुण स्त्रीपुरुषांना ज्या अनेक गोष्टींकडे लक्ष पुरविलें पाहिजे त्या सर्वांची चर्चा येथें करणें शक्य नाहीं. ह्मणून मुख्य गोष्टींचा उल्लेख करून बाकीच्यांची त्या न्यायानें कल्पना करणें वाचकांवर सोंपवितों.

पहिली गोष्ट तरुण स्त्रीपुरुषांच्या ठिकाणीं सर्वगामी अभिरुचि असली पाहिजे.

अशा अभिरुचीवांचून माणसाचा सुखाचा सांठा वाढणें शक्य नाहीं. आमच्या तरुण स्त्रीपुरुषांच्या आवडीनिवडी पाहिल्या ह्मणजे कोणालाहि त्यांच्या संकुचितपणाची कींव येईल. शाळा कॉलेजांत जाणाऱ्या मुलामुलींना नाइलाजानें कांहीं पुस्तकें वाचावीं लागतात तीं वगळलीं तर त्यांना वाचनाची तरी अभिरुचि असते कीं नाहीं शंकाच आहे. मर्दानी खेळाची अभिरुचि फारच थोडयांना दिसते. गतवर्षी आमच्या कॉलेजांत साडेपांचशें तरुण जवान होते व प्रत्येकाला जिमखान्याची सक्ति होती. पण मर्दानी खेळांत भाग घेणाऱ्यांची संख्या जेमतेम शंभर होती. प्रत्येक तरुणानें खेळांत पारंगत झालें पाहिजे असें ह्मणणें नाहीं. अभिरुचि असायला कांहीं पारंगतता संपादावी लागत नाहीं. पण अभिरुचिवाचून त्या त्या खेळांतील मर्म समजत नाहीं व तेवढ्या विषयापासून मिळणाऱ्या सात्विक आनंदाला माणूस पारखा होतो. हॉकीच्या खेळांत साऱ्या जगाची वाहवा मिळवणाऱ्या ध्यानचंदाचें नांव माहीत नाहीं असे शेंकडा ८० विद्यार्थी आमच्या कॉलेजांत होते. वृत्तपत्रांतून येणाऱ्या त्याच्या खेळाविषयींच्या बातम्यांची वाट पहाण्याच्या उत्कंठेचा आनंद या विद्यार्थ्यांनीं कसा अनुभवला असेल ? व तो त्यांनीं उपभोगला नाहीं तर समजा उद्यां आगगाडींत त्यांची व एका झांशीकडच्या माणसाची गांठ पडली तर "कायहो, तुह्मी झांशीचे. तुह्मी ध्यानचंदाचा अजब खेळ पाहिला असेलच !" असा विषय

काढून प्रवासाचा वेळ आनंदांत घालविण्याचें एक मोठें साधन त्यांच्याजवळ नसणार, असें नाहीं काय ?

ललितकलांची अभिरुचि तर आमच्या तरुणांपैकीं शंभरांत एकाला तरी असते कीं नाहीं वानवाच आहे. "अभिरुचि" हा शद्ब मी मुद्दाम वापरीत आहे. नाहींतर नाटकांचीं तिकिटें दर आठवडयाला रिझर्व करणाऱ्या आणि कृष्णा मास्तरचें कोठें गाणें असलें कीं तेथें झुंबड उडविणाऱ्या विद्यार्थ्यांकडे बोट दाखवून कोणी म्हणतील 'विद्यार्थ्यांना आवड पाहिजे म्हणतां ना, बघा ही गर्दी !' या गर्दीला अभिरुचीचें चिन्ह मानायला मी मुळींच तयार नाहीं. बायका नटूनथटून हळदकुंकवाला जातात त्यांतलाच या तरुणांच्या नाटकाला व गाण्याला जावयाचा प्रकार असतो. लोकांत मिरविण्यासाठीं व फॅशन म्हणून ते जातात. चिकित्साबुद्धि बाळगून व उच्च अभिरुचि ठेवून जाण्याची हौस विरळाच. तशी असती तर रंगभूमीवर ज्या कित्येक गलिच्छ प्रकारांचें खुशाल कौतुक होत आहे तें या तरुणांनीं निषेध करून बंद पाडलें असतें. गायनकलेची व आमच्या तरुण स्त्रीपुरुषांची ओळख नटांच्या मार्फतच काय होत असेल ती. त्यामुळें अमुक नट ताना मारतो त्या पलीकडे कांहीं गाणेंच नाहीं अशी त्यांची श्रद्धा असते व दर आठवड्याला लुगडें नेसणाऱ्यांच्या वर्गांत जे येत नाहींत ते गवई वस्तुतः केवढयाहि योग्यतेचे असले तरी त्यांचें गाणें ऐकून घेण्याची त्यांची तयारी नसते. गाणें ऐकण्याची ही कथा, तर गायन शिकण्याबद्दल तर विचारायलाच नको. गाण्याचा "प्रसार" करणाऱ्या वाजाच्या पेटीचा व कांहीं थोडया विद्यार्थ्यांचा थोडासा परिचय

झालेला आढळतो, पण तोहि बहुतेक "किती मजेदार हार" वाजविण्यापुरताच ! सतार व तंबोरा यांतला फरक विचारला तर शेंकडा नव्वदांना सांगतां यावयाचा नाहीं. आणि गळ्यानें गाण्याची तर गोष्टच बोलायची नाहीं. राष्ट्रीय गीत म्हणावयाची वेळ आली तर कोठल्या तरी संगीत विद्यालयाचा 'स्टाफ' भाड्यानें आणावा लागतो. युरोपियन लोकांच्या मोठमोठ्या सभेंत दहा दहा हजार स्त्रीपुरुष एकस्वरानें राष्ट्रगीत ह्मणतात. तसेंच कोणीहि पाहुणा घरीं आला कीं, घरच्या मुलामुलींनीं गाऊन वाजवून दाखवावयाचें हा युरोपियन लोकांत आदरातिथ्याचा एक भाग समजला जातो. या तुलनेनें आमच्या तरुण स्त्रीपुरुषांची अभिरुचि कोणत्या जातीची ठरेल ?

आमच्या तरुणांच्या अभिरुचि संकुचित असल्यामुळें व्यवहारांतील अनेक गोष्टींतील व सृष्टींतील अनेक वस्तूंतील आनंद त्यांना घेतां येत नाहीं, त्यांचें संभाषण चटकदार असण्याऐवजीं मिळमिळीत व गबाळें असतें, आणि त्यांच्या सहवासांत कोणालाच माधुर्य वाटत नाहीं. अभिरुचि संकुचित असली कीं, सुखसमाधानाच्या साधनांच्या बाबतींत मनुष्य दरिद्री होतो. उलट ज्याची जिज्ञासा अमर्याद आहे व अभिरुचि सर्वगामी आहे त्याच्या हातीं परीस असल्यासारखें आहे. कोठल्याहि विषयांतून, कोठल्याहि दशांतून व कोठल्याहि प्रसंगांतून तो आनंदाचें सुवर्ण निर्माण करील व आपल्याइतकेंच इतरांसहि संपन्न करील.

या सर्वांगी अभिरुचीप्रमाणेंच तरुणांच्या आंगीं व्यक्तित्व आणणारी दुसरी एक गोष्ट आहे. ती ह्मणजे विभूतिपूजा.

प्रत्येक तरुण मुलानें व मुलीनें आपल्या आदराचें परम स्थान ह्मणून एक कोणी तरी अलौकिक व्यक्ति सदैव नजरेपुढें ठेवावी. ही व्यक्ति ज्यानें त्यानें आपापल्या आवडीप्रमाणें व श्रद्धेप्रमाणें निवडलेली असावी. ती पौराणिक असो, ऐतिहासिक असो सद्य:कालीन असो. कोणाला रामचंद्र आदर्शभूत वाटेल, कोणाला गांधी वाटतील, कोणाला आपला पिता गुरुस्थानीं मानावासा वाटेल, कोणाला आपल्या प्रेमांतल्या स्त्रीला इतकी मानावी असें वाटेल, इतकेंच काय पण एखाद्याला आपल्याहून चार पांच वर्षांनींच मोठा असलेला मित्रहि इतक्या योग्यतेचा वाटेल. व्यक्तीचा प्रश्न नाहीं, त्या व्यक्तीबद्दल आपल्या भावना अत्यंत उत्कट असल्या पाहिजेत हा मुख्य मुद्दा आहे. ग्राम्य भाषेंत सांगावयाचें ह्मणजे त्या व्यक्तीच्या नांवानें घेतलेली शपथ आपण मोडणार नाहीं इतकी आपल्या मनांत जबर निष्ठा पाहिजे.

मी हें म्हणतों याचें कारण आहे. अंधश्रद्धेचा उपदेश करण्याचें माझ्या मनांत नाहीं. माझी स्वत:ची ईश्वराबद्दल नास्तिक बुद्धि आहे व त्याचीं कारणें पुढील एका प्रकरणांत मी वाचकांपुढें मांडणारच आहे. परंतु मी ईश्वराचें व्यक्तिस्वरूप आणि भक्तिकार्यास्तव अस्तित्व मानीत नसलों तरी धर्म व सदाचार यांवर माझा पूर्ण भरंवसा आहे. तसेंच धर्म व सदाचार यांच्या परिपालनांत माझ्या समजुतीनें असे अनेक प्रसंग येतातच येतात कीं त्या वेळीं माणसाला मोह पडतो, भ्रम वाटतो, कार्याकार्य समजत नाहीं आणि शांत वेळीं केलेले निश्चय लटपटतात. अशा वेळीं कसल्या तरी विशेष सामर्थ्याची गरज असते, कोठून तरी स्फूर्ति मिळावयास पाहिजे असते, कोठून तरी दिव्य वाणी

ऐकावयास आली तर हवी असते, विझत आलेली आत्मबलाची ज्योति सावरणारें तेज कोठून तरी प्रकाशणें आवश्यक असतें. आपल्या मन:चक्षूपुढें एखादी महान विभूति आपण सदैव ठेवली असली तर अशा वेळीं हवी ती स्फूर्ति मिळाल्याशिवाय रहात नाहीं.

शिवाय ऐन तारुण्यांत माणसाचा जीव भावनांवर जगतो हें लक्षांत घेतलें ह्मणजेही विभूतिपूजेचें महत्त्व मी कां मानतों तें कळेल. तरुणांच्या सर्व निर्मल व पवित्र भावना कोठें तरी एका ठिकाणीं संकलित झाल्या तर त्यापासून एक तर त्या तरुणांच्या हृदयाला एक प्रकारचें स्वच्छंदी समाधान लाभतें, आणि खेरीज खाडकन उठून धडाडीनें एखादें कार्य करून टाकण्याची शक्ति त्यांच्या ठिकाणीं सदैव तयार राहते. भावना उचंबळल्याखेरीज असामान्य कृत्यें माणसाच्या हातून घडत नाहींत या दृष्टीनें, व तरुणाला आपल्या बुद्धीपेक्षांहि भावनांची मिजास अधिक राखा-वीशी वाटणें निसर्गप्राप्त आहे या दृष्टीनें—अशा दोन्ही दृष्टींनीं विचार केल्यास माझ्यावरील विवेचनांतील सत्यांश वाचकांस चटकन पटेल.

या एका विभूतिपूजेच्या संवयीनें तरुणाच्या अंगीं आत्म-संयमन, सत्यभक्ति इत्यादि अनेक सद्‌गुण आपोआप येतील असें मी गृहित धरतों, व त्या गुणांविषयींची चर्चा करीत बसत नाहीं. तरुण स्त्रीपुरुषांना निसर्गत: स्वार्थत्यागाचाच विलास ज्याअर्थी सुचतो त्याअर्थी तो स्वार्थत्याग फलदायी व्हावा यासाठीं तारु-ण्याच्या पूर्वकालांत अंगीं व्यक्तित्व आणण्यासाठीं त्यांनीं काय काय केलें पाहिजे त्याचें त्रोटक विवेचन आपण करीत आहोंत.

तऱ्हां इतर तपशिलांच्या भानगडींत न पडतां तरुणांना अत्यंत आवश्यक अशा आणखी एकाच गुणाचा निर्देश करून हें प्रकरण संपवूं.

तो गुण ह्मणजे शालीनता.

विद्या विनयाच्या योगानें शोभते तेवढ्याच अर्थानें मी हें सांगत नाहीं. तर शालीनता हें लोकांचीं अंतःकरणें काबीज करण्याचें एक मोठें हत्यार आहे, ह्मणून मी त्या गुणाला फार महत्व देतों. वाचेचा दुबळेपणा आणि वागण्यांतील लुलेपणा ह्मणजे शालीनता नव्हे. तरुणांच्या बोलण्याचालण्यांत दुबळेपणा दिसलेला कधींच कोणाला खपायचा नाहीं. त्यांचीं उत्तरें ऐटबाज असावींत आणि उठणें बसणें डौलाचें असावें. तरुण मुलींच्या वर्तनांत सूचक लाघव असावें; आणि तरुण मुलांच्या हावभावांत, पोषाखांत, प्रत्येक लहानसहान कृतींत पराक्रमाची व साहसाची आवड प्रतिबिंबित व्हावी. एखादी मुलगी लाकडी खडावा घालून खडाड् खडाड् आवाज करीत, छाती ताठ काढून चाललेली पाहिली ह्मणजे अंगावर शहारे येतात, तसेंच शाळा कॉलेजांतले तरुण मलमलीचीं झिरझिरीत धोतरें टांचेपर्यंत नेसून डोक्यावरचे केसांचे झुपके कानामागें करीत पावले टाकीत चाललेले पाहिले कीं शरमेनें दृष्टि खालीं करावीसें वाटतें. तरुण जवानांच्या चालण्याच्या तऱ्हेंत, पोषाखांत, भाषणांत प्रखरपणा नसला तर तारुण्याची बहार ती कसली ?

परंतु हा प्रखरपणा राखूनही वर्तनांत जें माधुर्य दाखवितां येतें त्याला मी शालीनता ह्मणतों, व ही शालीनता ज्याच्या अंगीं

असेल तें माणूस सर्वांना नेहमीं हवेसें वाटेल. घरांतच्या वडील माणसांशीं, गुरुजनांशीं, आणि वयानें किंवा अधिकारानें जे थोर असतील त्यांच्याशीं वागतांना अनेक तऱ्हांनीं आमच्या मनांतील आदरभाव व्यक्त करतां येण्यासारखा असतो. आमच्या तरुण विद्यार्थ्यांना या कलेचा गंधही नसतो. त्यांच्या मनांत आदर नसतो असें नाहीं. पण तो व्यक्त करण्याची कला त्यांना ठाऊक नसते. कॉलेजच्या प्रिन्सिपालकडे गेल्यावर त्याच्या टेबलाला टेंकून वांकायचें यांत त्यांना कांहींच गैर वाटत नाहीं. कोणी वडील माणूस आपल्या घरीं आलें तर पुढें होऊन त्याच्या हातांतील एखादें ओझें आपण घेणें त्यांना सुचत नाहीं. कोणा अधिकाऱ्याला भेटायला गेल्यास डोक्याच्या टोपीशीं चाळा करूं नये, त्यानें सांगितल्याशिवाय बसूं नये, किंवा परततांना त्याचा अदबीनें निरोप घ्यावा अशा गोष्टी त्यांना कळत नाहींत. या गोष्टी कोणी क्षुल्लक मानीत असतील तर ती चूक आहे. आपल्या बोलण्याचालण्याच्या पद्धतीवरून अर्धें जग आपल्याला ओळखतें हें तरुणांनीं लक्षांत ठेवावें. हुशार तरुणापेक्षांही शालीनतेनें वागणारा तरुण लोकांच्या प्रीतीला अधिक पात्र होतो यांत किमपि संशय नाहीं. आणि व्यवहारांत आपला कार्यभाग साधण्याच्या कामीं विद्वत्तेपेक्षांही मोहक वर्तणुकीचा उपयोग अधिक होतो याबद्दल वाद नाहीं.

असो. सर्वगामी अभिरुचि, विभूतिपूजा आणि शालीनता या गुणांचें जें मी विवेचन येथपर्यंत केलें तें माझ्या मुख्य मुद्यांतील अभिप्राय व्यक्त करण्यापुरतेंच. या किंवा तत्सदृश इतर गुणांचें विस्तारानें विवेचन करण्याचा माझा हेतूच नाहीं. आपला स्वार्थ-

त्याग ज्यास्तींत ज्यास्त फलदायक होण्यासाठीं तरुणांनीं आपल्या अंगीं व्यक्तित्व कसें आणावें तें मला मुख्यतः सांगावयाचें होतें आपलें कुटुंब, समाज किंवा राष्ट्र सुखी करण्याची महत्वाकांक्षा असेल तर सुख निर्माण करण्याची शक्ति तारुण्याच्या पूर्वकालांत कोणकोणत्या रीतींनीं अंगीं आणतां येईल तें मला सूचित करावयाचें होतें. वरील विवेचनानें तेवढें वाचकांच्या लक्षांत झालें असेल ह्मणजे मला पुढील प्रकरणाकडे वळावयास हरकत नाहीं.

प्रकरण ५ वें

# 'आर्य संस्कृतीचें' बुजगावणें!

—=x=—

तारुण्याच्या पूर्वकालांत 'व्यक्तित्व' कसें अंगीं आणावें याची मी मागच्या प्रकरणांत चर्चा केली व ती करीत असतां सर्वगामी अभिरुचि, शालीनता व विभूतिप्रेम या गुणांचा किंचित् विस्तारानें विचार केला. या चर्चेत माझा मुख्य अभिप्राय अर्थातच असा कीं, तरुणांनीं व्यक्तित्व संपादिलें कीं कुटुंबाच्या, समाजाच्या किंवा राष्ट्राच्या सुखासाठीं त्यांनीं केलेला स्वार्थत्याग पूर्णपणें सफल होईल. इतरांच्या सुखासाठीं झटून त्यांच्या सुखाशीं तादात्म्य पावून आत्मसुख साधण्याची तीव्र इच्छा असा स्वार्थत्याग या शब्दाचा मी थोडक्यांत सरळ अर्थ करतों, व हा अर्थ डोळ्यापुढें ठेवूनच आतांपर्यंत मी व्यक्तित्वाचें महत्व वर्णिलें आहे. संसारांतील लहानमोठ्या दुःखांची धार बोंथट करण्याची व साध्यासुध्या प्रसंगांतूनहि आनंदाची निष्पत्ति करण्याची शक्ति कोणत्या गुणांत आहे तें शोधूं लागल्यास सर्वगामी अभिरुचि, शालीनता, विभूतिप्रेम इत्यादि गुणांकडेच लक्ष जातें, व याच कारणासाठीं या गुणांचा स्वार्थत्यागाच्या पूर्व तयारींत मी अंतर्भाव केला.

परंतु या गुणांना मी पूर्वतयारी हें नांव देतों हें वाचकांनीं विसरूं नये. तारुण्याच्या पूर्वकालांत या गुणांचा अभ्यास करावयाचा आहे व अभ्यास हा केव्हांहि साधनरूपच असतो. ज्या इमारतीला शाळा हें पारिभाषिक नांव आहे त्या शाळेंत काय किंवा व्यवहाराच्या विस्तीर्ण शाळेंत काय जो जो कांहीं अभ्यास

आपण करतों तो करण्यांत कोणत्या तरी साध्यावर आपली नजर असते व त्या साध्यासाठीं एक उपयुक्त साधन संग्रहीं टाकण्याची आपली दृष्टि असते.

शिक्षणक्रमांतील विषयांचा आमच्या तरुण स्त्रीपुरुषांना व्हावा तसा फायदा होत नसेल तर त्याचें मुख्य कारण असें आहे कीं, त्या त्या विषयांकडे एक एक महत्वाचें व्यवहारसाधन या दृष्टीनें पाहण्याची बुद्धिच त्यांच्यांत नसते व दुर्दैवानें शिक्षकहि त्यांच्या ठिकाणीं अशी बुद्धि निर्माण करण्याचा यत्न करीत नाहींत. शिवाजीनें सन १६७४ सालीं स्वतःला राज्याभिषेक करून घेतला हें शिकविण्यांत तो चार आंकड्याचा सन विद्यार्थ्यांच्या स्मरणांत रहावा यापेक्षां स्वराज्यसंस्थापनेसाठीं केवढा प्रचंड पराक्रम करावा लागतो व कितीहि प्रबळ राजसत्ता असली तरी सत्याचें पाठबळ घेऊन उठलेल्या लोकमतापुढें ती नामशेष होऊन त्या लोकमतालाच अल्पावधींत राजसत्तेचें वैभवशाली स्वरूप कसें प्राप्त होतें तें विद्यार्थ्यानें आकलन करून घ्यावें हाच हेतु असावयास पाहिजे. भाषा, भूगोल, तत्त्वज्ञान सर्वच विषयांचें असें आहे. अभ्यास हा केव्हांहि साधन म्हणूनच करावयाचा असतो.

या न्यायानें तारुण्याच्या पूर्वकालांत व्यक्तित्व अंगीं आणण्यासाठीं झटल्यानें तरुणाची जबाबदारी संपली असें होत नाहीं हें उघड आहे. ज्या अनेक गुणांबद्दल 'व्यक्तित्व' हा एकच संक्षेपशब्द मी सोयीसाठीं वापरतों त्या गुणांवांचून स्वार्थत्याग निरर्थक ठरेल याबद्दल शंकाच नाहीं. धनुष्याला योग्य तऱ्हेनें ताणलेला गुण चढल्यावांचून त्यांतून बाण सुटणें शक्यच नाहीं. पण केवळ

तो गुण ह्मणजे शरसंधान किंवा तिरंदाजी नव्हे. तिरंदाजी व्हायला लक्ष्य पक्कें ठरलेलें असावयास पाहिजे व तें साधण्याचें कौशल्यहि अंगीं आलेलें पाहिजे. व्यक्तित्व या एका संज्ञेनें ज्या अनेक गुणसमुदायाचा मी उल्लेख करतों त्यांचेंहि असेंच आहे. ते गुण ह्मणजे स्वार्थत्यागसाफल्याचें एक अमूल्य साधन होय. पण या साधनाचा उपयोग कशासाठीं व कसा करावयाचा हा प्रश्न शिल्लक राहतोच व हा प्रश्न कांहीं कमी गोंधळांत पाडणारा नाहीं.

स्वार्थत्याग योग्य व्यक्तीसाठीं, संस्थेसाठीं किंवा तत्वासाठीं झाला तरच तो सार्थ ठरेल, नाहींतर त्या स्वार्थत्यागाला आत्म-हत्त्येचेंच स्वरूप कमी अधिक प्रमाणांत येईल. असा निष्कारण आत्मनाश झालेला अनेक वेळां आपल्या अवलोकनांत येतो. केवळ आप्तेष्टांना आवडत नाहीं ह्मणून हातीं घेतलेला एखादा स्वतंत्र व्यवसाय तरुण माणसें सोडून देतात व पोटापाण्यास मिळविण्यासाठीं ठरीव चाकोरींतून जावयास लागतात किंवा याच्याउलट आपल्या इष्टमित्रांच्या कांहीं हौशी पुरविण्यासाठीं आप्तस्वकीयांच्या हिताकडे तरुण माणसें सर्वस्वीं दुर्लक्ष करतात. किंवा कधीं एखादा तरुण चांगलीशी नोकरी मिळविण्यासाठीं आपलीं धार्मिक व नैतिक मतें खुशाल झाडून मोकळा होतो किंवा एखाद्या क्षुल्लक सार्वजनिक कामासाठीं एखादा माणूस आपल्या कुटुंबांतल्या सर्व मंडळींना विपन्नावस्थेंत बेधडक सोडतो. खोल विचाराअंतीं या सर्व प्रकारांना निरर्थक स्वार्थत्यागाचेच प्रकार ह्मणावें लागेल. प्रमाणशून्य स्वार्थत्याग ह्मणून मागें एकदां असल्या प्रकारांचा मी निर्देश केलेला वाचकांस आठवत असेल.

अशा स्वार्थत्यागाच्या बाबतींत तो करणारानें व्यक्तित्व अंगीं आणलें असलें तरी त्याचें चीज होण्याऐवजीं मातेरें मात्र होईल.

व्यक्तित्व अंगीं आणलें ह्मणजे जमीन नांगरून उत्तम तयार झाली, पण नुसती नांगरणी उत्तम केल्यानें सगळा कार्यभाग आटोपला असें थोडेंच होणार आहे ? पुढचाहि प्रश्न महत्वाचा आहे व काळजीपूर्वक त्याचा विचार झाला पाहिजे. व्यक्तित्व ह्मणजे एक प्रकारची शक्ति, एक प्रकारचें वजन आहे. पण तें अनाठायीं व्यतीत झाल्यास हितसाधनापेक्षां उपहासाची मात्र निष्पत्ति होईल. तरवार हातीं आली असतां एखाद्या मनुष्यानें गवताची कापणी करण्याकडे तिचा उपयोग केला तर कसें काय ? किंवा ऑईल इंजिन हातीं आल्यावर घरांतली भाजी निवडण्यासाठीं तें एखाद्यानें चालविलें तर आपण काय ह्मणूं ? खडतर तपश्चर्येनें देव प्रसन्न होऊन त्यानें वर माग ह्मणून सांगितलें असतां ‘ माझ्या शेजाऱ्याचा द्वाड कुत्रा माझ्यावर नेहमीं भुंकतो तो कधीं मला त्रास देणार नाहीं असें कर ’ असें मागून घेणाऱ्याची योजकता कोणत्या कोटीची ठरेल ?

सारांश विद्वत्ता काय, संपत्ति काय, शारीरिक शक्ति काय, कोणतेंहि साधन हातीं आलें तरी तें कौशल्यानें योजलें तरच सुखनिष्पत्ति होते. जगांत योजकांचीच वाण आहे ह्मणतात तें खोटें नव्हे. ह्मणन व्यक्तित्व संपादल्यानंतर योजकता साधली पाहिजे. हातांत मोतीं आलें तरी हंस दिसले तरच तो चारा पुढें करण्याचा विवेक ठेवतां आला पाहिजे. तारुण्याच्या पूर्वकालांत व्यक्तित्व संग्राहित करायाचें असतें व उत्तरकालांत त्या व्यक्ति-

त्याचा व्यय करावयाचा असतो हें खरें. पण तो व्यय कोणा-साठीं किती करावयाचा व केव्हां करावयाचा हाहि प्रश्न अत्यंत महत्वाचा आहे. कुटुंब, समाज, धर्म, राष्ट्र इत्यादिकांच्या हित-संबंधाचा विचार करतांना व त्या हितसंबंधाच्या बाबतींत आपलें स्वतःचें नक्की कर्तव्य काय तें ठरवितांना तरुणांचा गोंधळ उडतो याचें खरें कारण उपरिनिर्दिष्ट प्रश्नावर त्यांनीं विचार केलेला नसतो. वाढत्या परिघांच्या अनेक वर्तुळांच्या मध्यस्थानीं एखादा बिंदु असावा तशी प्रत्येक व्यक्तीची स्थिति आहे. आप्त-स्वकीय, स्वधर्मीय, स्वदेश-बंधू या सर्वांशींच प्रत्येक व्यक्ति जिव्हाळ्याच्या बंधनांनीं जखडलेली आहे. पण या बंधनाची किती खेंच केव्हां चालूं द्यावयाची त्याबद्दल माणसानें आपा-पल्या ठायीं अढळ विवेक ठेवला पाहिजे.

हा विवेक उत्पन्न व्हावयासाठीं प्रत्येक तरुण स्त्रीनें किंवा पुरुषानें कांहीं बाबतींतलीं आपलीं मतें पक्कीं ठरवून ठेवलीं पाहिजेत. हीं मतें निश्चित नसलीं ह्मणजे स्वार्थ व परार्थ या-विषयींच्या भ्रामक समजुतींचा अंधकार मनांत माजतो व कर्तव्य स्पष्ट दिसत नाहीं. कोणासाठीं किती स्वार्थत्याग करावा तें समजत नाहीं, तारुण्यसुलभ भावनांचा कल्लोळ तर स्वस्थ बसूं देत नाहीं, आणि मग भावनावश वृत्तींत हातून जें कार्य घडतें त्याचे परिणाम सहसा संतोषदायक नसतात. कधीं मातापितरांच्या इच्छेचा मान राखण्यासाठीं, कधीं लोकमताच्या सत्तेचा अवमान घडूं नये ह्मणून, कधीं प्रचलित धार्मिक भावनांची प्रखरता उगीच कमी होऊं नये ह्मणून, अशा अनेक कारणासाठीं आपलीं स्वतःचीं मतें बाजूस ठेवण्याचा प्रसंग प्रत्येक तरुण स्त्रीपुरुषा-

वर अनेक वेळां येतो व अशा प्रसंगीं आपल्या मताचा अभिमान सोडणें हेंच व्यक्तीचें खरें कर्तव्य होय असें स्पष्ट दिसत असतें. ह्मणून प्रत्येक प्रसंगीं तरुणांनीं आपल्या मतांचा बळी द्यावा असें ह्मणणें चुकीचें होईल. उलट, स्वमताबद्दल कठोर आग्रह धरणें हेंच अनेक वेळां उच्चतम कर्तव्य असतें. समाजाच्या किंवा राष्ट्राच्या अंतिम कल्याणासाठीं अमुक प्रकारें वागलें पाहिजे असें आपलें मत असलें, व त्या मताचा आणि आपल्या आप्तस्वकीयांच्या भावनांचा विरोध आला तर त्या भावनांची मातब्बरी न ठेवतां आपल्या मतांचा पुरस्कार करणेंच श्रेयस्कर ठरेल. अशा वेळीं वरवर पाहणाराला आपलें वर्तन स्वार्थाचें व हट्टाचें वाटलें तरी वस्तुतः आपल्या हट्टानें स्वार्थापेक्षां परार्थच साध्य व्हावयाचा असतो. कारण आपण ज्या मतांचा आग्रह धरतों त्या मतांच्या पोटीं शेवटीं मोठें सामाजिक कल्याण निपजल्यावांचून रहात नाहीं.

व्यक्तीचें मत आणि आप्तेष्टांचें समाधान हीं एकमेकांवर आपटतात त्या वेळीं त्या मतांचा विषय जर केवळ त्या व्यक्तीच्या सुखदुःखाची किंवा आवडीनिवडीची एखादी सामान्य खाजगी बाब असेल तर त्या मतांपेक्षां आप्तेष्टांचें समाधानच अधिक महत्वाचें मानलें पाहिजे. आपल्याला कॉलेजच्या वार्षिकोत्स-वाच्या वेळीं नाटकांत काम करावयाचें आहे व आपल्या अंगीं अभिनयकला असून तिचें लोकांकडून कौतुक करून घ्यावें असें आपल्याला वाटत आहे, पण समजा आपल्या वडिलांचें किंवा पालकांचें नाट्यकलेबद्दल अतिशय वाईट मत असून आपण नाटकांत काम केल्यास त्यांस दुःख होईल हें आपल्याला पुरें

माहीत आहे, अशा वेळीं नाट्यकलेच्या थोरवीसंबंधीचीं आपलीं मतें कितीही वाजवी व प्रामाणिक असलीं तरी तीं एकीकडे ठेवणेंच श्रेयस्कर ठरेल. पण उलट, अस्पृश्योद्धारासंबंधीच्या आपल्या मतांस आप्तस्वकीयांचा व समाजाचा विरोध होऊं लागला तर त्या प्रसंगीं मात्र आपल्या मतांचा आग्रह धरल्या-नेंच त्या आप्तांचा व समाजाचा शेवटीं अभ्युदय होणार आहे अशी आपली मनोमय खात्री असेल तर त्यांच्या विरोधाची अवगणना करणेंच उचित होईल.

सारांश व्यक्तीच्या आग्रहांत जेव्हां वैयक्तिक सोयीगैरसोयी पलीकडे किंवा आवडीनिवडीपलीकडे कसलाच भाग नसतो, त्या वेळीं इतर कर्तव्यापुढें आपल्या मतांना माणसानें गौणत्वच दिलें पाहिजे हें जितकें खरें, तितकेंच समाजाच्या, धर्माच्या किंवा राष्ट्राच्या उद्धाराचा ज्यांत संबंध आहे अशीं माणसाचीं कांहीं मतें असलीं तर त्या मतांच्या पुरस्कारासाठीं माणसानें कितीही हटवादीपणा केला तरी तो विचारांतीं स्तुत्यच ठरेल यांतही शंका नाहीं.

मात्र असा हटवादीपणा करण्याचा अधिकार उगीचच्या उगीच प्राप्त होत नाहीं. व्यक्तीच्या मतस्वातंत्र्याला मान्यता सहजासहजीं येत नाहीं. त्या मतस्वातंत्र्यामुळें अंतीं एकंदर सर्वच समाजाचा फायदा होणार आहे असें स्पष्ट दिसलें पाहिजे. याचा अर्थ असा कीं ज्या मतांचा आग्रह धरावयाचा तीं मतें व्यक्तीनें पूर्ण विचारांतीं ठरविलेलीं असलीं पाहिजेत. आपल्या कुटुंबाचें खरें कल्याण कशांत आहे, आपल्या समाजाचा उद्धार कशानें होईल, आपल्या राष्ट्राच्या अभ्युदयाचा काल कशानें जवळ

येईल इत्यादि प्रश्नांवर तरुण स्त्रीपुरुषांनीं स्वतंत्र बुद्धीनें विचार करून आपलीं मतें ठाम करून ठेवावयास पाहिजेत. अशीं दृढ मतें बनविलेलीं असलीं कीं कोणत्या प्रसंगीं कोणता स्वार्थत्याग करावा याबद्दल मतिभ्रंश होत नाहीं, विश्वास चळत नाहीं, आणि पाऊल जोरदारपणें पुढें टाकतां येतें.

हीं मतें ठरवितांना आह्मी तरुण स्त्रीपुरुषांनीं स्वतःच्या तर्कबुद्धीवर सर्वस्वीं विसंबून अर्थातच चालणार नाहीं. प्रत्येक माणसाची विवेचकबुद्धि हीच अखेरचा निर्णय देणारी सत्ता समजली गेली पाहिजे हें तर खरेंच. पण ही बुद्धि परिपक्व व सुसंस्कृत नसली तर अनवस्था प्राप्त होते आणि तरुणांच्या बाबतींत तर ही बुद्धि कच्ची व आंधळी असण्याचा संभव फार. ह्मणून तरुणांनीं आप्तवाक्याची थोरवी विसरूं नये, हें सांगावयास हवेंच. परंतु हें सांगतांना पुष्कळदां अतिरेक होतो. आपल्या आद्य ऋषींनीं श्रुतिस्मृति ग्रंथांत बहुविध ज्ञानाचा अमूल्य संग्रह आपल्यासाठीं ठेवला आहे; आपल्या पुराणांत उपदेशामृताचे घडेच्या घडे आपल्यासाठीं जागोजागीं मांडलेले आहेत, व ही जी ज्ञानपरंपरा आपल्या पूर्वजांकडून आपल्या वांट्याला आली आहे ती इतकी उज्वल आहे कीं वास्तविक आपण बिनधोक कांहीं विचार न करितां, तिच्या प्रकाशांत जो मार्ग दिसेल त्या मार्गानें जावें, अशीं सांगणारीं माणसें कांहीं थोडीं भेटत नाहींत. असें सांगण्यांत तरुण स्त्रीपुरुषांना "संभाळा कदाचित वाट चुकाल हं !" येवढा इशारा देण्याचाच हेतु असेल तर हें सांगणें सर्वस्वीं हिताचेंच ह्मणावें लागेल. लहान मुलाला चालतां येत नसलें ह्मणजे तें थकलेसें पाहतांच आईनें त्याला उच-

ऊन कडेवर घ्यावें यांत त्या मुलाचें हित आहे आणि आईच्या वात्सल्याचाहि मनोहर विलास आहे. पण उलट तें मूल वाढलें तरी त्याचा विचार न करतां नेहमींच 'तुला कुठेंहि जायचं झालं तरी माझ्या कडेवरच यायला पाहिजे' असा आग्रह धरणाऱ्या आईला काय ह्मणावें लागेल ?

तद्वत् सामाजिक, धार्मिक व राष्ट्रीय जीवनासंबंधीचीं मतें ठरवितांना तरुणांच्या बुद्धीला आप्तवाक्याचा आधार प्रसंगीं साहाय्यक होतो याविषयीं वाद नसला तरी त्या बुद्धीची स्वयंसिद्धता सर्वस्वीं कापून टाकणारा उपदेश हितकारक कसा ठरेल? लांब प्रवास करावयास निघालेल्या प्रवाशाला वेळवखत आल्यास उपयोगीं पडावी ह्मणून कोणी दुर्बीण दिली तर तो उपकारच होईल. पण ती देणाऱ्यानें जर 'तूं ही सारखी चोवीस तास आपल्या डोळ्याला बांधून प्रवास केला पाहिजे' असा आग्रह धरला तर तो प्रवासी काय उत्तर देईल ? या न्यायानें आपल्या परंपरेची दुर्बीण माणसानें जवळ बाळगून वापरावी, तिच्या साहाय्यानें कधीं कधीं नुसत्या तर्कशक्तीस धूंधूक दिसणारे प्रदेश त्याला स्पष्ट दिसतील असें प्रतिपादल्यास तें सरळच होईल. पूर्वेतिहासाच्या ज्ञानानें कालमार्गावरचा पुढचा प्रदेश स्पष्ट दिसतो असें कांहीं अंशीं मानतां येईल. पण, इतिहासाला किंवा आप्तवाक्याला प्रामाण्यसर्वस्व देण्यांत कोणतें शहाणपण आहे ?

कांहीं एका विशिष्ट विचारसरणीच्या लोकांकडून वैदिक परंपरेच्या आणि आर्यसंस्कृतीचा इतका कांहीं बडेजाव माजविण्यांत आलेला आहे व येत आहे, कीं त्या कोलाहलांत तरुण स्त्री

पुरुषांस सामाजिक व राष्ट्रीय जीवनाविषयींचीं आपलीं मतें शुद्ध बुद्धीनें बनविण्याइतकी शांतताच मिळत नाहीं. तारुण्यांत मुळीं माणसाला स्वभावत: मध्यम पंथ फारसा रुचत नाहीं. अतिशयोक्ति आणि अतिप्रचार यांची तरुणांच्या मनाला साहाजिकच विशेष गोडी वाटते. त्यामुळें इंग्रजी अंमदानीच्या प्रारंभीं ज्याप्रमाणें 'साहेबाचें सारें चांगलें ' असा तरुण पिढीनें ध्यास धरला, त्याप्रमाणें आजकाल राजकीय युद्धाची रणभेरी वाजत असतांना ' जें वैदिक तेवढेंच चांगलें ' ही जुनी तुतारी कोणी फुंकली तर ती लोकांना मोहक वाटावी हें साहाजिकच आहे. आत्मस्तुति व परनिंदा हीं माण-साला केव्हांहि प्रियच असतात, कारण त्यामुळें आळसाला प्रशस्त सबब मिळते आणि प्रगतीची कटकट दूर सारतां येते. बुद्धि ही मनुष्याची विशिष्ट शक्ति आहे असें जीवशास्त्रज्ञ सांगतात. पण ही शक्ति वापरण्याचे श्रम घेण्याऐवजीं ती गंजत ठेवण्याकडेच माणसाचा नैसर्गिक कल असलेला दिसतो. त्यामुळें आपलीं मतें बनविण्यास उद्युक्त झालेल्या तरुण स्त्रीपुरुषांना ' आपल्या वैदिक संस्कृतींत सारें ज्ञान सांठलेलें आहे. त्यापलीकडे विचार करणें आत्मघातकीपणाचें आहे ' असें कोणी सांगितलें कीं हा आळ-साचा महामंत्र त्यांना प्रिय वाटतो व आपल्या स्वतंत्र बुद्धीला कायमची रजा द्यावयास ते उद्युक्त होतात.

वैदिक संस्कृतीच्या अभिमानाचें आळसाचा महामंत्र असें मी वर्णन केलेलें पाहून कित्येक वाचकांच्या भुंवयावर निषेधाची अढी चढलेली मी कल्पनेनें पाहूं शकतों. पण हें वर्णन त्या संस्कृतीच्या वाजवी अभिमानाचें नसून आत्यंतिक अभिमानाचें आहे ही गोष्ट त्यांनीं लक्षांत ठेवावी. असल्या आत्यंतिक अभि-

मानानें तरुणांची बुद्धि मलिन होते असें माझें प्रामाणिक मत आहे, व तरुणांची अशी दिशाभूल करण्यांत समाजाचें किंवा राष्ट्राचें यत्किंचितहि हित नाहीं असें मी समजतों.

'वैदिक परंपरा' व 'आर्यसंस्कृति' हे सिंहनाद अनेक वेळां कानीं येतात, व जेव्हां जेव्हां ते मी ऐकतों तेव्हां तेव्हां मी घोंटाळ्यांत पडतों. वैदिक परंपरा ह्मणजे नक्की काय? आर्य-संस्कृति ह्मणजे काय? हा काय एखादा कुराणासारखा एकटाकी लिहिलेला ग्रंथ आहे कीं ज्यांत अंधविश्वास ठेवून व दरघडीं अर्थाची ओढाताण करून पाळण्यासारखे कां होईना, माणसानें अमुक करावें व अमुक करूं नये असे तयार नियम ओळीनें नमूद करून ठेवले आहेत? आधीं एक वेद घेतला तरी तोही एकाच ऋषीनें लिहिलेला नाहीं. असे अनेक वेद आहेत. आणि 'वैदिक परंपरा' ह्मटली कीं तींत नुसत्या वेदांचाच नव्हे तर इतर किती तरी वाङ्मयाचा अंतर्भाव होतो. अशा या प्रचंड वाङ्मयसंचयाला प्रामाण्यसर्वस्व देण्याची कल्पना धाडसाचीच ह्मटली पाहिजे. जी गोष्ट प्रमाण ह्मणून मानावयाची ती अत्यंत स्पष्ट; एकजिनसी व असंदिग्ध असली तर तिच्या प्रामाण्याचा उपयोग. वेगवेगळ्या कालखंडांत आणि भिन्न भिन्न परिस्थितींत अनेक पंडितांनीं लिहिलेल्या ग्रंथांच्या एका समुच्चयांत हा स्पष्ट-पणा व एकजिनसीपणा सांपडेल काय? एका शहाण्याचा सल्ला ऐकावा, पण दहा शहाणे सल्ला द्यायला लागले कीं कानांत बोटें घालावीं ह्मणतात. या न्यायानें 'वैदिक परंपरा' या संदिग्ध आणि बहुजिनसी वस्तूचें महत्व बेताचेंच मानावें लागेल.

'आर्यसंस्कृति' या शब्दप्रयोगांतहि अधिक तथ्य नाहीं. चिंध्यांचा चेंडू उलगडून पाहूं लागलें तर ज्याप्रमाणें शेंकडों तुकडे हातीं येतात तद्वत् या शब्दाचें पृथक्करण केल्यास हातीं एक असंदिग्ध गोष्ट सांपडायची आशाच नको. संस्कृति या शब्दाचा धात्वर्थ पाहून 'आर्यसंस्कृति' या प्रयोगाचा अर्थ केला तर आर्य लोकांनीं घासून, पुसून तयार केलेली आचारविचारांची पद्धति असाच करावा लागेल. पण हे आर्य कोणते? हे आर्य म्हणजे कांहीं कोणी आचारविचारांच्या एका ठरीव सांच्याच्या गांठोड्यासकट स्वर्गांतून एकदम पृथ्वीवर अवतरलेले प्राणी नव्हेत ना? ते हिंदुस्थानांत प्रथम वसाहत करून राहूं लागले तेव्हां काळ व परिस्थिति यांच्या मानानेंच त्यांनीं आपल्या आचारविचारांना वळण दिलें ना? आणि पिढीगणिक जे नवे-नवे आर्य झाले त्यांनींहि आपापल्या भिन्न परिस्थितीच्या धोरणानेंच त्या वळणाला कमी अधिक मुरड घातली ना? आणि आर्य-संस्कृति म्हणजे अमुक एक कांहीं अचल, अनाद्यनंत, शाश्वत, आचारविचारांचा समुच्चय आहे असें कसें मानतां येईल? आणि अमुक नव्या विचारांचा व आचारांचा त्यांत अंतर्भाव होणें अशक्य आहे असें तरी कसें प्रतिपादतां येईल.

सारांश, वैदिक परंपरा किंवा आर्यसंस्कृति या शब्दांना कांहीं एका मर्यादेपलीकडे निश्चित अर्थ नाहीं; आणि असल्या संदिग्ध कल्पनांचें दैवत कल्पून स्वतंत्र विचार करणाऱ्या आजच्या तरुण स्त्रीपुरुषांना त्या देवतेच्या कोपाचें भय घालण्यांत व भेडसावण्यांत काय अर्थ आहे? शिवाय, आर्यसंस्कृति म्हणजे तरी त्या त्या परिस्थितींत जीवनक्रम सुखाचा व्हावा म्हणून आर्यांनीं मान्य

केलेले विधिनिषेधच ना ? मग आमच्या पूर्वजांनीं परिस्थित्यनुरूप विधिनिषेध ठरविले त्याप्रमाणें आजच्या नव्या परिस्थित्यनुरूप नवे विधिनिषेध आमचे आह्मी ठरवूं लागलों तर त्याला प्रत्यवाय कां ? जो हक्क आमच्या पूर्वजांना होता, व जो हक्क पूर्णतेनें गाजवल्यामुळेंच आमचे पूर्वज तेजस्वी व पराक्रमी ठरले तो हक्क आज आह्मांला मात्र नसावा ? आह्मी मात्र आजची परिस्थिति कशीहि असली तरी त्या आमच्या पूर्वजांच्या जुन्या शहाणपणावरच सर्वस्वीं विसंबावें ?

गुणविकासवादाप्रमाणें पाहतां माणूस काळाबरोबर अधिकाधिक शाहणा होत जातो असेंच समजलें पाहिजे. नवीं नवीं शास्त्रें व कला माणूस शिकतो, भूगोलाचे नवे नवे प्रदेश त्याला ज्ञात होतात, सृष्टींतील नव्या नव्या रहस्यांचा माणसाला उलगडा होतो, नव्या नव्या निसर्गशक्तीवर त्याचें प्रभुत्व स्थापित होतें व त्याची बुद्धि अधिकाधिक कार्यक्षम होत जाते.

पण आर्यसंस्कृतीची ललकारी मारणाऱ्यांचें मत असें दिसत नाहीं. त्यांची श्रद्धा अशी कीं, माणूस उत्तरोत्तर महामूर्ख होत चालला आहे, हजारों वर्षांपूर्वी वेदकाळांत ज्ञानाची पराकोटी होऊन गेली व हल्लीचीं पाखंडशास्त्रें व कला यांजकडे लक्ष न देतां तरुणांनीं आपले आचारविचार वैदिक कित्त्याबरहुकूम ठेवावेत.

हा उपदेश न मानावा तर आर्यसंस्कृतिवाल्यांकडून हरप्रकारचा आहेर पदरीं घ्यावा लागतो. एक तर जुनें वळण बदलायचा कोणी प्रयत्न केला कीं ' उंः ! असे हजारो हल्ले आर्यधर्मावर व आर्यसंस्कृतीवर येऊन गेले पण हल्ले करणारे नामशेष होऊन

आमचा धर्म व आमची संस्कृति मात्र अढळ राहिली आहे!' हे पुराणाभिमान्यांचे उद्गार ठरलेले आहेत. प्रत्येक नव्या सुधारकी हल्ल्याबरोबर आर्यधर्म व आर्यसंस्कृति वास्तविक बदलतच गेली आहे याची त्यांना आठवण रहात नाहीं, व नवमतवाद्यांना 'क्षुद्र मशक' ही पदवी ते बहाल करतात. शिवाय स्वतंत्र विचार करणारांना धर्मलंड, देशद्रोही वगैरे शेलकीं विशेषणें द्यायला ते मागेंपुढें पहात नाहींत. अशा परिस्थितींत आपलीं सामाजिक, धार्मिक व राष्ट्रीय मतें स्वतंत्र बुद्धीनें ठरविणें सोपें नाहीं.

पण तरुण स्त्रीपुरुषांनीं हें कठिण काम केलें पाहिजे, हें पटविण्यासाठींच इतका विस्तार केला. स्वार्थत्यागाला व्यक्तित्वाचें आधिष्ठान पाहिजे व स्वार्थत्यागांत प्रमाणशीरपणा पाहिजे हीं माझ्या एकंदर विवेचनाचीं मध्यवर्ति सूत्रें आहेत त्यांपैकीं पहिल्याची फोड मी पूर्वीच्या प्रकरणांत केली; आणि या प्रकरणांतील मुख्य मुद्दा असा कीं तारुणांच्या स्वार्थत्यागांत प्रमाण राहण्यासाठीं त्यांनीं आधीं आपलीं कांहीं मतें दृढ ठरवून ठेवलीं पाहिजेत. हीं मतें ठरवितांना परंपरेचा व संस्कृतीचा वृथाभिमान बाळगण्याचा मोह कसा साहजिक आहे व कां टाळला पाहिजे हें मुद्दाम स्पष्ट केलें. या सामान्य विवेचनाच्या धोरणानेंच आतां मी यापुढें एकेक प्रश्न घेऊन त्याबद्दल तरुणांचीं मतें काय असावयास पाहिजेत त्याचा उहापोह करणार आहे.

## प्रकरण ६ वें

# प्रापंचिक आनंदाची थोरवी.

---

स्वार्थत्यागाची यौवनसुलभ वृत्ति सुपरिणामी व्हावयास एक तर त्या स्वार्थत्यागाला व्यक्तित्वाचा आधार पाहिजे व शिवाय त्यांत प्रमाणबद्धता राखली गेली पाहिजे; आणि प्रत्येक तरुण स्त्रीपुरुषानें आपापल्या मनाशीं मुख्य मुख्य कौटुंबिक, सामाजिक, धार्मिक व राजकीय प्रश्नांवर आपलीं मतें स्वतंत्र बुद्धीनें दृढ बनविल्याखेरीज ही प्रमाणबद्धता साधणें कठीण आहे हें आतांपर्यंत स्पष्ट केलें.

यापुढचा मुद्दा अर्थातच या मतांचा. हीं मतें कशी असावींत? हीं अमुक असावींत असें सांगण्यापूर्वी एक खुलासा केला पाहिजे. तो हा कीं तीं अशा अशा स्वरूपाचींच असावींत असें ह्मणण्यांत प्रत्येक तरुण स्त्रीपुरुषानें तीं मुकाट्यानें ग्राह्य मानून घ्यावीं असा माझा अभिप्राय नाहीं. किंबहुना तशीं तीं मानलीं गेलीं तर मला खेदच होईल. प्रत्येक स्त्रीनें व पुरुषानें स्वतंत्र बुद्धीनें विचार करून आपापलीं मूलभूत मतें ठरवावीं असें तर मी सारखें कटाक्षानें ह्मणत आहे व हें प्रतिपादण्यासाठींच आर्य-संस्कृति, आर्यपरंपरा याविषयीं चार अधिक उणे स्पष्ट शब्द लिहिण्याचें धाडस मीं केलें. तें केल्यानंतर मींच पुन्हां तरुणांचीं मतें अमुक अमुक असावींत असें ह्मणावें यांत संगति ती काय राहिली? तेव्हां यापुढें जें मी विविध मतांचें दिग्दर्शन करणार आहे तें अशा अभिनिवेशानें मुळींच नव्हे कीं तीं बॉम्बे बँकेच्या

हमखास हुंड्यांप्रमाणें वाचकांनीं डोळे मिटून स्वीकारावीं. कांहीं प्रश्नांवर विचार करावयाचा झाल्यास मी कसा करीन तेवढेंच दर्शविण्याचा माझा हेतू आहे. पुष्कळांच्या स्वतंत्र बुद्धीला त्यांतील मर्म पटून तीं ग्राह्य वाटलीं तर फारच बरें. नाहीं तर निदान तावून सुलाखून घ्यायला कांहीं तरी विचारवस्तू तरुणांच्यापुढें ठेवल्याचें समाधान तर मला मानतां येईल? या समाधानापलीकडे फारशी इच्छा न ठेवतांच पुढील प्रश्नांची चर्चा मी करीत आहे.

पहिला प्रश्न कुटुंबाचा. वाढत्या परीघांच्या अनेक समांतर वर्तुळांच्या मध्यबिंदूसारखी प्रत्येक व्यक्तीची स्थिति आहे हें माझें ह्मणणें वाचकांनीं पुन्हां एकदां ध्यानांत घ्यावें. या कमी अधिक अंतरावरील वर्तुळांशीं जसा त्या मध्यबिंदूचा संबंध असतो तद्वतच अनेक व्यक्तींशीं, संस्थांशीं व कार्यांशीं व्यक्तिमात्राचा कमी अधिक निकट संबंध येतो. स्वार्थत्यागाच्या वेळीं निकटपणाचें हें स्वाभाविक प्रमाण सहसा सुटूं नये. अर्थातच समाज किंवा राष्ट्र यांच्या आधीं कुटुंबाच्या हिताहिताचा विचार व तें आपल्या हातून ज्यास्तींत ज्यास्त कसें साधेल याविषयींचा निश्चय प्रत्येकानें करावयास पाहिजे.

याचा अर्थ असा खास नव्हे कीं केव्हांहि राष्ट्रीय कार्यापेक्षां कौटुंबिक चरितार्थांतच माणसानें मग्न रहावें. राष्ट्राच्या इतिहासांत असे अनेक प्रसंग येतात कीं त्या वेळीं प्रस्तुत कुटुंबसौख्य लाथाडण्यांतच भावी कुटुंबसुखाचें बीज असतें. अशा वेळीं कुटुंबहिताची कोती कल्पना उराशीं बाळगल्यास राष्ट्राचा घात होईल एवढेंच नव्हे तर कौटुंबिक कल्याणही नष्ट होईल.

पण असल्या अपवादात्मक निकराच्या प्रसंगासाठीं प्रस्तुत चर्चा नाहींच. सामान्य परिस्थितींत तरुणांच्या आचारविचारांचें स्वरूप कसें असावें हेंच सांगण्याचा माझा उद्देश आहे व त्या धोरणानें कुटुंबाच्या हिताचाच विचार सर्वांत आधीं कर्तव्य ठरेल.

मग पाहूं तर. आपल्या कुटुंबाचें कोणत्या प्रकारचें हित आपण सर्वांत महत्त्वाचें समजलें पाहिजे ? व तें आपल्या हातून ज्यास्तींत जास्त कशा प्रकारें साध्य होईल ?

कोणी म्हणतील कीं या प्रश्नाचें एकच असंदिग्ध उत्तर हें कीं आपल्या कुटुंबाची सांपात्तिक स्थिति ही सर्वांत महत्त्वाची बाब होय व ती सुधारण्यासाठीं आपण शक्य तितकें झटलें पाहिजे. कुटुंबांतील सर्व मंडळींच्या उपयोगी पडण्याचा एकच निःसंदेह उपाय हाच कीं त्यांना पैशाची ददात पडूं द्यावयाची नाहीं व त्यासाठीं आपण खूप पैसा कमावायचा. साऱ्या कौटुंबिक दुःखांचें व असंतोषाचें कारण दारिद्र्यच होय. तेंच जर पैशाच्या जोरानें आपण नष्ट केलें तर कुटुंबाच्या कल्याणाला बाध यावयाची भीतिच कोठें उरली ?

किंवा कोणी ह्मणतील कीं आपल्या आप्तेष्टांविषयींचें व कुळा-विषयींचें माणसाचें आद्य कर्तव्य म्हणजे माणसानें कीर्ति मिळ-विली पाहिजे. पैशाची येवढी मातबरी नाहीं, पण प्रत्येक तरु-णानें आपल्या कुळाचें नांव वाढविलें पाहिजे. मातापितरांना व बायकांपोरांना धड मीठ भाकरही खाऊं घालतां आली नाहीं तरी मोठेंसें बिघडत नाहीं, पण असामान्य लेखक, शोधक किंवा लोकनायक ह्मणून माणसाची दिगंत कीर्ति झाली तर त्यांत कुळांच्या दहा पिढ्यांची भूक भागली असें कोणीहि समजेल.

या दोन्ही समजुती त्या त्या अर्थी खऱ्या आहेत, पण त्यांमुळें त्यांच्याहूनहि अधिक महत्त्वाचा एक विचार आहे तो दृष्टीआड होत असले तर त्या विघातक ठरतील. तो विचार हा कीं आपल्या कुटुंबासाठीं पैसे मिळविणें किंवा कुलकीर्ति वाढविणें या दोहोंपेक्षांहि आपल्या कुटुंबांतला व प्रपंचांतला आनंद कायम ठेवण्याचेंच कर्तव्य माणसानें अधिक महत्त्वाचें मानलें पाहिजे. भाकरीपेक्षां इतर किती तरी अधिक गोष्टींची माणसाला भूक असते अशी एक इंग्रजींत ह्मण आहे. तिच्याच धर्तीवर आपल्याला असें म्हणतां येईल कीं प्रपंचाचें कल्याण कांहीं केवळ संपत्तीवरच अवलंबून नाहीं. संपत्तीचा पूर वहात असला तर प्रपंचांतल्या दुःखाकष्टांचा गाळ भराभर वाहून जातो हें नाकबूल कोण करील? परंतु संपत्ति आणि प्रापंचिक आनंद यांचें सरळ समीकरण खचित मांडतां यावयाचें नाहीं.

कीर्तीची बाब संपत्तीपेक्षांहि अधिक संदिग्ध आहे. असामान्य कवि दरिद्री असला तरी हजारों वाचकांचीं अंतःकरणें तृप्त करूं शकतो, पण त्याच्या कुटुंबांतलीं माणसें त्यावर कितीशीं संतुष्ट असतात, त्याबद्दल जबरदस्त शंकाच आहे. किंबहुना कवीला काय, किंवा कोणत्याही मोठ्या माणसाला काय घरांत कोणी मानीत नाहींत ही ह्मण सामान्यतः खरीच ह्मणावी लागेल. ह्मणून संपत्ति,कीर्ति इत्यादि गोष्टी प्रापंचिक आनंदाची आनिश्चित साधनें ठरतात. या आनंदाची महति सर्वांत अधिक आहे यांत संशय नाहीं व हा आनंद आमच्या कुटुंबांतून फार क्वचित दिसून येतो यांतही शंका नाहीं. पांच सहाशें रुपये पगारदाराचीं माणसें मोटारींत हिंडतात फिरतात, त्या वेळीं त्यांना जो हर्ष होतो त्याला मी

प्रापंचिक आनंद समजत नाहीं, किंवा गुडघाभर उंच मऊ गादीवर निजायला मिळाल्यावर संपन्न तरुणाच्या धर्मपत्नीला जें सुख होतें तेंही या आनंदाचें उदाहरण मानतां येणार नाहीं. ज्याला मी प्रापंचिक आनंद ह्मणतों त्याची जाति फार वेगळी आहे. तो इंद्रियगम्य नाहीं, तो धनदौलतीवर अवलंबून नाहीं, सामान्य सुखसाधनानीं तो मिळत नाहीं. तो सूक्ष्म असतो, अंतःकरणानेंच अनुभवितां येतो, आणि एखादा सूक्ष्म, सफाईदार सेंट कपड्यांच्या कपाटांत सांडला ह्मणजे साऱ्या घरांत जसा तो दरवळल्यासारखा वाटतो त्याप्रमाणें हा आनंद कुटुंबांतल्या कर्त्या स्त्रीपुरुषांच्या हृत्कपाटांत असला कीं त्याचा सुवास सर्व घरभर पसरतो आणि कोणाही पाहणाराला त्या संसाराचा हेवा वाटल्यावांचून रहात नाहीं.

हा आनंद संपत्तिसारख्या साधनांनीं उत्पन्न होत नाहीं असें मी ह्मणत आहे. तेव्हां कोणीहि विचारील कीं, मग तो कशानें उत्पन्न होतो ? या प्रश्नाचें थोडक्यांत उत्तर असें कीं तो स्नेहभावानें उत्पन्न होतो. घरांत नुसता पैसा असून उपयोग नाहीं, किंवा कर्त्या तरुण स्त्रीपुरुषांनीं नुसती कीर्ति संपादून चालायचें नाहीं, तर कुटुंबांतील प्रत्येक व्यक्तीस इतरांविषयीं स्नेहभाव वाटला तरच मी ह्मणतों त्या प्रापंचिक आनंदानें तें घर भरलेलें दिसेल.

स्नेहभाव ?

कित्येक वाचक ह्मणतील ही काय नवी वेडगळ कल्पना काढली यांनीं ? कुटुंबांतील मंडळींत परस्पराविषयीं स्नेहभाव ? हः ! कधीं ऐकली नव्हती असली विचित्र कल्पना ! तरुण

स्त्रीपुरुषांनीं वडिलांच्या धाकांत रहावें हा उपदेश आजपर्यंत सूज्ञ लोक करीत आले, पत्नीनें पतीला प्रति परमेश्वर मानावें, असेंहि आमचीं शास्त्रें सांगत आलीं, पण कुटुंबांतल्या माणसांनीं एकमेकांविषयीं स्नेहभाव ठेवावा हें आजच ऐकतों !

असें कोणाला वाटलें तर तें साहाजिक आहे. आर्य कां वैदिक कां काय जी परंपरा आहे ह्मणतात तिला अनुसरून आमची जी कौटुंबिक राहणी रूढ झाली आहे तिच्यांत स्नेहभावाला कोठें स्थानच नाहीं, आणि त्यामुळें प्रापंचिक आनंद ही वस्तु कोणाला माहीतच नाहीं. आमच्या समाजांत शेकडा नव्वद कुटुंबें दारिद्र्यानें गांजलेलीं आहेत ह्मणून असें असेल असें मानतां येत नाहीं. शेकडा एखादें जें श्रीमंताचें घर असतें व शेकडा नऊ जीं मध्यम स्थितींतलीं कुटुंबें असतात त्यांत तरी प्रापंचिक आनंद काय मोठा वांया चाललेला असतो ? वडील माणसें तरुणांवर नाराज असतात, तरुण स्त्रीपुरुष वडील माणसांवर चिडलेलीं असतात, बहीण भावांचें सूत नसतें आणि पतिपत्नींचेंहि गोड, लाडकें रहस्य असतें कीं नाहीं शंकाच आहे.

आणि या सगळ्याचें कारण हेंच कीं स्नेहभावाचें महत्व आह्मांला मुळीं कळलेलेंच नाहीं, आणि ज्या रुक्ष तऱ्हेच्या कौटुंबिक राहणीची आह्मी संवय करून घेतली आहे, तिला आर्य, वैदिक असलीं भडक नांवें देऊन तिची आयुर्मर्यादा शक्य तितकी वाढविण्याची आह्मी खटपट करीत आहोंत.

माझें ह्मणणें कडू आहे ह्मणून तें खोटें आहे असें ठरविविण्याचा कोणाला मोह होत असेल तर तो नाहींसा करण्याची

माझी तयारी आहे. असा विचार करूं कीं शिक्षणक्रम संपवून मिळविल्या झालेल्या तरुणांचें वय सामान्यत: पंचवीस ते तीस वर्षांचें असतें, व अशा तरुणाचा तीन प्रकारच्या व्यक्तींशीं संसारांत संबंध येतो. एक त्याच्याहून वयानें मोठी अशी आई-बाप किंवा इतर थोर नातलग मंडळी, दुसरें त्याच्या साधा-रण बरोबरीची त्यांची पत्नी; आणि तिसरें घरांतली लहान मंडळी किंवा त्याला स्वत:लाच झालेलें एखाद दुसरें मूल.

आमच्या परंपरागत संस्कृतीप्रमाणें हे तीन संबंध कशा तऱ्हेनें पाळले जातात तें पाहूं ह्मणजे त्यापासून प्रापंचिक आनं-दाचा लाभ होणें किती असंभवनीय आहे तें आढळेल, व तरुण स्त्रीपुरुषांनीं यापुढें कौटुंबिक व्यवस्था अगदीं वेगळ्या तत्वावर केली पाहिजे या माझ्या प्रतिपादनांतील मर्महि ध्यानांत येईल.

प्रथम आमच्या हिंदू कुटुंबांत आईबाप किंवा पालकस्थानीं असलेलीं वडील माणसें व तरुण स्त्रीपुरुष यांचे परस्पर संबंध कशा प्रकारचे असतात पाहूं.

आईबापांना असें वाटतें कीं तरुणांच्या मनांत आपल्याविषयींचा आदर कायम ठेवायचा असेल तर त्यांच्याशीं फारसें मिळून मिसळून वागून उपयोगी नाहीं. दिवसाकांठीं जेवायच्या वेळीं एखाद दुसऱ्यांदा तरुणांच्या व वडील माणसांच्या गांठी भेटी पड-तील तेवढ्याच. त्या व्यतिरिक्त त्यांचें कधीं एकत्र बसणें उठणें व्हायचें नाहीं आणि मनमोकळें संभाषण तर कपिला षष्ठीच्या योगावरही होण्याची शक्यता नसायची! वडिलांच्या किंवा काका मामा जे कोणी वडीलधारें माणूस असेल त्याच्या खोलीपासून तरुण मंडळीची खोली सर्वच अर्थांनीं दहा कोस दूर असायची.

घरांतल्या तरुणमंडळींचे स्नेहीसोबती कोण आहेत, त्यांच्यापैकीं चांगले कोण आहेत, वाईट कोण आहेत, त्यांच्या काय गप्पा चालतात, त्यांच्या आवडी निवडी कशा कशा बनत चालल्या आहेत, इत्यादि गोष्टींची त्यांच्यांत मिळून मिसळून माहिती करून घ्यायचा विचार वडीलधाऱ्यांना कधीं शिवायचा नाहीं; व त्यांच्या विषयीं कांहीं बऱ्यावाईट गोष्टी तिऱ्हाईत माणसांकडून कानांवर येतील त्या सर्वस्वीं खऱ्या मानायला व त्यांच्या आधारांवर आपल्या घरांतल्या तरुण माणसांबद्दल बरींवाईट मतें बनवून टाकायला ते कचरायचे नाहींत.

वडील माणसांना वाटत असतें आपण घरांतल्या तरुण माणसांपासून जितकें दूर दूर राहूं तितका ते आपला मान ठेवतील, जवळ गेलों तर आपली अवज्ञा घडेल. आपल्याला कोणत्या गोष्टी पसंत अथवा नापसंत आहेत तें वडील माणसें तरुणांना कधीं सरळ, स्पष्टपणें सांगणार नाहींत, त्या त्यांनीं चातुर्यानें ओळखाव्या व आपल्यां मनाप्रमाणें वागावें अशी त्यांची मनांतली इच्छा असते. आपलीं सुखदु:खें, आपलीं मतें, आपल्या अडचणी तरुणांशीं खुल्या दिलानें उघड करणें चुकीचें होय असें वडील माणसें समजतात. आपल्या सद्‌गुणांप्रमाणेंच आपले अवगुणही जर तरुणांच्या दृष्टीस पडले तर आपल्यावरची त्यांची भक्ति पार नाहींशी होईल या खोट्या भीतीनें वडील माणसें सदा लाक्षणिक अर्थानें अंग चोरून चोरून वावरत असतात.

प्रतिक्रियेच्या न्यायानें याचा परिणाम असा होतो कीं तरुण मंडळीहि वडिलांशीं चोरट्या पद्धतीचेंच वर्तन ठेवतात. आपल्या अंतरंगांतले विचार वडील माणसांना सांगावे, विविध विषयांवर

त्यांच्याशीं संवाद करावा, त्यांचीं मतें विचारावीं, त्यांचा सल्ला घ्यावा असल्या कल्पनाच त्यांच्या मनांत कधीं येत नाहींत वडील माणूस दिसलें कीं एकदम आपले भर रंगांत आलेले वादहि बंद करायचे व गोठ्यांतलीं गुरें चारा खातांना करतात तशा माना खालीं करायच्या येवढीच वडिलांची मान राखण्याची रीत आहे असा त्यांचा समज असतो. आपल्या आवडीनिवडी खुल्या अंतःकरणानें वडील माणसांना सांगितल्या तर त्यांच्या-कडून आपण गाढव मात्र ठरूं अशी त्यांना धास्ती वाटते. जगांत वाईट काय हें आपलें आपण ठरविलेलें बरें, त्यांत वडि-लांची मसलत कधीं विचारूं नये. यासारखें सुख नाहीं; मान सांगावा जनांत, अपमान ठेवावा मनांत. त्याच्याहिपुढें जाऊन वडील माणसांना आपले निराशेचे अनुभव, आपल्या चुका, आपलें अपयश तर कधीं सांगूं नयच, पण आपले पराक्रम आणि आपले हर्षदायक अनुभवहि कधीं सांगूं नयेत हेंच सगळ्यांत चांगलें असें तरुण मंडळींनीं ठरवून टाकलेलें असतें.

सारांश, वडील माणसें व तरुण मंडळी निरनिराळ्या स्वतंत्र सीलबंद दालनांत वावरत असतात. परस्परांना परस्पर जवळ-जवळ तिऱ्हाइतासारखे असतात, व एकमेकांविषयीं जिव्हाळ्याची सहानुभूति कोणाच्याच मनांत रुजलेली नसते. खोट्या प्रतिष्ठेची भिंत वडील माणसांनीं आपल्याआड उभारलेली असते, आणि भिंतीपलीकडून जें कांहीं दिसेल तेवढ्यावरच तरुणांनीं वडिलांच्या विषयीं रुक्ष प्रीति आपल्या मनांत प्रयत्नानें जतन करून ठेवलेली असते. अशा परिस्थितींत खरा प्रापंचिक आनंद वडिलांना

किंवा तरुणांना कितीसा उपभोगावयास मिळत असेल याची वाचकांनीं कल्पनाच करावी.

आणि या सर्व शोचनीय प्रकारच्या मुळाशीं आमची कुटुंबासंबंधीचा जुनाट सदोष कल्पना आहे. प्राचीन काळांत देशाच्या कारभाराच्या बाबतींत जशी आह्मां हिंदूंत राजसत्ता रूढ झाली तशी कुटुंबाच्या व्यवस्थितिसंबंधीं हिंदूंनीं जी कल्पना केली तीवरहि राजसत्तेच्या प्रकाराची चांगलीच छाया पडली. राजा हा श्रीविष्णूचा अवतार आहे व त्याचा अधिकार स्वयंभू असून त्याच्या आज्ञांची चिकित्सा न करतां त्यांचें परिपालन करणें हाच प्रजेचा खरा धर्म होय, इत्यादि समजुतींच्या वळणावरच कुटुंबांतील कर्त्या थोर पुरुषाविषयीं कल्पना रूढ झाल्या. जसा राजा तसाच घरांतला वडील पुरुष आणि राजाशीं जशी प्रजेची घसट होणें शक्य नाहीं व इष्ट नाहीं तसेंच वडील माणसांचें व तरुण मंडळींचें विशेष निकटत्व असणें योग्य नाहीं. मातापिता आणि गुरु यांना धनीपणा देऊन "मातापिता, धनी, गुरु यांची आज्ञा सदैव मानावी" या संथा मुलांच्या लहानपणापासून देण्याचाच आमच्यामध्यें कटाक्ष ठेवला गेला आहे. राजा जसा प्रजेचा धनी तसा बाप किंवा पालकही धनीच होय. एकानें आज्ञा करावी आणि दुसऱ्यानें ती पाळावी येवढाच जसा राजा व प्रजा यांच्यामध्यें ऋणानुबंध, तसा वडील व तरुण माणसें यांमध्यें आज्ञापक आणि आज्ञाधारक या पलीकडे कांहीं अधिक संबंध असावयाचें प्रयोजन नाहीं.

हिंदु कुटुंबांतील मंडळींच्या परस्पर वर्तनांत ध्वनित होणारे सिद्धांत मी हे असे स्पष्ट मांडून दाखविल्यामुळें कदाचित् पुष्क-

ळांस विस्मयाचा धक्का बसेल व ते म्हणतील 'छे छे ! हिंदु कुटुंबांतील परंपरागत वागण्याचालण्याचा हा विपर्यस्त अर्थ केला जात आहे, आह्मी हिंदू माणसें काय इतकीं अविवेकी आहोंत कीं काय ?' ह्मणून येथें असें सांगतों कीं पुढें हिंदु कुटुंबांतील रोजच्या प्रसंगाचे दोन मासले दिले आहेत ते खोटे आहेत असें ह्मणण्याची कोणाची छाती असली तर पहा.

वेळ रात्रीं अकराची. घरांत तात्यासाहेब (वय सुमारें पन्नास) व त्यांच्या पत्नी माई अर्धवट झोपेंत आहेत. इतक्यांत त्यांचा थोरला मुलगा नाना (वय सुमारें २५, कारकुनीवर ६० रुपये मिळविणारा आणि सहा महिन्यापूर्वी पहिली बायको वारल्यामुळें विधुर झालेला) पुढच्या दारावर हांका मारतो, मावशी त्याला दार उघडतात, दोन तीन दरवाजे वाजतात व शेवटीं नाना आपल्या खोलींत जाऊन चूळ भरतो व जांभई देतो. तात्या व माई यांना हें सारें ऐकूं जातें व त्यावर दोघांचा पुढीलप्रमाणें तुटक संवाद होतो—

माई:-- नाना आला वाटतं—

तात्या:— हं ! (जरा थांबून) किती वाजले माहीत आहे ?

माई:— किती ?

तात्या:— अकरा ! — आत्तांशा नाना रोज घरीं येऊन निजायला इतकी रात्र करतो हें कांहीं ठीक लक्षण नाहीं ! —

माई:--ह्मणजे ? नानाविषयीं वावगी शंका येते आपल्याला ?

तात्या:— अग येईल नाहीं तर काय ? पंचविसावं वर्ष आहे त्याला ! अन् बायको — ! हं ऽ !

माई:— छे ! मला नाहीं वाटत—

तात्या:- परवां ते गोगव्यांचे बंडूनाना सांगत होते कीं त्यांनीं पाहिलं नानाला कुठेंस—

माई:- पण तो कुठें पेटी शिकायला कां काय जातो ह्मणे रोज रात्रीं जेवल्यावर.

तात्या:- अग कसली पेटी ?

मग रात्रभर माई मनांत चिंता करीत जाग्या राहिल्या व नानावर मनांत रागावून त्यांनींहि आपली झोंप घालविली.

वस्तुस्थिति अशी होती कीं नाना खरोखरच पेटीच्या एका क्लासांत जात असे व त्याचा क्लास एका वाईट माडीच्या लगतच्या माडींत असल्यामुळें बंडूनाना गोगव्यांनीं त्याला तेथें पाहून खुशाल पराचा कावळा करून सांगितला होता.

पण धन्य त्या तात्यांची कीं नानाला सरळ दोन गोष्टी विचारण्याऐवजीं ते संशयपिशाच्चाचें थैमान आपल्या मनांत खुशाल चालूं देतील व स्वतःच्या व एकंदर प्रपंचाच्या आनंदावर पुरतें विरजण घालतील !

दुसरें चित्र. बाबूराव व भाऊराव हे दोघे समवयस्क तरुण एकमेकाशीं बोलत बाबूरावच्या खोलींत बसले आहेत.

बाबूराव:- समजलास ? विटलों मी या नोकरीच्या हमालीला. अन् शिवाय स्वतंत्र धंदा करण्याची माझी पहिल्यापासून इच्छा होती. केवळ आमच्या दादांची आज्ञा मोडायची नाहीं ह्मणून या नोकरींत शिरलों. पण आतां ही गुलामगिरी अगदीं सहन होत नाहीं. आपण उद्यां राजिनामा देणार !

भाऊराव:- अरे पण तूं दादांचा सल्ला घेतलास कां ?

बाबू.:– आपला धीरच होत नाहीं. त्यांना हें आवडायचं नाहीं. अन् श्रीधरपंतांचं अन् आमचं दुकान काढायचं ठरलं सुद्धां. पाडव्याला उघडणार. त्यांत प्रथम मला प्राप्ती व्हायची नाहीं हें मी जाणून आहे. आणि ह्मणून मी माझ्या बायकोला देणार आहे कांहीं दिवस माहेरीं पाठवून. दादांना उगीचं तिचं ओझं वाटायला नको.

भाऊ:– हें बरं एका अर्थी. पण दादांचं तरी–

इतक्यांत जिन्यांत दादांचा जोडा वाजतो व हे दोघे "स् स्" करून एकमेकाला आळीमिळी घालून गप्प बसतात.

वस्तुस्थिति अशी कीं बाबूरावानें दादांना मोकळ्या मनानें सारें सांगितलें असतें तर त्यांनीं त्याच्या बेतांत मोडता घातला नसता आणि सुनेला माहेरीं पाठविण्याची इच्छा तर त्यांना कधींच शिवली नसती.

पण धन्य त्या बाबूरावाची कीं दादांशीं मन उघडें करण्याऐवजीं तो स्वतःचेच कांहींतरी तर्क लढवून वागेल व स्वतःचा व एकंदर प्रपंचाचाहि आनंद पार नासून टाकील !

अशा तात्यांची व बाबूरावांची आमच्या समाजांत गर्दी झालेली दिसते.

अशीं शेंकडों दृश्यें डोळस माणसाला आमच्या समाजांत प्रत्यही दिसतात.

या दृश्यांवरून काय अनुमान निघतें ? कौटुंबिक सौख्य कसें साध्य करावें व त्यासाठीं आपण झीज कशी सोसावी. हें आमच्या तरुण स्त्रीपुरुषांस कळतें असें म्हणतां येईल काय ? आणि तें कळत नसेल तर त्याबद्दल त्यांनीं विचार करावा व आपलें वर्तन सुधारावें हा अत्यंत अगत्याचा प्रश्न नाहीं काय ?

राष्ट्रहित, स्वधर्महित किंवा समाजाचें हित या सर्वांच्या आधीं स्वतःच्या कुटुंबाचें हित साधण्याची तत्परता व कुशलता तरुण स्त्रीपुरुषांच्या ठिकाणीं असावयास पाहिजे हें मी प्रथम स्पष्ट केलें. नंतर कुटुंबाचें खरें सौख्य संपत्ति किंवा कीर्ति यावर अवलंबून नसून एक प्रकारच्या विशिष्ट प्रापंचिक आनंदावर अवलंबून आहे असें मी प्रतिपादिलें. आणि आज ज्या तऱ्हेनें आमच्या कुटुंबांतील वडील व तरुण माणसांचें वागणें चालतें ती तऱ्हा या आनंदाला सर्वस्वीं विघातक आहे हें शेवटीं दर्शविलें. अर्थात् ही तऱ्हा बदलणें हें तरुण स्त्रीपुरुषांचें फार मोठें कर्तव्य ठरतें व तें त्यांना कसें पार पाडतां येईल त्याचीच चर्चा पुढच्या प्रकरणांत केली पाहिजे.

प्रकरण ७ वें

# वडील व तरुण यांच्यांतील स्नेहभाव.

कुटुंबासाठीं पैसा मिळविण्यापेक्षां किंवा कीर्ति संपादण्यापेक्षां कुटुंबांत प्रापंचिक आनंद सर्वदा कायम ठेवण्याचेंच कर्तव्य तरुण स्त्रीपुरुषांनीं अधिक अगत्याचें समजलें पाहिजे, व सध्यां आमच्या समाजांत दुर्मिळ असणारा हा आनंद आपापल्या कुटुंबासाठीं कसा उत्पन्न करतां येईल या प्रश्नाचाच विचार तरुणांनीं सर्वांत आधीं केला पाहिजे.

या प्रापंचिक आनंदाचा लाभ आमच्या कुटुंबांत सहसा कोणाला झालेला दिसत नाहीं याच्या कारणाची ओझरती मीमांसा मी गेल्या प्रकरणांत केलीच आहे. कुटुंबांतल्या सर्व जाणत्या व्यक्तींच्या अंगीं परस्पराविषयींच्या स्नेहभावाचा गुण आल्याखेरीज ज्याला मी एक विवक्षित प्रापंचिक आनंद समजतों तो उत्पन्न होणें शक्य नाहीं; आणि या स्नेहभावाला सर्वस्वीं प्रतिकूल अशा तत्वांवर आमच्यांतील रूढ, परंपरागत कौटुंबिक राहणीची उभारणी झालेली आहे.

राज्याचा योगक्षेम सर्वस्वीं राजाकडे सोंपवायचा, आणि प्रजेनें स्वत:कडे फक्त कायदे पाळण्याची व राजाचें दर्शन होतांच त्याला निष्ठापूर्वक प्रणाम करण्याची कामगिरी ठेवायची ही कल्पना जशी आमच्या पूर्वजांनीं सामान्यत: मान्य केली, तद्वतच कुटुंबाच्या पुढाऱ्यावर निर्वाहाची सर्व जबाबदारी सोंपवून फक्त त्याची आज्ञा पाळण्याचें आणि त्याला प्रणिपात कर-

ण्याचें आपलें कर्तव्य होय असें कुटुंबांतील इतर व्यक्तींनीं समजायचें या कल्पनेवरच आमची कौटुंबिक राहणी पूर्वी आंखली गेली.

अशा प्रकारच्या राहणीमुळें ज्या कांहीं सामाजिक व्यवस्थितीच्या सोयी होतात, त्यांची जरूरी त्या वेळीं समाजाला फार असली पाहिजे. ह्मणूनच ही राहणी मान्य ठरली व या राहणींतील दोषांकडे त्या वेळच्या समाजधुरीणांनीं कानाडोळा केला. परंतु अनेक शतकांच्या अवधीनंतर आज काळ इतका बदलला आहे कीं या राहणीचे फायदे समाजाला नको आहेत आणि निष्कारण तिचे दुष्परिणाम मात्र समाजाला भोगावे लागत आहेत.

त्यांपैकीं सर्वांत मोठा दुष्परिणाम हा कीं आमच्या समाजांतील कुटुंबाचा एकजिनसीपणा केवळ बाह्यस्वरूपी असतो, अंत:करणाचा नसतो. एका घरांत कांहीं माणसें राहतात ह्मणून त्यांना आह्मी एक कुटुंब ह्मणतों, त्या माणसांच्या अंत:करणांची समरसता झालेली असते ह्मणून नव्हे. दहा माणसांचा पोशिंदा एकच आहे एवढ्याच अर्थी तीं माणसें एका कुटुंबांतलीं समजलीं जातात. त्यांना एक कुटुंब समजण्यांत त्यांच्या अंत:-करणांतील एक जिनसीपणाचा विचार आपण करीत नाहीं. कायद्याच्या कलमांत कुटुंब या शब्दाचा जो कांहीं अर्थ असेल त्यापलीकडे सहसा आपली कल्पना पोचलेली नसते; आणि कायद्यानेंच जीं कांहीं कर्तव्यें ध्वनित होतात, त्यापलीकडे कुटुंबांतील वडील माणसांना व लहानांना आपापल्या जबाबदारीची जाणीवहि क्वचितच असते. ज्यानें बाकीच्यांचें पालन

केलें पाहिजे तो पालक, व ज्यांनीं पालन करून घेतलें पाहिजे ते सगळे पाल्य येवढीच समजूत कुटुंबाच्या बुडाशीं असते.

बाप आपल्या मुलाबाळांसाठीं शक्य तितकी इस्टेट ठेवावी म्हणून झटत असतो, व आपल्या लहानपणीं आपले लाड व्हावे आणि आपल्या मोठेपणीं आपल्या हातीं मोठी इस्टेट यावी अशी मुलाबाळांची इच्छा असते. बापानें थोडी फार पुंजी सांठवून ती मुलाला दिली पाहिजे, आणि बापाकडून आपल्याला थोडा फार वारसा मिळावा अशी अपेक्षा मुलानें ठेवायला पाहिजे, या कल्पना समाजांत सर्वांना कळतात. पण बापलेकांनीं आपलीं अंतःकरणें एकमेकांना दिलीं पाहिजेत असें कोणी झटलें तर त्याचा अर्थ लोकांना समजायचा नाहीं.

याचा परिणाम साहजिकच असा होतो कीं घरांतील वडील माणसें आपल्या मतानें आपल्या मुलांसाठीं मोठा स्वार्थत्याग करून वागत असतात, व तरुण मंडळी आपल्या मतानें वडील माणसांना संतोष होईल अशा प्रकारचें वर्तन ठेवीत असतात. परंतु हें सारें जो तो आपापल्यापरीं विचार करूनच, व आपल्या मतीवर अवलंबून राहूनच करीत असल्यामुळें त्या करण्याचा कांहीं एक उपयोग होत नाहीं. लहानथोरांचा परस्पर विचारविनिमय कधींच होत नाहीं. एकमेकाच्या अडचणी आणि एकमेकाच्या महत्वाकांक्षा एकमेकाला कधींच कळत नाहींत. एकमेकाच्या कृतीविषयीं आणि बोलण्याचालण्याविषयीं पूर्ण समजूत कोणालाहि नसते, व ती असावी झणून कोणाची खटपटही नसते.

मध्यम स्थितींतील एखाद्या कुटुंबाकडे पाहिल्यास मी काय ह्मणतों तें वाचकांच्या झटकन लक्षांत येईल. कुटुंबाचा पोशिंदा आपल्या मुलांवर मनःपूर्वक प्रेम करीत असतो. त्या तरुण मुलांची वागणूक त्याला कितीही नापसंत वाटली तरी त्यांच्याविषयीं त्याला जिव्हाळा वाटत असतो, आपल्याकडून शक्य तितक्या त्यांना सुखसोयी मिळाव्या, त्यांचे लाड पुरविले जावेत अशी त्याच्या हृदयांत तळमळ असते यांत किमपि संशय नाहीं. आपल्या वडिलांनीं आपलें जितक्या प्रेमानें संगोपन केलें तितक्याच-किंबहुना शक्य तर अधिक प्रेमानें आपल्या हातून आपल्या मुलांचें संगोपन व्हावें अशी त्याची मनीषा असते. आपलें जितकें शिक्षण झालें त्याहूनही शक्य तर थोडें वरिष्ठ शिक्षण आपल्या मुलांना मिळावें असा त्याचा कळकळीचा हेतू असतो. या हेतूला अनुसरून तो हजार प्रयत्नांनीं जरूर तितका पैसा उभा करतो, प्रसंगच पडला तर सावकारी पाश मानेभोंवतीं लावून घेण्यास तो मागें पुढें पहात नाहीं, व स्वतः अर्धपोटीं राहावयासही तो कचरत नाहीं.

पण बापाच्या या स्वार्थत्यागाची मुलाला कधीं जाणीव असते काय? आणि नसते याचा दोष मुलाकडेच असतो असें ह्मणतां येईल काय? मुलगा अशा भ्रमांत असतो कीं बापाजवळ द्रव्यसाधनें विपुल आहेत. आपण जें जें मागूं तें तें आपल्याला ज्या अर्थी तावडतोब मिळत आहे त्या अर्थी आपल्या बापाजवळ पैशाची कमतरता नाहीं. बाप कोणतें भयंकर दिव्य करून पैसा आणीत आहे याची त्याला यत्किंचितही जाणीव नसल्यामुळें पैसा तेवढा त्याला दिसतो आणि त्या पैशामागचा असामान्य

स्वार्थत्याग त्याच्या दृष्टीस पडत नाहीं. बाप कधीं त्याला मसलतींत घेत नाहीं, स्वतःच्या अडचणी खुल्या दिलानें सांगत नाहीं, पैशाचा संचय करण्यासाठीं सोसाव्या लागलेल्या कष्टांचे मानेवरचे करकोचे कधीं उघड करून दाखवीत नाहीं. असा हा मूक स्वार्थत्याग काव्यदृष्टीनें कदाचित् अत्यंत उदात्त ठरेल; परंतु सरळ प्रापंचिक समाधानाच्या दृष्टीनें याचे परिणाम घातुक होत असतात. पैशाचा संग्रह करण्यासाठीं बाप हाडाचीं काडें करीत असतो; आणि मुलगा मात्र असें समजत असतो कीं पैसा सहजासहजीं बापाच्या हातीं येत आहे. यामुळें आपल्या वासनांची धांव जशी जशी जाईल तशी तशी तो पैशाची मागणी करीत असतो, व अशा एखाद्या मागणीला बापानें नकार दिला कीं तो बापावर रुष्ट होतो, तो रुसवा बोलून दाखवून दिलसफाई करून घेण्याची रुढि नसल्यामुळें त्या रुसव्याची मनांतल्या मनांत वाढ होत जाते, व बापलेकांच्या परस्पर नात्यांतील माधुर्य अल्प काळांत नष्ट होऊन एकंदर कुटुंबावर असमाधानाची कृष्ण छाया पसरते.

तरुण वडिलांवर नाराज होतात तशीच वडील माणसें तरुणांवर रुष्ट असतात. तरुणांचे ‘ छचोर चाळे ’ त्यांच्या नजरेला दिसतात, पण त्या चाळ्यांच्या बुडाशीं असलेल्या तारुण्यसुलभ वृत्ती हिशोबांत घ्यावयास त्यांची तयारी नसते. तारुण्यांत शारीरिक आणि मानसिक शक्ती अधीर, अचपळ, प्रवाही, अस्वस्थ अशा असावयाच्याच, नाना तऱ्हेच्या आकर्षक विषयांमागें त्यांची धांवपळ चालावयाचीच, त्यांच्या अखंड अस्वस्थपणावर राग धरण्याऐवजीं त्यांना युक्तीनें आणि कौशल्यानें

दिशा लावून देणें अधिक सूज्ञतेचें व हितपरिणामी होईल इतका विवेक वडील माणसांना, कां कोण जाणे, पण रहात नाहीं. जलाशयांवर उगवलेली रानवट वेलींची व लव्हाळ्याची वाढ नुसती पहावयाची व ' अरेरे या सुंदर जलपृष्ठावर ही गलिच्छ वाढ होत आहे ही मोठी वाईट गोष्ट आहे ! ' असा खेद करायचा असें वडिलांचें वर्तन होत राहतें. त्या दुर्गंधी वाढीचें मूलकारण काय आहे तें शोधण्याचें त्यांच्या मनांत येत नाहीं, प्रत्यक्ष पुढें होऊन हातांनीं ती दूर करून जलपृष्ठ स्वच्छ करण्याचें तर मग लांबच राहिलें. या कारणानें तरुणांच्याविषयीं त्यांच्या मनांत नाराजी उत्पन्न होते, तिला कधींच खुल्या अंतःकरणाच्या चर्चेच्या द्वारें वाव न मिळाल्यामुळें ती वाढत जाते, आणि तरुणांशीं होणाऱ्या त्यांच्या वर्तनांत दूरत्व, परकेपणा, कृत्रिमपणा येऊन एकंदर कुटुंबांतील मानसिक वातावरण कडवटून जातें.

ही स्थिति बदलावी असें तरुणांना वाटत नाहीं काय ? राष्ट्रीय उद्धार, सामाजिक उत्कर्ष या सर्वांहून आधीं कौटुंबिक जीवनाच्या या स्वरूपाबद्दल तरुण स्त्रीपुरुषांनीं विचार करावयास नको काय ? हा प्रश्न सकृद्दर्शनीं वाटतो तसा क्षुल्लक आहे काय? उलट, अप्रत्यक्षपणें या प्रश्नाशीं सामाजिक, धार्मिक आणि राजकीय प्रश्नांचा निकट संबंध नाहीं काय ?

मला स्वतःला या प्रश्नांचें अगत्य फार वाटतें आणि याच कारणासाठीं या प्रश्नाबाबत तरुण स्त्रीपुरुषांनीं काय केलें पाहिजे त्याचा विचार इतर मोठमोठ्या प्रश्नांच्या आधीं मी करीत आहे.

तरुणांनीं प्रथम स्वतःच्या मनाला एक प्रकारच्या मोकळेपणाची संवय लावली पाहिजे. वडिलांजवळून आपले विचार चोरून

ठेवण्याऐवजीं योग्य त्या विनयाचें उल्लंघन न करतां ते वडील माणसांसमोर उघड उघड मांडण्याचा उपक्रम त्यांनीं केला पाहिजे. आपले विचार विकार मनांतल्या मनांत कोंडून ठेवून कुढत राहून वडिलांविषयीं असंतुष्ट राहण्यांतच खरें पाहतां वडिलांचा अपमानच नव्हे तर मोठा अपराध घडतो. त्यापेक्षां आपल्याला जें कांहीं वाटतें तें पालकांजवळ खुल्या दिलानें बोलून दाखविण्यांत उभयतांचें कल्याण आहे. असें करण्यांत विनयभंग होतो असें कोणी ह्मणत असतील तर त्यांना विनयाचें मर्म कळलें नाहीं.

आपल्या आवडीनिवडी काय आहेत, आपले स्नेही कोण कोण आहेत, आपला नवीन स्नेह कोणकोणाशीं होत आहे, त्या त्या स्नेह्यांचें स्वभावनिरीक्षण आपण कसें कसें केलें आहे, आपल्याला कोणकोणते खेळ खेळावेसे वाटतात, कोणत्या कलां-विषयीं आपल्याला आकर्षण वाटतें, निरनिराळ्या सामाजिक व धार्मिक प्रश्नांविषयीं आपले विचार काय आहेत, आपल्या अडचणी काय आहेत, इत्यादि असंख्य लहानमोठ्या गोष्टी तरुणांनीं खुलेपणानें वडील माणसांपुढें मांडल्या तर त्यापासून अतिशय हित होईल.

अर्थात् हें व्हावयासाठीं वडील माणसांनींहि परंपरागत वर्तनाची तऱ्हा टाकून दिली पाहिजे व तरुण माणसांनीं आपलीं सुखदु:खें आपल्याजवळ उघड करावीं असें मोहक वर्तन ठेवलें पाहिजे. आज वडील मंडळींना सामान्यत: असें वाटतें कीं तरुणांच्या दृष्टींला आपलें यथार्थ स्वरूप दिसणें धोक्याचें आहे, आपल्या ठिकाणीं गुणाखेरीज दुसरें कांहीं आहे अशी शंका

देखील तरुणांच्या मनांत येतां कामा नये, व यासाठीं त्यांचा व आपला निकट सहवास जितका कमी होईल तितका चांगला. देव जसा अंधाऱ्या माजघरांतल्या देवघरांत ठेवलेला असतो व त्या कधींच स्पष्ट न दिसणाऱ्या मूर्तीला सकल दयेचें, ज्ञानाचें व सत्तेचें अधिष्ठान मानून लोक त्याच्यापुढें जसें साष्टांग दंडवत घालण्यापुरतें तेवढें येतात, त्याचप्रमाणें वडील माणसें अंधारांत रहावींत व आदरणीय समजलीं जावींत असें सामान्य धोरण दिसून येतें.

परंतु हें धोरण वडील माणसांनीं आतां टाकलें पाहिजे. आपल्या सद्गुणांची आणि पराक्रमाची छाप तर त्यांनीं तरुणांवर बसविलीच पाहिजे. परंतु आयुष्यांत केवळ एकजात पराक्रमच कोणाच्याही वांट्याला येत नाहीं. एका यशाच्या इतिहासांत दहा अपयशांची कथा अंतर्भूत झालेली असते व ती कथाहि अत्यंत उद्बोधक असते. सद्गुण संपादण्याचें जितकें महत्व आहे तितकेंच दुर्गुणांची पकड टाळण्याचेंहि महत्व आहे. आयुष्य हें अत्यंत वैचित्र्यपूर्ण आहे आणि त्यांत पदार्पण करणाऱ्या तरुणांना वडील माणसांच्या सत्कृत्याप्रमाणेंच त्यांच्यावरील संकटांची व त्यांच्यातील अवगुणांची माहिती झाली तर त्यापासून हरप्रकारचा बोध घेतां येईल. आपल्या हातून कोणकोणतीं सत्कृत्यें घडलीं हें तर वडील माणसांनीं तरुणांना सांगावेंच; पण त्याचप्रमाणें निरनिराळ्या प्रसंगीं आपल्या हातून कोणकोणते प्रमाद घडले, आपल्या विवेकाचा खंबीरपणा कसा व कितीं डळमळला, त्याचीं कडू फळें आपल्याला कशीं चाखावीं लागलीं, व्यवहाराच्या कोणत्या खड्ड्यांत आपण कसे पडलों, निरनिराळ्या व्यक्तींचा आपल्याला

कसा बरावाईट अनुभव आला हेंही सांगण्यास त्यांनीं अनमान करूं नये.

परंतु वडील माणसांनीं अशी खुली वृत्ति आपण होऊन धारण केली नाहीं तर ती त्यांच्या ठिकाणीं आपल्या आकर्षक वर्तनानें आपण उत्पन्न केली पाहिजे असा विचार तरुणांनीं करावा. आपलीं सुखदु:खें वडिलांजवळ उघड करण्याची व त्यांचा सल्ला घेण्याची हौस तरुणांनीं बाळगावी. विविध विषयां-संबंधीं विचार करतांना ज्या अडचणी येतात, त्याबाबत वडील मंडळींचीं मतें विचारावींत, सामान्य व्यवहारांत आपलें कोठें बरोबर आहे व कोठें चुकत आहे तें त्यांजपासून समजून घ्यावें. आपल्याला काय हवेसें वाटतें व काय नकोसें वाटतें तें मोकळ्या मनानें सांगावें, आपल्या आवडीनिवडी वडील माणसांकडून पारखून घ्याव्या व त्यांत शक्य तेवढी सुधारणा करण्याची मनाची तयारी ठेवावी.

सारांश, वडील मंडळींत व तरुण स्त्रीपुरुषांत स्नेहभावाचें नातें असावें. संसाराची काळजी वाहण्याची जबाबदारी कर्त्या पुरुषाची समजली जावी हें सरळच आहे. परंतु ती काळजी वाहतांना कुटुंबांतल्या सर्व मंडळींची सहानुभूति त्या कार्यकर्त्या पुरुषानें मिळवूं नये असें थोडेंच आहे? कर्त्या पुरुषानें कष्ट करावेत हें ठीक आहे. पण त्या कष्टाची यथार्थ कल्पना सग-ळ्यांना असेल तर त्यांत वावगें काय आहे? उलट अशी यथार्थ कल्पना जितकी असेल तितकी सर्वांची जिव्हाळ्याची सहानुभूति त्या पुरुषास मिळेल व त्याचे कष्ट जरी चुकले नाहींत तरी तें अनेक पटींनीं हलके होतील. म्हणून तरुणांना दूर दूर वाग-

विण्याऐवजीं वडिलांनीं जवळ घ्यावें, त्यांस आपल्या सांपत्तिक सामर्थ्याची कल्पना द्यावी, आपल्या द्रव्योत्पादनाच्या मर्यादा सरळ दाखवून द्याव्या आणि एकंदर संसाराचे कोणकोणते खर्च पार पाडण्यासाठीं आपल्याला झटावें लागत आहे तेंहि उघड करून सांगावें. संसाराचा नकाशा अशा रीतीनें तरुणांच्यापुढें मांडल्यास अनेक फायदे होतील. वास्तविक दुष्काळी मुलखांत राहणाऱ्या माणसानें आपला मुलूख मोठा सुपीक आहे अशा भ्रमांत रहावें तशी बहुश: तरुणांची स्थिति असते ती राहणार नाहीं व कुटुंब चालविणाऱ्या कर्त्या पुरुषाविषयीं ते अत्यंत सहानुभूतीनें विचार करूं लागतील.

याचाच अर्थ असा कीं राजसत्तेच्या नमुन्यावर आंखलेली कुटुंबाची राहणी बदलून ती आतां तरुणांनीं व थोरांनीं मिळून लोकसत्तेच्या तत्त्वानुसार आंखली पाहिजे. कर्त्या पुरुषानें सर्वांचें सहकारित्व संपादावें, संसाराचा डाव खेळतांना हातीं धरलेले हुकूम गुपचूप लपवून ठेवून त्यांची चिंता करण्याऐवजीं हातांतलीं सारीं पानें तरुण मंडळींस दाखवावीं व संसाराची जबाबदारी अप्रत्यक्षत: तरुणांवरहि आहे असें तरुणांस पटवावें.

तरुणांनींहि कर्त्या पुरुषास नुसता प्रणिपात घालण्यानें आपलें कर्तव्य संपलें असें मानण्याचें सोडलें पाहिजे. मोठीं माणसें हीं अमोलिक अनुभवाचीं भांडारें आहेत, तो अनुभव आपल्याला अतिशय मार्गदर्शक होण्यासारखा आहे, वडील मंडळी आपण होऊन तो अनुभव आपल्यापुढें मांडायला तयार नसलीं तर त्यांना तो मांडावासा वाटेल असें आपलें वर्तन ठेवणें हें आपलें कर्तव्य होय, इत्यादि गोष्टी तरुणांनीं लक्षांत घ्यावयास पाहिजेत

आपलीं सुखदु:खें लपविण्याऐवजीं तीं वडील मंडळीजवळ उघड करावींत, आपल्याला ज्या अडचणी आल्या तशाच अडचणी वडिलांच्यावर आल्या त्या वेळीं ते कसे वागले तें विचारावें, अनुभवाचे घाव खाऊन जें व्यवहारचातुर्य वडिलांनीं संपादिलें तें त्यांजकडून मिळवावें, आपले पराक्रम त्यांस सांगावे व आपले प्रमादहि त्यांजजवळ कबूल करावे. सारांश वडिलांसारखा दुसरा स्नेही नाहीं हें तरुणांनीं विसरूं नये

तरुणांत व वडील माणसांत स्नेहभाव पाहिजे असें जें मी ह्मणतों त्याचा अर्थ हाच. असा स्नेहभाव असला ह्मणजे परस्परांत शंकेखोर वृत्ति रहावयाची नाहीं व गैरसमजाला जागा उरायची नाहीं. आज आमच्या बहुतेक सामाजिक दुःखाच्या बुडाशीं थोर व तरुण यांच्यांतील परस्पराविषयींच्या गढूळ वृत्तीच असतात. केवळ पुरुषांबद्दलच ही चर्चा नसून स्त्रियांबद्दलहि आहे, बाप व लेक यांच्यांत जशी एकमेकाविषयीं मनमोकळी वृत्ति नसते तशीच मायलेकींत नसते आणि सासवासुनांत नसते. तरुण स्त्रियांचें बोलणें चालणें वडील स्त्रियांना पसंत नसतें आणि आई, सासू अशा वयस्क स्त्रियांचे आचारविचार लेकीसुनांना पटत नाहींत. त्यामुळें एकंदर सामाजिक जीवनावर एक प्रकारची आंबट बुरशी ठिकठिकाणीं आलेली आहे. कोर्टांत चालणारे किती तरी कज्जे, बेबनावाचे प्रकार, बेअब्रूचे प्रसंग, सध्यांच्या स्नेहहीन कौटुंबिक राहणीमुळें उद्भवत असतात. ते नष्ट करण्याचा मोठा उपाय ह्मणजे कौटुंबिक रहाणी स्नेहाच्या पायावर आधारली पाहिजे याचा तरुणांनीं व थोरांनींहि विचार करावा.

कोणी ह्मणतील कीं वृद्ध व तरुण यांच्या मनोवृत्तींतच असा मूलभूत भेद आहे कीं दोघांचें कधीं पटणें शक्य नाहीं व वृद्धांनीं तरुणांस मूर्ख ह्मणावयाचें व तरुणांनीं ह्मातान्यांस वेडे ठरवायचें हा एक प्रकारें सृष्टीचाच नियम आहे. जगाच्या प्रारंभापासून असेंच चालत आलें व यापुढें जगाच्या अंतापर्यंत असेंच चालत रहाणार. वसंतऋतूंत वृक्षशाखा पालवीनें उल्लसित व्हावयाच्या आणि हिंवाळ्यांत पानें जीर्ण होऊन झडायला लागायचीं हा सृष्टीचा क्रम आहे. तो बदलण्याची आशा करणें जसें व्यर्थ आहे तद्वत् वृद्ध व तरुण यांच्यांत उत्पन्न होणाऱ्या गैरसमजांचें मूळकारण नाहींसें करण्याची कल्पना वेडेपणाची आहे.

परंतु हा समज भ्रामक आहे. वृद्ध आणि तरुण हे भिन्न-प्रकृति असावयाचे हें खोटें नाहीं. प्रस्तुत विषयाला प्रारंभ करतांना मी स्वतःच या प्रकृतिभिन्नत्वाकडे वाचकांचें लक्ष वेधलें नाहीं काय ? परंतु हें भिन्नत्व कांहीं मर्यादेपर्यंतच मानणें आवश्यक आहे. जेथें तेथें या भिन्नत्वाचा बागुलबोवा करून निष्कारण भीति उत्पन्न करण्याचें प्रयोजन नाहीं. वृद्धतरुणांच्या प्रकृति भिन्न असतील. वृद्धांचें रक्त थंड असेल व विचार गंभीर असतील, आणि तरुणांचें रक्त गरम असेल व विचार भडक असतील. ह्मणून दोघांत मधुर स्नेहाची भूमिका उत्पन्न होणें अशक्य आहे असें मानण्याचें यत्किंचित्‌हि कारण नाहीं.

पाश्चात्त्यांच्या समाजांतील दाखला दिला तर कदाचित् कांहीं लोकांना रुचणार नाहीं, पण तो मुद्याला लागू असल्यामुळें देणें भाग आहे. त्यांच्यांत बहुशः बाप व मुलगा यांचें नातें अतिशय

८३४८

खेळीमेळीचें असतें. बाप जेव्हां जेव्हां प्रसंग सांपडेल तेव्हां तेव्हां आपल्या अनुभवापासून आपल्याला मिळालेले धडे मुलाला गमती गमतीनें सांगतो, आपल्या यौवनदशेंतील आपले पराक्रम आणि आपल्या चुका सारख्याच उत्साहानें सांगतो, आपल्या कोणकोणत्या महत्वाकांक्षा होत्या, त्यांच्या सफलतेच्या मार्गांत काय काय अडचणी आल्या, आपले कोणते स्नेही कशा प्रकारचे होते, त्यांतील सच्चे कोण ठरले व लुच्चे कोण ठरले--या सर्व गोष्टी बाप नेहमीं आपल्या मुलांजवळ संभाषणद्वारां उघड करीत असतो, इतकेंच काय, आपल्या यौवनभरांत आपण कोणत्या मुलींवर कसें प्रेम केलें व प्रणयाच्या बाबतींत आपण कसे चुकलों व कसे सावरलों हें सांगण्यासहि बापाला संकोच वाटत नाहीं. वीस पंचवीस वर्षांच्या मुलाला बाप एखाद्या दोस्ताप्रमाणें वागवितो, आणि बापानें मुलाजवळून सिगारेट घेऊन ओढणें किंवा त्याला "Well, my dear fellow !" असें संबोधणें यांत कोणाला कांहीं विपरीत वाटत नाहीं.

अर्थात् मुलाच्या ठिकाणींहि बापाविषयीं पराकाष्ठेचा जिव्हाळा उत्पन्न झालेला असतो. आपले विचारविकार, सद्वासना व कुवासना, जयापजय, सुखदु:खें वडिलांजवळ उघड करण्याची तरुणांना उत्सुकता वाटत असते. आपल्या पराक्रमांचें वडिलांकडून कौतुक होईल अशी त्यांची खात्री असते व आपल्या अवगुणांची केवळ निर्भर्त्सना न होतां वडिलांकडून सहानुभूतिपूर्वक सन्मार्ग दाखविला जाईल असा त्यांस दृढ विश्वास असतो. त्यामुळें परमादरानें व परमस्नेहानें तरुण माणसें आपल्या बापाचा

उल्लेख "My dad, My wonderful old man!" अशा शब्दांनीं करतात व आपलें प्रेम अमुक एका तरुणीवर बसलें आहे असें विनयानें पण उघड सांगण्यांत त्यांना कांहींच वावगें वाटत नाहीं.

तरुण व थोर यांच्यांत असा स्नेह असलेला आपल्या देशांतील कांहीं कुटुंबांतहि मला आढळून आला आहे. पण असें कुटुंब लाखांत एकहि भरणार नाहीं. ही स्थिति बदलावी, लोकसत्ताक राजवटीसारखीं सारींच कुटुंबें असावींत, सर्वच कुटुंबांतील लहान थोर मंडळीस परस्परांविषयीं स्नेहभाव वाटावा एतदर्थ तरुणांनीं झटलें पाहिजे. या स्नेहवृत्तीचा अंगिकार आजचीं थोर मंडळी करावयास कबूल नसलीं किंवा असमर्थ असलीं तरी आजचेच तरुण उद्यांचे कर्ते पुरुष होणार आहेत व त्यांच्या मनावर या प्रापंचिक समाधानाचें अगत्य बिंबलें तर निदान उद्यांचे संसार तरी रम्य होतील, अशा विचारानें या प्रश्नाचा इतका विस्तार केला. आतां ही चर्चा याहून अधिक न वाढवितां पुढच्या प्रश्नाकडे वळलें पाहिजे.

## प्रकरण ८ वें

# समाजव्यवस्थेंत 'प्रणया' चें स्थान.

राष्ट्रीय स्वातंत्र्य, धार्मिक तेजस्विता, सामाजिक उत्कर्ष या सर्वांहून आधीं कौटुंबिक जीवनाच्या प्रश्नाचा तरुणांनीं स्वतंत्र बुद्धीनें विचार करावास पाहिजे हें माझ्या विचारसरणीचें एक गृहीत तत्व आहे. या तत्वानुसार विचार करूं लागतां असें दिसतें कीं कौटुंबिक जीवनांत तरुणांना दोन प्रकारचीं नातीं सांभाळावीं लागतात, व तीं जितक्या सुंदर रीतीनें संभाळलीं जातील तितकें तें जीवन आनंदप्रद होईल असें मी समजतों. या दोन नात्यांपैकीं तरुण आणि वडील माणसें यांचे संबंध कशा प्रकारचे असावयास पाहिजेत त्याचा विचार मागच्या प्रकरणांत केला. आतां तरुण स्त्रीपुरुषांचे परस्पर संबंध कसे असावयास पाहिजेत याचा विचार करावयाचा.

तरुण स्त्रीपुरुषांच्या संबंधांत पतिपत्नींचा संबंध अर्थातच सर्वांत महत्वाचा. हा संबंध ज्या मानानें सुखदायक असेल त्या मानानेंच संसारांतील, व अप्रत्यक्षतः एकंदर समाजांतील बहुतेक सुखदुःखें निर्माण होत असतात. पतिपत्नींचें नातें हें समाजाची परंपरा टिकविणाऱ्या प्रजेचें उगमस्थान होय हें तर उघडच आहे. पण तितकेंच निःसंशय हेंही आहे कीं साऱ्या सामाजिक सुखदुःखांचा उगम, प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रीतीनें, या नात्यांतूनच होत असतो. पतिपत्नीमधील परस्पर भावना अत्यंत जिव्हाळ्याच्या आणि मोकळेपणाच्या असल्या

ह्मणजे सबंध संसाराला रमणीय स्वरूप येतें, आणि अशा संसारांनीं समाज भरला कीं तो तेजस्वी झाल्यावांचून रहात नाहीं. उलट पतिपत्नीमध्यें केवळ पोकळ निष्ठाच असेल आणि अंतःकरणानें तीं एकमेकांपासून दूरच असतील तर संसार खरोखरीच असार होऊन तसल्याच तत्वज्ञानाची, खेदाची व निराशेची छाया एकंदर समाजावर पडते.

दुर्दैव असें कीं आमचें परंपरागत पतिपत्नीचें नातें या दुसऱ्या प्रकारचें आहे, व त्याहूनही अधिक दुर्दैव असें कीं अशा नात्याच्या पोटीं येणारीं अनंत कडू फळें आह्मांला प्रत्यहीं चाखावीं लागत असूनही परंपरा सोडण्याचा आमचा निश्चय होत नाहीं. राजसत्तेच्या नमुन्यावर थाटलेल्या आमच्या कुटुंबांत कर्ता पुरुष व तरुण मुलेंबाळें यांचा जसा निकट स्नेह कधीं जमत नाहीं, तद्वतच पतिपत्नींचाहि "स्नेह" कधीं जमत नाहीं. साऱ्या कर्तृत्वाची जबाबदारी पुरुष आपल्याकडे ठेवतो. नित्य व्यवहाराचे काबाडकष्ट करण्यापलीकडे आणि पतीला दैवत मानण्यापलीकडे स्त्रीला कसल्याच कर्तृत्वाची संधिच नसते. याचा परिणाम असा होतो कीं पतिपत्नींस एकमेकांच्या अंतःकरणाची ओळख क्वचित्च पटते, आणि दोघांनीं मिळून खेळीमेळीनें संसार केला असें ह्मणतां येत नाहीं. या अनिष्ट प्रकाराच्या दुष्परिणामांचें अधिक वर्णन करूं लागलों तर कदाचित् कांहीं विचारांची द्विरुक्ति होईल. ह्मणून तें न करतां ही परंपरा तावडतोब सुटली पाहिजे व नवी परंपरा पाडण्याची जबाबदारी आपल्यावर आहे हें तरुण स्त्रीपुरुषांनीं ओळखलें पाहिजे एवढेंच ह्मणतों.

ज्या पद्धतीनें आमच्या समजांत विवाह होतात ती जोंपर्यंत कायम आहे, तोंपर्यंत पतिपत्नींमध्यें मी ह्मणतों तो स्नेह उत्पन्न होणें कठीण आहे. जुन्या तऱ्हेनें ज्यांचीं लग्नें झालीं आहेत अशाही पतिपत्नींत मधुर स्नेह असल्याचें उदाहरण दाखवितां येईल. पण अशीं उदाहरणें एकंदर समाजांत हाताच्या बोटांवर मोजण्याइतकींच; आणि या उदाहरणांच्या बाबतींतही असेंच ह्मणावें लागेल कीं तेथें स्नेहभाव जुन्या तऱ्हेनें लग्न झालें 'ह्मणून' नव्हे तर तसें लग्न झालें 'असूनही' उत्पन्न झाला. ह्मणून कौटुंबिक व्यवस्थितीचा आणि सौख्याचा प्रश्न जिव्हाळ्याचा वाटत असेल तर परंपरागत विवाहपद्धति सुधारली पाहिजे, आणि हें सुधारणेचें कार्य वडील माणसें आपण होऊन करतील अशी आशा करीत बसण्यापेक्षां तरुण स्त्रीपुरुषांनींच निश्चयानें पुढें होऊन तें केलें पाहिजे.

कारण जुन्या विवाहपद्धतींतील दोष स्पष्ट दिसत असून आणि त्या दोषांचा जाच सर्वांनाच असह्य झाला असूनहि ती पद्धती नष्ट होत नाहीं याचें मुख्य कारण हें कीं विवाहाची गोष्ट आपल्या हातीं घेण्याचा धीटपणा तरुण स्त्रीपुरुषांनीं अजून दाखविलेला नाहीं. पूर्वीच्या एका प्रकरणांत स्वार्थत्यागाचें विवेचन करतांना मीं असें ह्मटल्याचें वाचकांस आठवत असेल कीं कांहीं प्रश्न व कांहीं प्रसंग असे असतात कीं त्या वेळीं तरुणांनीं आपल्या मनाची धांव आवरून वडिलांचें समाधान साधणें उचित असतें, आणि उलट कांहीं प्रश्न असे असतात कीं त्या वेळीं मात्र स्वतःच्या मताविषयीं दृढ आग्रह ठेवून व पुढील सुपरिणामावर आणि सामाजिक हितावर दृष्टी ठेवून, वडिलांचा

रोषहि न मानणें हेंच तरुणांचें खरें कर्तव्य ठरतें. विवाहाचा प्रश्न निःसंशय दुसऱ्या प्रकारचा आहे.

स्वराज्याची किंमत सुराज्य कितीही चांगलें असलें तरी त्याला येणें शक्य नाहीं असें आपण नेहमीं ह्मणतों. पण तें तत्व विवाहाच्या प्रश्नाला लागूं करण्याची बुद्धि कोणाला होत नाहीं. या तत्वानुसार पाहतां वडील माणसानें कितीही सध्देतूनें लग्नें लाविलीं व त्यांतील पांचपन्नास सुपरिणामीं झालीं तरी तीं सारीं लग्नें सुराज्याच्याच जातीचीं. तरुण स्त्रीपुरुषांनीं प्रीतियुक्त होऊन विवाह करणें हेंच खरें स्वराज्य. या स्वराज्याच्या मांडणींत तरुणांकडून प्रमाद झाले, त्यांना कटु अनुभव घ्यावे लागले तरी ' पहा! तुह्मांला अजून अक्कल आलेली नाहीं, ह्मणून विवाह-संस्था आमच्या ताब्यांत ठेवा " असें ह्मणायचा वडील माणसांना कांहीं एक हक्क नाहीं.

आपल्या समाजांत प्रौढविवाह थोडा फार रूढ झाला आहे येवढ्यावरच समाधान मानून कांहीं लोक ह्मणतात, " पहा, बाल-विवाह बराचसा नष्ट झाला आहे आणि वधूवर आतां बहुतकरून प्रौढच असतात. आणखो ती सुधारणा तुह्मांला काय पाहिजे ? " परंतु हें प्रतिपादन किती भ्रामक आहे पहा. एक तर प्रौढविवाह थोडा मान्य झालेला दिसतो तो केवळ पांढरपेशा वर्गांत. बाकीच्या वर्गांत अजून बालविवाहच जारी आहे आणि ' सारडा ' कायद्याच्या अंमलबजावणीनें तरी तो कमी होईल कीं नाहीं याविषयीं शंकाच आहे आणि शिवाय, विवाहाची खरी सुधारणा प्रौढविवाह होण्यांत नसून प्रीतिविवाह होण्यांत आहे. वधूवरांची परस्परावर प्रीति जडून

त्यांचे विवाह व्हावेत हें खरें ध्येय. अशी प्रीति जडायची ह्मणजे वधूवर अर्थातच सुबुद्ध आणि प्रौढ असावयास पाहिजेत, ह्मणून प्रौढविवाहाचें नांव घ्यावयाचें इतकेंच. वधूवरांची परस्पर अनुरक्ति हीच सर्वांत महत्वाची गोष्ट. त्यांचा प्रौढपणा केवळ अनुषंगिक होय.

आज आपल्या समाजांत ही अनुषंगिक गोष्ट तेवढी आचरणांत येत आहे आणि या अनुषंगिक गोष्टीलाच ध्येय मानून विवाहसंस्थेची पुरेशी सुधारणा झालीच आहे असें समजण्याची पुष्कळांची तयारी आहे. परंतु हा समज चुकीचाच नव्हे तर घातुक आहे. तसेंच ह्मटलें तर सध्यां जे प्रौढविवाह होतात त्यांतील प्रौढपणा तेवढा वगळला तर त्यांत आणि बालविवाहांत विशेष महत्वाचा कितीसा फरक दाखवितां येईल ? बालविवाहांत वधूवरांना लग्न लागेपर्यंत परस्परांचें मुखावलोकन घडलेलें नसतें. सध्यां नवऱ्यामुलाला नवरीमुलगी पाहण्याच्या ‘ कटांत ’ केव्हां केव्हां सामील करून घेण्यांत येतें. परंतु या ‘ पाहण्याच्या ’ दहा पंधरा मिनिटांच्या समारंभांत वर वधूची काय परीक्षा करून तिला पसंत अगर नापसंत ठरवीत असेल देव जाणें ! वराला निदान हा पसंति प्रदर्शित करण्याचा पोकळ हक्क तरी आहे. वधूला, ती प्रौढ असली तरी तोही नाहीं. त्यामुळें पूर्वीच्या बालविवाहांत जसा प्रीतीचा संबंध नव्हता तसाच आजच्या प्रौढविवाहांतहि नाहीं. असें असतां प्रौढविवाहास सुधारणेची सीमा मानून स्वतःची पाठ थोपटण्यांत काय स्वारस्य आहे ?

इतकेंच नव्हे तर प्रीतिविहीन बालविवाह आणि प्रीतिविहीन प्रौढविवाह यांची तुलना करूं लागल्यास एका विविक्षित दृष्टीनें प्रौढविवाहच कदाचित् अनिष्ट ठरेल. हल्लीं जे प्रौढविवाह होतात त्यांत विवाहविधीनंतर गर्भाधानविधि दोन तीन आठवड्यां-च्याच अंतरानें, कधीं कधीं एक दोन दिवसांतच उरकण्यांत येतो. वर आणि वधू दोघेंहि वयांत आलेलीं असतात. तेव्हां असा प्रकार साहाजिकपणेंच होतो. पण या प्रकारचा जरा वेगळ्या दृष्टीनें विचार करूं. ज्या दोन प्रौढ स्त्रीपुरुषांचा परि-चय लग्नविधीच्या वेळींच काय तो झाला, ज्यांना एकमेकाच्या अंत:करणाची काडीमात्रहि ओळख नाहीं, आणि ज्यांच्यांत खरी प्रीति उद्भवली असण्याचा तर अणुमात्रहि संभव नाहीं त्या दोघांनीं एकदम एकत्र यावें व विषयाचें सेवन करावें हा प्रकार उच्च संस्कृतीला कितपत साजेसा आहे? बालपणींच ज्यांचें लग्न झालें आहे त्या दोन स्त्रीपुरुषांना दुरून दुरून कां होईना, एक-मेकाच्या सहवासाची थोडी फार संवय तरी झालेली असते. कृत्रिम साधनांनीं कां होईना, एकमेकाविषयीं आकर्षण तरी वाटूं लागलेलें असतें. चोरून मारून कां होईना दोघांमध्यें अप्रत्यक्ष स्वरूपाचें प्रियाराधनही थोडें फार झालेलें असतें. अशा परिस्थि-तींत त्यांचा समागम घडला तर त्यांत ,एकमेकाच्या अंत:स्थ भावनांच्या शांतीचा भाग थोडा तरी राहील. पण ज्या दोन प्रौढ स्त्रीपुरुषांनीं दहा पंधरा दिवसांपूर्वीं एकमेकाचे चेहरेहि पाहिले नव्हते त्या दोघांनीं एकदम एका रात्रीं शयनसौख्याचा उपभोग घ्यावा हा प्रकार नि:संशय बीभत्स होय! विवाहहोमाचा धूर दोघांच्या डोळ्यांत गेलेला असतो व सर्वांच्या संमतीनें तो घडत असतो म्हणू-

नच त्याला वेश्यागमनाची संज्ञा देतां येत नाहीं ! संभोगाच्या वेळीं पुरुषाची वृत्तिच निसर्गनियमानुसार बरीचशी काव्यहीन व पाशवी असते त्यामुळें प्रौढ वराला तो शय्याप्रसंग सुखदायक होत असेल. पण प्रौढ स्त्रीला तो बीभत्स, अमंगल, तिरस्करणीय आणि कष्टाचा वाटत असेल यांत संशय नाहीं.

हें सगळ लिहिण्याचा हेतू इतकाच कीं प्रीतीचा मुख्य मुद्दा विसरून केवळ प्रौढ विवाहाचीच सुधारणा अंमलांत आली तर त्यापासून फारसें हित व्हावयाचें नाहीं. प्रीतिविवाह रूढ करणें हीच खरी सुधारणा होय, आणि ही सुधारणा घडवून आणण्याचें काम तरुण स्त्रीपुरुषांचेंच होय.

प्रीतिविवाह आर्य संस्कृतीला विरुद्ध नसून आर्यांच्या इतिहासांत त्याला भरपूर पाठिंबा सांपडतो हें सिद्ध करण्यासारखें असूनही मी तें या ठिकाणीं करूं इच्छित नाहीं. माझ्या "SEX PROBLEM IN INDIA" या ग्रंथांत मी त्याबद्दल भरपूर विवेचन केलें आहे. मॅकडोनेल व कीथ या दोघांचा "VEDIC INDEX" नांवाचा ग्रंथ आहे. तो जिज्ञासूंनीं वाटल्यास वाचावा. रा. ब. चिंतामणरावांच्या नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या "HISTORY of SANSKRIT LITERATURE" मध्येंही या बाबतींत वाचनीय असा बराचसा भाग सांपडेल. परंतु वैदिक परंपरेचा आधार देऊन प्रीतिविवाहाचें मंडण करण्याची माझी इच्छाच नाहीं. मी ह्मणतों मानवी भावनांच्या दृष्टीनें, संस्कृतीच्या दृष्टीनें, सांसारिक व्यवस्थितीच्या व सामाजिक हिताच्या दृष्टीनें प्रीतिविवाह आवश्यक वाटत असतांना वेदांतील आधार शोधून काढण्याचा खटाटोप काय ह्मणून करायचा ? आज रसायनशास्त्रांतील, अर्थशास्त्रां-

तील किंवा गणितशास्त्रांतील एखादा सिद्धांत पडताळून पाह्यचा झाला तर जुने ग्रंथ दूर लोटून अगदीं आजतागाईत इतकेंच नव्हे तर—अगदीं या घटकेची नवी माहिती काय असेल ती आह्मी विचारांत घेतों. आणि आजच्या काळाला व परिस्थितीला अनुरूप विवाहप्रकार कोणता याचा निश्चय करतांना मात्र वेद-कालांतील लेख मारे धूळ झाडून झाडून धुंडाळायचे हा न्याय कोठचा ?

उलट मी ह्मणतों प्राचीन काळीं आमच्या देशांत प्रीति-विवाहाची गरज भासण्याचें फारसें कारण नव्हतें, आणि आज मात्र प्रीतिविवाहाचें अगत्य अतिशय मानलें पाहिजे. समाज-शास्त्राचा एक अगदीं मूलभूत सिद्धांत असा आहे कीं काळाच्या प्रगतीबरोबर सामाजिक जीवन अनेकांगी होत जातें, आणि व्यक्तीव्यक्तींतील सामान्य गुण कमी कमी होत जाऊन विशिष्ट गुण वाढत जातात. समाजाच्या प्राथमिक अवस्थेंत सगळ्याच व्यक्ति समगुणी वाटतात व तेथें या व्यक्तींपेक्षां ती व्यक्ति बरी अशी निवड करण्याला फारसा अवकाशच नसतो. अर्थात् अशा काळांत विवाह प्रीतीच्या अनुरोधानें होण्याऐवजीं समाजधुरीणांनीं घालून दिलेल्या नियमांच्या अनुरोधानें व्हावेत हें सहजप्राप्त आणि इष्टही ठरेल. परंतु हें जितकें उघड आहे तितकेंच समाज प्रौढ झाल्यावर आणि प्रत्येक व्यक्तीचें वैशिष्ट्य बरेंचसें विकसित झाल्यावर वधूवरांना एकमेकाची निवड करावयास अवकाश मिळाला पाहिजे व अशी निवड करून प्रीतिबंधनांनीं संयुक्त झाल्यावांचून स्त्रीपुरुषांचें ऐहिक जीवन सुखाचें होणार नाहीं हेंही उघड आहे.

आपण ज्याला ‘ धर्म ’ अशी संज्ञा देतों तो जितका जुना असेल तितका अधिक पवित्र व मान्य समजण्याची एक विक्षिप्त संवय आपल्याला जडलेली आहे. असा जुन्यांत जुना धर्म पाहूं गेल्यास अर्थातच समाजाच्या अगदीं प्राथमिक अवस्थेंत त्या वेळच्या पुढाऱ्यांनीं जे कायदे रूढ केले त्यांचाच गठ्ठा आपल्या हातीं येतो. समाजाच्या बाल्यावस्थेंत स्त्रीपुरुषांनीं समाजाच्या संख्याबलांत भर टाकावी येवढाच हेतु पुढाऱ्यांच्या मनांत असतो व त्याच हेतूच्या अनुरोधानें ते विवाहसंस्थेची मांडणी करतात. अर्थात प्रजोत्पत्तीच्या हेतूच्या दृष्टीनें पाहिल्यावर अमक्या स्त्रीपेक्षां आमकी बरी किंवा अमक्या पुरुषापेक्षां अमुक अधिक योग्य असें वाटण्याचें क्वचितच कारण पडतें. त्यामुळें स्मृतिग्रंथांतून प्रीतीचा उल्लेख कोठें सांपडणें संभवनीय नाहीं. आपल्याच देशांत असें आहे असें नव्हे. पाश्चात्यांच्याही स्मृतींची–ह्मणजे धर्माज्ञांची हीच स्थिति आहे. बर्टरँड रसेल आपल्या MARRIAGE & MORALS या ग्रंथांत ह्मणतात, “ The church, which tends to view marriage solely from the point of view of sex, sees no reason why one partner should not do just as well as another. ”

एवंच पुराणकाळच्या स्मृतींत प्रीतीचें स्थान मानलें नसलें तर तें साहजिकच आहे; आणि तें जितकें साहजिक आहे तितकेंच आजच्या काळांत प्रीतीचें महत्त्व न मानणें अनैसर्गिक, असमंजसपणाचें आणि अक्षम्य होय !


शिवाय, केवळ पतिपत्नींतील वैषयिक संबंधाचा विचार केला तरी अलीकडे शास्त्रज्ञांनीं या बाबतींत जे सिद्धांत पुढें मांडले

आहेत ते लक्षांत घेतल्यावांचून चालावयाचें नाहीं. स्त्री व पुरुष हीं केवळ शरीरानींच संयुक्त होत असतील तर त्यापासून स्त्रीला काय किंवा पुरुषाला काय सर्वांगी व शुद्ध आनंद होणें शक्य नाहीं असें शास्त्रज्ञांचें ह्मणणें आहे. संभोगामुळें स्त्रीपुरुषांची वैषयिक तृष्णाच नव्हे तर त्यांच्या अंतःस्थ भावनांना, विचारांना आणि वासनांना जी एक अनिर्वचनीय अशी संगमाची व ऐक्याची ओढ किंवा तृष्णा लागलेली असते ती परिपूर्ण झाली पाहिजे.

हेव्हलॉक एलिस या पंडिताच्या मतें विवाहाचा प्रकार जसजसा रूढ होत जातो तसतसें त्याच्या आद्य हेतूचें महत्त्व कमी होत जाऊन प्रीतीचेंच महत्त्व वाढत जातें. स्त्रीपुरुषांनीं प्रजा निर्माण करावी व त्या प्रजेचें संगोपन करावें यासाठीं प्रथम विवाहाची संस्था निर्माण झाली. विवाहित स्त्रीपुरुषांच्या संभागापासून प्रजोत्पादन व्हावें हा विवाहसंस्थेचा पहिला उद्देश. त्या संगमापासून त्यांना सौख्य व्हावें कीं नाहीं याकडे कोणी फारसें लक्ष देत नाहीं. परंतु समाज अधिकाधिक प्रगल्भ आणि सुसंस्कृत होत चालला कीं या आद्य हेतूहून वेगळीच अशी एक दुसरी भावना स्त्रीपुरुषांना कळूं लागते. ही भावना ह्मणजेच प्रीति.

हा प्रणयभाव कसा उद्भवतो तें पहाणें मनोरंजक होईल व त्यावरून 'प्रणय' 'प्रणय' असें आपण ज्याला ह्मणतों त्याचा अर्थ तरी काय तें वाचकांस समजेल ह्मणून मुद्दाम त्याविषयीं दोन शब्द लिहितों.

माणसाच्या ठिकाणीं इच्छेचें स्फुरण झालें कीं वाटेंत कांहीं अडथळा नसेल तर त्या इच्छेची पूर्ति करणारी कृतीहि ताबडतोब घडते. अशा कृतीच्या वेळीं इच्छाकेंद्र आणि कृति यांचा सरळ संबंध घडतो. पशुकोटींत आणि रानटी अवस्थेच्या काळांत मानवकोटींतहि संगमाची इच्छा उद्भवली कीं तिच्या मार्गांत कसलाही अडथळा नसतो व ती पूर्ण होते. इच्छा व प्रत्यक्ष विषयसेवन यांचा संबंध खालील प्रकारचा असतो:—





परंतु संस्कृति उन्नत होत गेली कीं मनुष्याच्या मेंदूचें कार्यही पहिल्यासारखें एकजिनसी व एकांगी रहात नाहीं. नाना तऱ्हेच्या वासना व शक्ति यांच्या उदयामुळें तें कार्य अधिकाधिक संकीर्ण होत जातें. त्याचप्रमाणें रीतिरिवाजाची, शिष्टतेचीं, औचित्याचीं बंधनें उत्पन्न होऊन संभोगाच्या मार्गांत अनेक अडचणीहि उत्पन्न होतात. यामुळें इच्छा व संभोग यांत पूर्वीप्रमाणें सरळ सीधा संबंध रहात नाहीं. संभोगेच्छा उत्पन्न होतांच ती पुरी होण्याऐवजीं त्या इच्छाशक्तीचा प्रभाव आधीं मेंदूकडे जावा लागतो व तेथें मेंदूच्या संकीर्ण केंद्राकडून त्याला दिशा मिळेल त्याप्रमाणें तो प्रवाह अखेर प्रत्यक्ष कृत्यांत रूपांतर पावतो – कधीं कधीं ही अखेरची परिणति घडतहि नाहीं. असें झालें ह्मणजे संभोगेच्छा सरळ, जवळच्या रस्त्यानें कृतीपर्यंत जाण्याऐवजीं मेंदूच्या मार्गानें, परोक्ष रीतीनें व लांबच्या रस्त्यानें जाऊं लागते.

खालील आकृति नं. २ पाहिल्यास हें झटकन ध्यानांत येईल.

इच्छा व संभोग यांमधील छोटें मंडल नाहींसें होऊन असें मोठें मंडल प्रस्थापित झालें कीं संभोगेच्छा आणि मानवी अंतः-करणांतील अनंत नाजूक, सूक्ष्म वासना, भावना व प्रवृत्ति ही एकमेकाशीं निगडीत होत जातात; आणि अशा वेळीं जो कांहीं एक अनिर्वचनीय भाव मानवी हृदयांत उदय पावतो त्यालाच आपण ‘प्रणय’ ही संज्ञा देतों. या प्रणयाची सत्ता उत्तरोत्तर बळावत जाते, आणि सामाजिक जीवनांतील माधुर्य, समरांगणा-वरील शौर्य, कलेंतील आणि वाङ्मयांतील प्रतिभा विलास या या सर्वांचें मूळ उगमस्थान त्या सत्तेतच असतें.

आकृति नं. २



याचा अर्थ असा कीं मानवी संस्कृतीच्या प्रथमावस्थेंत संभोगाची पाशवी प्रवृत्ति हा एकच विवाहाचा आधार असतो, आणि संस्कृति जसजशी परिणत होत जाईल तसतसें या प्रवृत्तींतून दुसऱ्याच एका प्रवृत्तीचा -- प्रणयवृत्तीचा उगम होतो. संभोगेच्छा सरळ कृतीपर्यंत धांवेनाशी होऊन आधीं वाटेंत मेंदूवर तिची क्रिया घडते आणि कित्येक विकारविचारांचा त्या क्रियेमुळें प्रक्षोभ होतो. ही प्रणयभावना उशीरां उद्भवत असली तरी मानवी संस्कृतीचा परिपोष तिच्यावरच अवलंबून आहे; आणि याच कारणाकरतां विवाहरचनेंत तिचाच विचार सर्वांत अगत्यानें केला पाहिजे.

प्रीतीच्या बाबतींत आपल्या समाजांत एक मोठा विचित्र अयुक्ताभास दिसून येतो. काव्यांत, वाङ्मयांत, विनोदपरिहासांत प्रणयाखेरीज एक पाऊल पुढें पडत नाहीं. रंगभूमीवर तरुण स्त्रीपुरुषांचे प्रणयप्रलाप मुक्त कंठानें चालतात--नव्हे तसे चालले नाहींत तर लोकांना पटत नाहीं. कादंबऱ्यांत प्रणयव्याकुल स्त्रीपुरुषांच्या कृतींचीं वर्णनें वाचावयास मिळालीं नाहींत तर आह्मांला चैन पडत नाहीं. आमच्या कवींनीं तर प्रणयापायीं किती सुनीतें खर्चीं घातलीं असतील त्याला गणति नाहीं. हा आमचा वाङ्मयसंभारच वाचून आमच्या समाजाविषयीं एखाद्या परक्या माणसानें मत बनविलें तर तो खचित ह्मणेल कीं हिंदू समाजांत प्रीतीचा बडेजाव फार आहे. परंतु जें आह्मांला काव्यांत हवेंसें वाटतें तें आह्मांला प्रत्यक्ष व्यवहारांत नको असतें. शृंगाररसानें ओथंबलेले संवाद आपल्या नाटकांत ऐन भरानें लिहिणाऱ्या नाटककारांनाहि प्रत्यक्ष व्यव-

हारांत प्रीतिविवाह रूढ व्हावेत हें मान्य नसतें. हा विलक्षण अयुक्ताभास ( Paradox ) अगदीं गर्हणीय नव्हे काय ?

आणि या प्रकाराच्या बुडाशीं संस्कृतीविषयींच्या भ्रामक कल्पना आणि भेकडपणा याशिवाय आणखी दुसरें काय आहे ?

या भेकडपणाचा शेवट करण्याची ताकद तरुणांतच असणार. ह्मणून मी प्रथमच ह्मटलें कीं, प्रीतिविवाहाची ही आवश्यक सुधारणा घडवून आणण्याचें कार्य वडील माणसें करतील अशी आशा तरुणांनीं बाळगण्यांत अर्थ नाहीं. हा प्रश्न तरुणांच्या अत्यंत जिव्हाळ्याचा आहे. आणि त्या प्रश्नाची सोडवणूक त्यांच्याहातून झाली पाहिजे. वडील माणसांनीं या बाबतींत आस्था आणि उत्सुकता दाखविली तर सोन्याहून पिवळें. पण तसें घडलें नाहीं तरी तरुण स्त्रीपुरुषांनीं कठोरपणा स्वीकारून स्वमताचा आग्रह या प्रश्नांत धरावयास हरकत नाहीं.

स्त्रीपुरुषांतील परस्पर प्रेमभावाविषयीं शुकवृत्ति धारण करण्याचें सोंग कोणी कितीही केलें तरी त्या सोंगावर विश्वास ठेवण्यांत अर्थ नाहीं. समाजांतील लहान मोठ्या सर्व व्यवहारांच्या बुडाशीं हें परस्पर आकर्षणच आहे. ज्यांना तें नाहींसे वाटतें त्यांना निसर्ग कळला नाहीं. ज्यांना तें नसावेसें वाटतें त्यांना मानवी स्वभावाचें ज्ञान झालेलें नाहीं.

आमच्या संसारांत प्रीतीला स्थान नाहीं ह्मणून एकंदर वैवाहिक आयुष्याची मांडणी उलटीसुलटी झालेली आहे; आणि हें

मध्यवर्ति चक्र दोऱ्याबाहेर फिरत असल्यामुळें बाकीच्या सर्व चक्रांचे फेरे वांकडेतिकडे चालू आहेत. अर्थात् सुखापेक्षां दु:खाचेच तडाके आमच्या वांट्याला अधिक येऊन संसार ह्मणजे ' भवचक्र ' असून " या भवचक्रांतून सोडीवरे बाबा ! " ह्मणून कोठल्या तरी मानीव परमेश्वराचा धांवा केल्याशिवाय आमच्या समाजांतील लोकांना गत्यंतर उरत नाहीं. हे सारे क्लेश आमचे आह्मी निर्माण केले आहेत, व प्रीतीविवाह जितक्या लवकर रूढ होतील तितक्या लवकर ते सरतील हें पक्कें ओळखून तरुण स्त्रीपुरुषांनीं या बाबतींत पाऊल पुढें टाकलें पाहिजे. असें करण्यास आपल्या समाजांत सध्यां पुरेशी अनुकूल परिस्थिति नाहीं इत्यादि अडचणी माझ्या लक्षांत नाहींत असें नव्हे; पण त्या तरुणांनींच नाहींशा केल्या पाहिजेत असा माझा उघडच अभिप्राय असल्याकारणानें त्याबद्दलचें विवेचन न करतां हा विषय येथेंच पुरा करतों.



# प्रकरण ९ वें

# विवाहाचें दिव्य!

प्रीतिविवाहाचें प्रतिपादन ऐकलें कीं कांहीं लोक ह्मणतात, अहो ह्मणजे स्वैराचरणालाच तुह्मी धडधडीत उत्तेजन देणार आणि वाटेल त्यानें वाटेल त्याचा हात धरून चालूं लागावें असला अनाचार तुह्मी समाजांत माजविणार कीं काय? परंतु असला प्रश्न वेडेपणाचा होय. वाटेल त्याचा हात वाटेल त्याच्या हातांत देण्याच्या अत्याचाराचा आरोप वास्तविक सध्यांच्या विवाहपद्धतीच्या पुरस्कर्त्यांवरच करावा लागेल; आणि प्रीतिविवाहाचा खरा अर्थ ज्याला समजला त्याला असल्या अत्याचाराचीं फळें प्रीतिविवाहाला येतील असें स्वप्नांतही याव-याचें नाहीं.

कारण कामुक आकर्षण उत्पन्न झालें कीं स्त्रीपुरुषांनीं लग्न करून मोकळें व्हावें असा प्रीतिविवाहाच्या प्रतिपादनाचा अर्थ होत नाहीं. उलट, प्रीतिविवाहाचें मंडन करणारा कोणताही सूज्ञ मनुष्य प्रीति आणि कामुकता यांतील भेद मान्य करील. प्रीतिविवाह व्हावेत याचा सरळ अर्थ असा कीं वधूवरांच्या परस्पर निवडीनें विवाह व्हावेत. वधूवरांची खरी प्रीति एक-मेकांस पटलेली असावी, व विवाह ह्मणजे त्यांच्या परस्पर प्रीतीची एक प्रकारची सांगता असावी.

प्रीतिविवाह रूढ व्हावेत असं जेवढ्या कटाक्षानें ह्मणाव-याचें तेवढ्याच कटाक्षानें प्रीतीच्या बाबतींत बावनकशी कोणती

आणि हिणकस कोणती हें नीट ओळखायला शिका असें तरुण स्त्रीपुरुषांना सांगितलें पाहिजे हें उघड आहे. तारुण्यांत स्त्रीपुरुषांमध्यें जातिनिष्ठ आकर्षण साहाजिकपणेंच फार जोराचें असतें. वैषयिक वासनांचा प्रश्न अजीबात सोडला तरी स्त्रियांच्या सहवासांत पुरुषांच्या भाषणाला व कृतीला कांहीं निराळीच कांति चढते हें नेहमींच्या अनुभवांतलें आहे. आपल्या सान्निध्यांत पुरुषांनीं विशेष दाक्षिण्यानें वागावें यांत स्त्रियांनाहि कांहीं एक वेगळाच आल्हाद होतो हाहि नेहमींचा अनुभव आहे. तरुण स्त्रीपुरुषांस एकमेकांचा सहवास प्रिय वाटतो व एकमेकाचें बाह्य आकर्षण ताबडतोब अनुभवास येत असतें. तारुण्यांत शारीरिक सौंदर्यावर मन साहाजिकपणेंच झटकन लुब्ध होतें, आणि आत्मिक सौंदर्य शोधण्याची व ओळखण्याची सूक्ष्म दृष्टि अंगीं आलेली नसते. तारुण्यसुलभ मनोवृत्तींची आरंभीं जी मीमांसा मी केली ती वाचक विसरले नसतीलसें वाटतें. तारुण्यकाळीं माणूस अधीर असतो, उत्तान प्रकृतीचा असतो, त्याला हवें नको चटकन वाटतें आणि केवळ वरवरच्या देखाव्यानें वाटतें. अशा वेळीं स्त्रीपुरुषांस परस्परांविषयीं वाटणारें आकर्षण केवळ जातिकृत्, दर्शनी आणि तात्पुरतें असण्याचा संभव फार; आणि याच आकर्षणाला प्रीति मानण्याचा मोह पडण्याची भीतिही फार.

परंतु तरुणांनीं हें ध्यानांत घ्यावें कीं अशा जातिकृत् आकर्षणालाच प्रीति मानलें तर साऱ्याच पुरुषांची साऱ्याच स्त्रियांवर प्रीति जडण्याचा अनवस्थाप्रसंग येईल. जातिकृत् आकर्षण हा सामान्य मानवी धर्म आहे. वारा आला कीं वृक्षपल्लव हालायचेच

तसेंच एकमेकांच्या सहवासांत स्त्रीपुरुषांच्या हालचालीला उत्तेजन मिळावयाचेंच. उलट प्रीति ह्मणजे या सामान्य धर्माहून कांहीं तरी अधिक उच्च, अधिक उदात्त, अधिक चिरंजीवी असें आहे.

प्रीति ह्मणजे नक्की अमुक असें सांगणें सोपें नाहीं. मोठमोठया शब्दसंपन्न कवींनीं देखील " आंतरः कोऽपि हेतुः । " असें ह्मणून प्रीतीचें स्वरूप स्पष्ट करण्याचें कौशल्यानें टाळलें आहे. पण आपल्या विषयाच्या दृष्टीनें अशी टाळाटाळ चालायची नाहीं, आणि ती करण्याचें कारणही नाहीं.

प्रीति ह्मणजे गाढ स्नेहाचाच एक विशिष्ट प्रकार आहे. सजातीयांतील स्नेहाला स्नेह हें नांव पुरेसें होतें; तसा स्नेह स्त्रीपुरुषांत उत्पन्न झाला ह्मणजे त्याला प्रणय, प्रेम, अनुराग, प्रीति इत्यादि संज्ञा प्राप्त होतात. स्नेह ह्मणजे दोन व्यक्तींतील द्वैत नाहींसें करणारी एक प्रक्रिया आहे. ही प्रक्रिया केवळ बौद्धिक व भावनात्मक असते खरी, परंतु शारीरिक आकर्षणाची त्यांत भर पडली तर ती प्रक्रिया अधिकच प्रभावी झाल्यावांचून रहात नाहीं. ह्मणूनच पुरुषापुरुषांतील किंवा स्त्रिया स्त्रियांतील स्नेहापेक्षां स्त्रीपुरुषांतील प्रीति अधिक प्रभावशाली असते. सजातीय स्नेह कितीही गाढ झाला तरी त्यांत शारीरिक द्वैत राहणारच. स्त्रीपुरुषांच्या प्रीतींत मात्र हें द्वैतही नाहींसें होतें आणि दोन जीवांचा अंतर्बाह्य संयोग होऊन दिव्य अद्वैताची सिद्धि झालेली दिसते.

अर्थात् स्त्रीपुरुषांतील प्रीतींत वैषयिक संयोगाचा भाग असला तरी त्या प्रीतीचें सामान्य स्वरूप स्नेहाचेंच आहे; आणि दोन

व्यक्तींत स्नेह कोणत्या कारणानें उद्भवतो याचा विचार केला कीं स्नेह ह्मणजे काय तें लक्षांत येईल, व त्यावरून प्रीतीचेंही स्वरूप स्पष्ट होईल.

विरुद्ध गोष्टी एकमेकीला आकर्षित करतात असें ह्मणण्याचा प्रघात आहे. परंतु कांहीं एका मर्यादेपर्यंतच या सूत्राची सत्यता मानणें उचित होईल. स्नेहाच्या किंवा प्रीतीच्या बाबतींत तर विरुद्ध स्वभावांतील परस्पराकर्षण नियमापेक्षां अपवादादाखलच मानलें पाहिजे. किंवा असें ह्मणूं कीं धर्मानें, धंद्यानें, दर्ज्यानें किंवा व्यवसायानें भिन्न असलेल्या व्यक्तींत प्रीति उत्पन्न होऊं शकेल व त्या भिन्नतेमुळें त्या प्रीतीचा कदाचित् परिपोषही होईल; परंतु स्वभावांत भिन्नता असेल, रुचींची भिन्नता असेल तर प्रीतीचा उद्भव होणें शक्य नाहीं. ह्मणजे परिस्थितीपुरतें पाहिलें तर विरुद्धांचें आकर्षण घडेल; परंतु स्वभावधर्म आणि रुचि-अरुचीचा विचार केला तर प्रीतीचा उगम होण्यास साधर्म्यच पाहिजे. कवि आणि योद्धा यांच्या व्यवसायांतील विरोध परस्पराकर्षणास कारणीभूत होण्याचा संभव आहे. परंतु, केव्हां ? दोघांचीही अभिरुचि, दोघांचेही छंद, भावना, लालसा एक असतील तर.

प्रीतीचें स्वरूपहि बहुतांशीं असल्या साधर्म्याचेंच असलें पाहिजे. गाढ प्रीति विचार विकारांच्या आणि अभिरुचींच्या साधर्म्यानेंच उद्भवते व टिकते. स्त्रीपुरुषांच्या एकमेकावरील अनुरक्तींत कामगुणाचा अंश असणारच परंतु त्या कामगुणालाहि अभिरुचि साधर्म्याचा आधार असेल तरच तो चिरकालिक होतो. अनुरक्त वल्लभ कामिनीला " माझें तुझ्यावर प्रेम आहे " असें म्हणतो त्या वेळीं त्या शब्दांतील खरा अभिप्राय हाच असतो

कीं "ज्या गोष्टी मला प्रिय आहेत त्या तुला प्रिय आहेत म्हणून तूं मला प्रिय आणि कमनीय वाटतेस." आणि कामिनीला वल्लभ प्रिय वाटतो त्याचाहि खरा अर्थ तिच्या प्रीतींतल्या वस्तू त्याला प्रिय असतात म्हणून त्याचा सहवास तिला सुखकर वाटतो आणि त्या बौद्धिक संगमामुळें संपूर्ण संगमाची आस अंतःकरणांत उत्पन्न होते हाच होय.

यावरून प्रीति ही एक स्नेहाचीच -- कामकृत्यानें प्रबल व दृढ होत जाणारी -- जाति आहे हें उघड व्हावयास हरकत नाहीं. प्रीतिविवाहाचें विवेचन कोणत्या संदर्भानें मीं सुरू केलें त्याची वाचकांना आठवण देतों म्हणजे प्रीतीचें स्वरूप आणखी निश्चित होईल. संसारांत रमणीयता व प्रसन्नता येण्यासाठीं पतिपत्नींत अव्याज स्नेहभाव पाहिजे असें मीं प्रतिपादिलें व त्यावरून असा मुद्दा निघाला कीं जोंपर्यंत सध्यांची सदोष विवाहपद्धति रूढ आहे तोंपर्यंत अशा स्नेहभावाची अपेक्षा करणें चुकीचें असून त्यासाठीं प्रीतिविवाह रूढ झाले पाहिजेत. ह्याचाच अर्थ असा कीं विवाहानंतर पतिपत्नींमध्यें स्नेहभाव असावा यासाठीं त्या स्नेहाचा प्रारंभ विवाहापूर्वीच झालेला असला पाहिजे. या पहिल्या स्नेहासच प्रीति, प्रणय, अनुराग हीं काव्यमय नांवें आपण देतों.

विवाहाच्या आधींचा प्रणय विवाहानंतरहि कायम राहण्यास एक गोष्ट अत्यंत आवश्यक आहे. ती ही कीं विवाहित स्थितीच्या हेतूबद्दल व उद्दिष्ट कार्याबद्दल पतिपत्नींना स्पष्ट समजूत असली पाहिजे. स्नेहाचा एक चमत्कार असा आहे कीं स्नेहामुळें एकमेकाचा सहवास अधिकाधिक हवासा वाटतो, आणि उलट

अतिसहवासानेंच शेवटीं स्नेहाचा उच्छेद होतो. प्रीतीच्या बाबतींतदेखील हा न्याय लागू आहे, आणि पतिपत्नींचा एकच सहवास पराकोटीचा असल्याकारणानें परस्पर स्नेहाच्या सूक्ष्म तंतूवर ताण पडून ते तुटण्याचा संभव सर्वांत अधिक असावा हें साहजिकच आहे. यासाठीं प्रीतिविवाह रूढ झाले म्हणजे तरुण स्त्रीपुरुषांपुढें विवाहित स्थितींत स्नेहाचा झरा अखंड जिवंत कसा ठेवावयाचा हा मोठा महत्त्वाचा प्रश्न उद्भवेल व तो प्रश्न सोडविण्याचा एकच मार्ग हाच कीं उभयतां पतिपत्नींना विवाहित स्थितीच्या उद्दिष्ट कार्याची पूर्ण कल्पना असली पाहिजे.

गृहस्थाश्रमाचें स्वरूप आतां पूर्वीसारखें राहिलेलें नाहीं; किंवा वाटल्यास असें म्हणूं कीं आजची आर्थिक परिस्थिति इतकी निराळी आहे कीं गृहस्थाश्रमाचें पुराणें स्वरूप कायम ठेवणें चुकीचें होईल. राजसत्तेच्या नमुन्यावर झालेली पूर्वीची कुटुंबाची रचना बदलून तिला लोकसत्ताक पद्धतीचें वळण लावलें पाहिजे असें मीं मागें म्हटलें तें वाचकांस स्मरतच असेल. प्राचीनकालीं एकंदर समाज कार्यक्षम, प्रबल आणि अजिंक्य व्हावा या हेतूनेंच समाजधुरीणांनीं विवाहसंस्था निश्चित केली होती; व सामाजिक हित साधण्याचा प्रश्न सर्वांत अगत्याचा असल्यामुळें व्यक्तीच्या बुद्धीला त्यांनीं फारसा वावच ठेवला नव्हता. बुद्धीचा विकास होण्यापूर्वीच स्त्रीपुरुषांचे विवाह व्हावेत, आणि गृहस्थाश्रमधर्माच्या नियमांप्रमाणें त्यांनीं वागावें अशी त्यांनीं योजना केली होती. याबद्दल त्यांना दोष देण्याचें यत्किंचित्‌हि कारण नाहीं. एकंदर समाजाला जेव्हां इतर समाजांशीं युद्ध

करून आपले वर्चस्व प्रस्थापित करावयाचें असतें किंवा कायम ठेवावयाचें असतें तेव्हां व्यक्तींचें स्वातंत्र्य हिरावून घेऊन त्यांना जीवनाच्या एका यांत्रिक साच्यांत घालणें भागच असतें. महायुद्धाच्या वेळीं युरोपिअन राष्ट्रांनीं सक्तीची लष्करभरती ज्या तत्त्वावर केली त्याच तत्त्वावर आमच्या पूर्वजांनीं सक्तीची लगीनभरती केली म्हणावयास हरकत नाहीं.

परंतु ही असली 'लगीनभरती' आतां आपल्याला बंद करावयाची आहे. विवाह अजाणतेपणीं व्हावयाचे थांबून प्रीतीच्या रेशमानें लग्नगांठ बसावी असें आपण करणार आहोंत. या नव्या सुधारणेचीं सारीं गोड फळें आपल्या पदरांत पडावींत अशी आपली इच्छा असेल तर तरुण स्त्रीपुरुषांनीं—विशेषतः नववधूवरांनीं—विवाहित स्थितीच्या उद्दिष्ट कार्यासंबंधीं व त्या स्थितींत प्राप्त होणाऱ्या सुखदुःखासंबंधीं योग्य ती खूणगांठ लग्नगांठी--बरोबरच आपल्या मनाशीं बांधून ठेवणें अत्यंत अगत्याचें आहे.

मुख्य गोष्ट ह्मणजे विवाह झाल्याबरोबर निर्विकल्प सौख्याचा ठेवा हातीं येणार असें तरुण स्त्रीपुरुषांनीं समजतां कामा नये. विवाह ह्मणजे सुखाचा सोपा मार्ग नव्हे.

विवाहित आयुष्यांत जो एक आनंद आहे त्याला कशाची उपमा नाहीं हें तर खरेंच. परंतु तो आनंद सुखासुखीं मिळत नाहीं. त्याच्यासाठीं शारीरिक व मानसिक कष्ट सोसावे लागतात, आणि अनेक प्रकारचा त्याग करावा लागतो. विवाहापूर्वीच्या प्रीतीचा आनंद निराळा, विवाहित स्थितींतील आनंद निराळा. पहिला उन्मादासारखा असतो, दुसरा प्रयत्नपूर्वक मिळविलेला


व गंभीर स्वरूपाचा असतो. प्रियाराधनाच्या सोहाळ्यांत सुखाच्या भरारीला जबाबदारीचें बंधन नसतें. एकमेकाचें अंतःकरण जिंकण्याच्या क्रीडेंतच मन तल्लीन झालेलें असतें, व दुसऱ्याचें हृदय आपण जिंकीत चाललों आहोंत या प्रत्ययाची निशा अशी जबर असते कीं, तिच्यापुढें कसलें भान उरत नाहीं. प्रियाराधनाची सांगता विवाहावांचून होणें शक्य नाहीं. परंतु विवाह झाला कीं प्रियाराधनांतील अल्लड आनंद परिसमाप्त होतो, निदान त्याला अगदीं निराळें वळण लागतें हें तरुण स्त्रीपुरुषांनीं ओळखलें पाहिजे. विवाहाच्या विधीनें स्त्रीपुरुषांतील प्रीती परिणत स्वरूपाला जाते आणि त्या प्रीतींत कोणतेंही न्यून राहूं नये एतदर्थ कामकृत्याला समाजाची संमति मिळते. परंतु प्रणयाच्या या सांगतेबरोबरच आनंदाचें मुग्ध, साधें स्वरूप नाहींसें होऊन तो संकीर्ण आणि सविकल्प होतो.

ह्मणून आपण विवाहित झालों ह्मणजे सुखाची, चैनीची, आनंदाची रेलचेल उडणार आहे अशी खोटी अपेक्षा विवाहोन्मुख तरुण स्त्रीपुरुषांनीं कधीं ठेवूं नये. अशी अपेक्षा चुकून राहिली तर मी ह्मणतों तो मधुर स्नेहभाव पतिपत्नींत टिकणार नाहीं व संसारांत रम्यपणाही राहणार नाहीं.

स्त्री व पुरुष विवाहबद्ध झालीं कीं दोघांच्याही पूर्वीच्या स्वतंत्र व्यक्तित्वावर उत्कर्षक्रिया घडून एक प्रकारचें तिसरेंच संयुक्त व्यक्तित्व निर्माण होतें. वैषयिक, वासनात्मक, आर्थिक, सर्वच संबंधांना निराळेंच स्वरूप प्राप्त होतें. ज्या नैसर्गिक जातिकृत आकर्षणामुळें प्रीती वाढत जाऊन अखेर विवाह झाला, त्याला

गौणत्व येऊन दुसऱ्याच गोष्टींचें प्रधानत्व प्रत्ययाला येतें. पतिपत्नींचें उभयतांचें मिळून एक संयुक्त जीवन सुरू होतें. या संयुक्त जीवनाची जाणीव पतिपत्नींच्या ठिकाणीं जेवढी असेल त्या मानानें विवाहाचा हेतू सफळ झाला असें म्हणतां येईल.

वर्तुळाला एकच मध्य असतो; पण लंबवर्तुळाला दोन मध्य किंवा केंद्रें असतात. या उपमेचा उपयोग करून आपल्याला असें म्हणतां येईल कीं विवाहापूर्वीं स्त्रीचें किंवा पुरुषाचें जीवित वर्तुळासारखें असतें, पण विवाह झाला कीं दोघांच्याही जीविताचें स्वरूप लंब वर्तुळासारखें होतें. तें आकृतीनें खालीलप्रमाणे दाखवितां येईल:—




या आकृतींतील दोन केंद्रांपैकीं प्रत्येकाच्या ठिकाणीं कारकशक्ति आहे. परंतु एकंदर लंबवर्तुळाचें क्षेत्र कांहीं एकाच्याच

कारकशक्तीमुळें निर्माण होत नाहीं. दोन केंद्रांत जें कर्षण सुरू असतें त्यामुळें तें क्षेत्र निर्माण होतें. लंबवर्तुळ म्हणजे हें केंद्र किंवा तें केंद्र मानतां येणार नाहीं. त्या केंद्राहून स्वतंत्र असें त्याचें अस्तित्व आहे. विवाहित आयुष्याचें हुबेहुब असेंच आहे. स्त्रीपुरुषांच्या परस्पर आकर्षणामुळें तें निर्माण होतें व स्त्रीचें जीवन म्हणजे विवाहित आयुष्य किंवा पुरुषाचें जीवन म्हणजे विवाहित आयुष्य असें नसून त्या आयुष्याचें तिसरेंच स्वतंत्र असें स्वरूप मान्य करणें भाग आहे.

तेव्हां विवाह म्हणजे कर्षणात्मक अवस्था आहे. त्यांत उपभोगापेक्षां कर्तव्याचाच भाग अधिक आहे. केवळ विलास व उपभोग यांनीं परिप्लुत असें वैवाहिक आयुष्य लाखांत एका तरी दंपतीच्या वांट्याला येत असेल कीं नाहीं शंकाच आहे. विवाह झाला कीं कर्तव्य आणि कष्ट संपण्याऐवजीं सुरू होतात. विवाह केला कीं सुखाचा प्रश्न सुटला असें कोणी समजूं नये.

किंबहुना मानवी जीवितांत सुखाचा प्रश्न कधीं सुटतच नसतो. कारण सुख किंवा आनंद हा कोणत्याहि मानवी यत्नाचा हेतू असून चालत नाहीं. एक अनुषंगिक फळ म्हणूनच त्याचा स्वीकार करावयाचा असतो. जीवित म्हणजे निर्मिति आणि विनाश अशा दुहेरी अंगाची एक विचित्र प्रक्रिया आहे. जुनी स्थिति नष्ट करून नवी निर्माण करावयाची हेंच मानव जीवितांतील लहान, मोठ्या सर्व व्यापारांचें मर्म आहे.

जीविताचा हा न्याय विवाहाला विशेषच लागूं आहे. म्हणून निर्भेळ सुखाची अपेक्षा विवाहितांनीं धरूंच नये. अशी अपेक्षा

न ठेवतां प्रियजनांनीं विवाहित स्थितींत पदार्पण केलें कीं नंतर निराशा वाटण्याचा व परस्पराविषयींचा स्नेहभाव दूषित होण्याचा संभव कमी. संकट, धडपड, ओढाताण, घर्षण हा जीविताचा मूलभूत न्याय आहे. त्यांवाचून जिवंतपणा व प्रगति शक्य नाहीं. विवाह ही वर दर्शविल्याप्रमाणें कर्षणात्मक अवस्था आहे ह्मणूनच त्या अवस्थेंत गेल्यावांचून स्त्रीपुरुषांच्या जीविताचें पूर्ण सार्थक होणार नाहीं. प्रगति व आत्मविकास विवाहावांचून शक्य नाहीं. संतानप्राप्ति ही त्या आत्मविकासाची सहज प्रत्ययाला येणारी एक तऱ्हा आहे. परंतु अशी एकच तऱ्हा नाहीं. अनेक तऱ्हांनीं व अनेक बाजूंनीं विवाहद्वारा स्त्रीपुरुषांचा विकास व्हावयाचा असतो. मात्र या विकासांत सुखाइतकाच दुःखाचा, उपभोगाइतकाच क्लेशाचा, आनंदाइतकाच मनस्तापाचा भाग असतो हें विसरतां कामा नये.

सुखदुःखांच्या या जोड संस्कारांची पूर्ण कल्पना ठेवून तरुण स्त्रीपुरुषांनीं विवाहास उद्युक्त झालें पाहिजे. व असेंही ध्यानांत घेतलें पाहिजे कीं विवाहित स्थितींत या जोड संस्कारांची परमावधि होते ह्मणूनच त्या स्थितीसारखें जीवितसाफल्याचें दुसरें साधनच नाहीं. मनुष्याच्या जीवितांत ढिलेपणा आला कीं त्याची प्रगति बंद होते. प्रगतीसाठीं व जिवंतपणासाठीं त्याच्या शारीरिक व मानसिक शक्तींवर सारखा ताण पाहिजे. हा ताण तात्पुरता क्लेशकारक वाटतो; परंतु त्यांतूनच प्रगति निर्माण होत असते. तंतवाद्याची तात ताणूं लागलें कीं ती जरा कुरकुर करते खरी; पण बरोबर ताण बसला कीं त्यांतूनच मनोहर स्वरमाला निघतात. मानवी जीविताचें असेंच आहे. विवाहित आयुष्यांत

स्त्री व पुरुष यांच्या सर्व शक्तींवर दुसऱ्या कोणत्याहि स्थितींत पडत नाहीं इतका ताण पडतो; पण तसा तो पडतो म्हणूनच विवाहाच्या योगानें स्त्रीपुरुषांच्या जीविताचें पूर्ण सार्थक होतें.

प्रत्येक व्यक्तीच्या एकाकी जीवनांत अनेक प्रकारचीं न्यूनें असतात व तीं भरून काढण्याची धडपड म्हणजेच त्या व्यक्तीचें आयुष्य होय. आपण खातों व पितों तें देखील न्यून भरून काढण्यासाठींच. विवाहाचा हेतूहि न्यूनत्व नाहींसें करण्याचा आहे. विवाहामुळें स्त्रीच्या व पुरुषाच्या जीवितास संपूर्णत्व येतें, तें सर्वांगांनीं सुफलित होतें. संभोगकृत्यानें स्त्रीच्या ठिकाणचें जीवबीज सुफलित व्हावें हा त्या साफल्याचा एक भाग होय. शरीरधर्माच्या या साफल्याप्रमाणेंच बुद्धि, भावना इत्यादि शक्तींचें साफल्य झाल्यावांचून स्त्रीच्या किंवा पुरुषाच्या जीविताची संपूर्णता होत नाहीं व अशा सर्वांगी साफल्याचा विवाह हा एकच मार्ग होय.

विवाहाचें हें उद्दिष्ट कार्य तरुण स्त्रीपुरुषांनीं सदैव ध्यानांत ठेवलें म्हणजे विवाहित आयुष्यांत पतिपत्नींना एकमेकाच्या प्रेमळ सहकारित्वाची व स्नेहभावाची किती जरूर आहे तें त्यांना कळेल लग्न गांठ पडल्यापासून उभयतांचें संयुक्त क्रियमाण सुरू होतें हें पतिपत्नींनीं कधींहि विसरतां कामा नये. दोघांनीं मिळून एकमेकाचें जीवितसाफल्य साधावयाचें असतें. दोघांपैकीं कोणीच पूर्ण स्वतंत्र नसतो. दोघांनींहि स्वतःच्या स्वातंत्र्याचें विवाहित आयुष्यांत विसर्जन करावयाचें असतें. पतिपत्नी एकमेकाची पूरक असतात. एकाचें न्यून दुसऱ्यानें भरून काढावयाचें

असतें. अर्थात् विवाहित आयुष्यांत सहकार्य ही पहिली आवश्यक गोष्ट होय. आणि कळकळीच्या सुहृद्भावाशिवाय खरें सहकार्य होऊं शकत नाहीं म्हणून सुहृद्भावाची महति सर्वांत अधिक.

प्रीतीनें प्रेरित होऊन तरुण स्त्रीपुरुषांनीं विवाह केले म्हणजे प्रारंभीं हा सुहृद्भाव त्या दोघांमध्यें साहजिकपणेंच असेल. परंतु हा स्नेहभाव कायम टिकणें सोपें नाहीं. वर एके ठिकाणीं झटल्याप्रमाणें चिरसहवास प्रीतीला किंवा स्नेहभावाला बावडा आहे. पतिपत्नी या नात्यानें सारखा एकत्र सहवास घडूं लागला कीं स्नेहभावाचा पहिला ताजेपणा नाहींसा होतो आणि त्या स्नेहभावाला दूषित करणाऱ्या – येवढेंच नव्हे, प्रसंगीं त्याचा उच्छेद करणाऱ्या शेंकडों लहान मोठ्या गोष्टी सहज घडतात. म्हणून पतिपत्नींतील सुहृद्भाव कायम कसा राहील हा प्रश्न फार महत्त्वाचा समजला पाहिजे.

विवाह म्हणजे चैनीचा परवाना नव्हे, विवाहित आयुष्यांत सुखाबरोबरच कष्टहि वांट्याला येतात ही समजूत पतिपत्नींनीं मनाशीं ठेवली कीं या प्रश्नाचा अवघडपणा बऱ्याच अंशीं कमी होईल हें वर अनेक प्रकारें दिग्दर्शित केलेंच आहे. परंतु याखेरीज इतरहि कांहीं गोष्टी तरुण स्त्रीपुरुषांनीं आपल्या मनावर ठसवून घेतल्या पाहिजेत. त्या कोणत्या तें पुढच्या प्रकरणांत पाहूं.

## प्रकरण १० वें

# पतिपत्नींतील सुहृद्भाव.

—x—

तरुण स्त्रीपुरुषांचे प्रीतिविवाह होऊं लागले म्हणजे त्यांजमध्यें परस्पराविषयीं सुहृद्भाव विवाहापूर्वींपासूनच असेल, व विवाहित आयुष्य हें एक संयुक्त क्रियमाण असून तें पतिपत्नींनीं सहकार्यानें साधावयाचें असतें ही जाणीव त्यांना ठेवतां येऊन त्यांचा संसार सुखाचा होण्याचा संभव आजच्यापेक्षां पुष्कळच अधिक राहील हेंच मीं मुख्यतः गेल्या प्रकरणांत दर्शविलें. पतिपत्नींत एक प्रकारचा मजेदार सुहृद्भाव असल्याखेरीज त्यांचें खरें सहकार्य शक्य नाहीं, व खऱ्या सहकार्यावांचून वैवाहिक आयुष्याचें साफल्य होणें शक्य नाहीं. अर्थात् तरुण पतिपत्नींनीं एकाच प्रश्नाचा विचार केला पाहिजे; आपला परस्पराविषयींचा सुहृद्भाव अखंड कसा टिकेल ?

विवाह हा एक आत्मविकासाचा मार्ग असून त्या मार्गानें जातांना सुखाइतकेंच दुःख, उपभोगाइतकेच क्लेश, आणि आनंदाइतकाच मनस्ताप माणसाच्या वांट्याला यावयाचाच ही समजूत तरुण पतिपत्नींनीं दृढपणें मनाशीं ठेवली कीं जरूर तो सुहृद्भाव दोघांमध्यें चिरकाल टिकण्यास पुष्कळच मदत होईल. परंतु या समजुतीप्रमाणेंच आणखीहि कांहीं गोष्टी त्यांनीं नेहमीं लक्षांत ठेवल्या पाहिजेत.

त्यांपैकीं पहिली ही कीं पतिपत्नींनीं एकमेकांच्या स्वाभिमानाला यत्किंचितही धक्का कधीं लावतां कामा नये.

प्रीति ही स्नेहाचीच एक विशिष्ट तऱ्हा आहे हें माझें प्रति-

पादन वाचकांस आठवतच असेल. सामान्यपणें सर्व प्रकारच्या स्नेहांत अशी गोष्ट दिसून येते कीं माणूस अंतःकरणपूर्वक स्नेह करीत असला ह्मणजे तो स्नेह्यासाठीं अनेक प्रकारचा त्याग करावयास तयार असतो, पण त्याच्या वृत्तींत कोठें तरी एक बिंदू असा असतो कीं तो दुखविला गेला तर तें मात्र सहन करावयाची त्यांची तयारी नसते. मित्रासाठीं वाटेल तसा पैसा खर्च करणाऱ्या माणसांचीं उदाहरणें दाखवितां येतील. मित्रासाठीं देहकष्ट करणाऱ्या निरपेक्ष व्यक्ती या आपमतलबी जगाच्या बाजारांतही कधीं कधीं आढळून येतात. परंतु निःस्वार्थी स्नेह करणाऱ्या अशा व्यक्तींच्या बाबतींतही सूक्ष्म नजरेनें पाहिल्यास असें आढळून येईल कीं आपल्या अंतःकरणांतील अमुक एक जागा मात्र कधीं दुखावली जाऊं नये असें त्या व्यक्तींना वाटत असतें.

समजा, एक सबजज्जाच्या हुद्याचा तरुण गृहस्थ आहे व त्याचा आणि एका समवयस्क नटाचा स्नेह जमला आहे. रुचींच्या साधर्म्यामुळें अशा दोन व्यक्तींचा स्नेह जमणें अगदीं सहज शक्य आहे. अशा या दोन स्नेह्यांतील स्नेह जसजसा गाढ होत जाईल तसतसा त्यांच्या हातून परस्परांसाठीं अनेक प्रकारचा स्वार्थत्याग हौसेनें घडत जाईल. एक दुसऱ्यासाठीं आपलें धनबल हवें तितकें खर्चील, तर दुसरा शरीरबल परोपरीनें खर्चून आपला स्नेहभाव व्यक्त करील. परंतु समजा त्या नटाच्या एका नाटकाच्या वेळीं सबजज्ज थिएटरांत गेला असतां कंपनीच्या मॅनेजरानें त्याला कोठल्या तरी एका कोपऱ्यांतल्या खुर्चीवर बसविलें, व त्या प्रकाराबद्दलचा आपला राग सबजज्जानें नटाजवळ व्यक्त केला असतां तो नट मॅनेजराच्या अडचणींचा पाढा वाचूं लागला तर

तो प्रकार सबजज्जाला खचित सहन होणार नाहीं, व त्या वेळचा तो राग विकोपाला जाऊन त्या व्यक्तींतील स्नेहही कदाचित् नामशेष होईल.

वाचक ह्मणतील, सबजज्ज व नट यांचा गाढ स्नेह असल्यावर सबजज्जाच्या अपमानाबद्दल सहानुभूति दाखविण्याऐवजीं आपल्या कंपनीच्या मॅनेजरविषयींच नट कळवळा दाखवील हें संभवनीय नाहीं. ही शंका वावगी नाहीं. परंतु मानवी जीवितांतील विविध अनुभव ज्याला प्रत्यक्ष घ्यावे लागले आहेत किंवा दुसऱ्यांनीं घेतलेले ज्याला पहावयास सांपडले आहेत त्याला ही शंका व्यर्थ वाटेल. माणसाच्या मनाच्या हालचाली कधीं कधीं अशा विलक्षण दिशेनें होतात कीं शक्याशक्यतेचे सामान्य हिशोब पार उलटपटून जातात, व असल्या विलक्षण हालचालींचा संभव मान्य करणें हाच मानसशास्त्रांतील एक ढोबळ नियम मानण्याची पाळी येते. किंबहुना स्नेह्यांपैकीं कोणी तरी एकानें अनपेक्षित दिशेनें मनाची धांव होऊं दिल्यानेंच स्नेहाचा उच्छेद बहुतेक उदाहरणांत झालेला दिसून येतो; व मला जो मुख्य मुद्दा सांगावयाचा आहे तो हाच कीं अशा प्रसंगीं मी ह्मणतों ती गोष्ट सदैव लक्षांत ठेवणारे जर दोघेही स्नेही असतील तर स्नेहनाशाचें संकट टळेल.

सबजज्ज मोठ्या हुद्याचा माणूस ह्मणून त्याच्या अंत:करणांत स्वाभिमानाची एक जागा असणें साहाजिक आहे असें सुचविण्याचा माझा हेतू नाहीं. उलट, नट जरी कांहीं दृष्टीनीं कमी प्रतिष्ठित असला व स्वत:तील व सबजज्ज मित्रांतील सामाजिक दर्ज्याचें अंतर त्या नटाला जरी पूर्ण मान्य असलें, तरीसुद्धां नटालाही स्वाभिमानाचा एक बिंदू असा जपावासा वाटणारच

कीं त्याचा प्रकाश कमी झालेला त्यालाही खपायचा नाहीं व त्या बिंदुवरचा आग्रह सोडण्यापेक्षां हातांत जतन केलेलीं सुगंधीं स्नेहपुष्पें उधळून द्यावयास तो तयार होईल.

स्नेहाचा हा सामान्य नियम आहे, व पतिपत्नींतील प्रीतिही ज्या अर्थी स्नेहाचीच एक विशिष्ट जाति आहे त्या अर्थी तिलाही तो लागूं आहे.

वरकरणीं असें वाटण्याचा संभव आहे, कीं प्रीतिविवाहानें जीं पतिपत्नी बद्ध होतील त्यांच्या ठिकाणीं अभिमानाला जागा कोठून असणार ? प्रणय ह्मणजे मुळीं प्रियजनासाठीं सर्वस्व टाकण्याची व प्रियजनाच्या जीवितांत स्वतःचें जीवित विलीन करून टाकण्याची तयारी. प्रियजनाशीं सर्वस्वीं समरस होण्याची ओढ ह्मणजेच खरा अनुराग. मग अशा अनुरागानें प्रेरित होऊन जीं विवाहबद्ध झालीं त्या दोन माणसांत स्वाभिमानाची ऊर्मि कशी उसळेल ?

तात्त्विक दृष्ट्या ती उसळूं नये. परंतु व्यवहाराच्या उंचसखल जागीं प्रणयाचा ओघ उतरला कीं ती उसळल्यावांचून रहात नाहीं.

एक तर असें कीं पतिपत्नी एकमेकावर कितीहि अनुरक्त असलीं तरी अगदीं निर्वेध अद्वैताची वृत्ति त्यांच्या दैनिक क्रमांत अखंड टिकणें शक्य नाहीं. प्रियाराधनाच्या कालांत ही वृत्ति स्त्रीपुरुषांच्या अनुभवास पुष्कळशा प्रमाणांत येईल. त्या कालांत एकमेकाचें हृदय जिंकण्याची धडपड चालू असते. प्रियजनाच्या चरणावरून सारा जीव कुरबान करावासें वाटत असतें. काय केलें म्हणजे हें माणूस आपलें अंकित होईल अशी धाप

लागलेली असते. काय देऊं व काय नको—या प्रियजनाला कुठें ठेवूं आणि कुठें नको असें होऊन गेलेलें असतें. त्यामुळें वल्लभरमणीमध्यें खरें अद्वैत प्रस्थापित होत जात असतें, व पहिल्या कामकृत्याच्या वेळीं त्या अद्वैतांतील उरलेंसुरलें न्यून नष्ट होऊन एक प्रकारच्या अनिर्वचनीय आनंदाची सिद्धता होते.

परंतु संसाराला सुरवात झाल्यावर अद्वैताची ही भावना अष्टौ-प्रहरच्या विविध व्यवहारांत कायम टिकणें शक्य नाहीं. ती तशी टिकली नाहीं तर त्यांत पतिपत्नींस विषाद वाटण्याचेंहि कारण नाहीं. ती टिकूं नये हें साहजिकच होय. विवाहानंतर प्रणयाला एक प्रकारचें गांभीर्य येतें असें जें गेल्या प्रकरणांत मीं ह्मटलें त्यांतील अभिप्राय हाच होय. प्रियाराधनाच्या कालीं एकमेकांच्या लाडक्या वृत्तींचा उपभोग घेण्याखेरीज प्रियजनांस कांहीं कर्तव्यच नसतें. कमलभृंगन्यायाखेरीज दुसरा कांहीं न्यायच त्या अल्लड अवधींत आयुष्याला लागूं नसतो. परंतु विवाह झाला कीं जीवितनाटिकेंतील ती मधुरालापी नांदी संपते आणि सुखदु:खांचे प्रवेश आळीपाळीनें सुरूं होतात. जबाबदाऱ्या, संकटें, त्रास, कष्ट, हा सारा प्रपंच पतिपत्नींना ग्राह्य मानणें भाग पडतें व दोघांच्याहि सौख्याचा प्रवाह बाल-वृत्तीनें खळखळत न वाहतां खोल, गंभीर असा व्हावयास लागतो.

ह्मणून वैवाहिक प्रपंच सुरूं झाल्यावर प्रीतिविवाहानें बद्ध झालेल्या पतिपत्नींतहि निर्वेध अद्वैताची निशा सदैव टिकणें शक्य नाहीं. तीं अंत:करणानें पूर्णपणें एकमेकाचीं — सर्वस्वी एक-

मेकाचींच राहतील. तथापि या अंतरस्थित एकत्वांवर व्यवहाराचीं हजार तऱ्हेचीं पटलें आल्यावांचून रहावयाचीं नाहींत; व त्यामुळें दोन गाढ स्नेह्यांतील स्नेह ज्या कारणांनीं नाश पावतो तीं कारणें पतिपत्नींतील प्रीतीहि नष्ट करण्यास समर्थ ठरतील. यासाठींच प्रत्येकाचा स्वाभिमानाचा कांहीं तरी एक बिंदू असतो व तो आपण कधींहि दुखवितां कामा नये हें तत्व जसें मित्रांनीं लक्षांत ठेवावयाचें तसेंच पतिपत्नींनींहि सदैव ध्यानांत बाळगेंल पाहिजे.

स्वाभिमानाचा हा प्रश्न पतिपत्नींच्या संबधांत हजार तऱ्हांनीं उद्भवणें संभवनीय असतें. समजा ज्याचें मूळ घराणें साताऱ्या-कडील एका खेडेगांवाचें आहे अशा एका तरुणाचें व जिच्या घराण्याच्या चारपांच पिढयाचें राहणें मुंबईस झालें आहे अशा एका तरुणीचें एकमेकांवर प्रेम जडलें व तीं दोघें विवाहित झालीं. दोघांच्या रुचिसाधर्म्याखेरीज त्यांची प्रीति जमणार नाहीं हें तर खरेंच. परंतु त्या दोघांतहि कांहीं बाबतींत रुचीचें भिन्नत्व असणारच यांतही शंका नाहीं. उदाहरणादाखल असें ह्मणतां येईल कीं नवरा मूळ साताऱ्याकडला असल्यामुळें त्याला रोज जोंधळ्याची भाकरी खाशीशी वाटेल. तर बायको मुंबईत लहानाची मोठी झाली असल्यामुळें तिला भाजींत पुदीना घातल्यावांचून भाजी गोड लागायची नाहीं अशा परिस्थितींत नवऱ्यानें एखादे वेळीं विनोदादाखल पुदीन्याच्या उग्र वासाची निंदा केली तर तें आनंदपर्यवसायी ठरेल किंवा बाय-कोनें ‘ इश्श ! कसली ती जोंधळ्याची भाकरी ! रानटी रांकट खाणं ! सुधारलेल्या माणसांना नाहीं शोभत ! ’ असें एखादे

वेळीं ह्मटलें तर त्या भाषणाची नवऱ्याला गंमत वाटेल व तो मनः-पूर्वक हंसून बायकोलाहि उलट एखाद्या कोटीनें हसवील.

परंतु हीच टीका एकमेकाकडून सदैव होऊं लागली तर ?

तर अर्थातच त्या टीकेला मौजेच्या विनोदाचें स्वरूप न राहतां निराळेंच स्वरूप येईल, पत्नीचा स्वाभिमान जागृत होऊन आपल्या नवऱ्यानें नेहमीं पुदीन्याविषयीं तिरस्कारानें बोलावें हें तिला सहन होणार नाहीं, उलट त्या पतीलाहि बायकोच्या तोंडून जोंधळ्याच्या भाकरीबद्दल अहर्निश निघणारे उपहासाचे शब्द कडू वाटायला लागून त्याचा स्वाभिमान दुखविला जाईल, आणि पतिपत्नींत ज्या सुहृद्भावाची व सहकार्याची निरंतर आवश्यकता असते त्यावर हलके हलके घाव बसल्यावांचून राहणार नाहींत.

अगदीं क्षुल्लक वाटणाऱ्या गोष्टींतहि स्वाभिमानाचा भाग कसा असूं शकतो हें दर्शविण्यासाठीं मी मुद्दामच अगदीं क्षुल्लक अशा गोष्टीचें उदाहरण घेतलें. लहानसहान गोष्टींची जर अशी स्थिति, तर मोठ्या महत्वाच्या गोष्टींत पतिपत्नींनीं एक-मेकाचा स्वाभिमान कसा जपला पाहिजे हें निराळें वर्णन करून सांगण्याचें कारणच नाहीं. विवाहानंतर स्त्रीपुरुषांचें संयुक्त क्रियमाण सुरू होतें याबद्दल वादच नाहीं; व हें संयुक्त क्रियमाणाचें तत्व पतिपत्नींनीं सदैव आचरिलें पाहिजे हेंहि मी मागील प्रकरणांत कटाक्षानें सांगितलें, परंतु वैवा-हिक संयुक्त जीवनांत स्वतःच्या व्यक्तित्वाचें विसर्जन करण्याचा पतिपत्नींनीं कितीही मनःपूर्वक प्रयत्न केला— किंवा असेंहि ह्मणूं कीं, त्यांचें एकमेकांवर पराकाष्ठेचें प्रेम असल्यामुळें बुद्धिपुरःसर प्रयत्न करावा न लागतां, आपो-

आपच त्या दोघांनीं आपापल्या व्यक्तित्वाचें कितीहि विसर्जन केलें— तरी स्वतंत्र व्यक्तित्वाचा कमीअधिक कांहीं तरी भाग प्रत्येकाच्या ठिकाणीं उरणारच.

तसा तो उरावा हे मानसशास्त्राच्या नियमांस अनुसरूनच आहे; इतकेंच नव्हे, तें इष्टहि आहे. ज्या दोन व्यक्तींस स्वतंत्र अस्तित्व नाहीं त्यांच्या मीलनांतही कांहीं अर्थ नाहीं. दोन संख्या एकत्र झाल्याचा उपयोग केव्हां? त्यांपैकीं प्रत्येक संख्या लायकीची असेल तेव्हां. दोन शून्यांची मिळवणी केली तर त्या मिळवणीला काय मोल? याच न्यायानें स्त्रीपुरुषांच्या संमीलनाचें मोल त्यांपैकीं प्रत्येकाचें स्वतंत्र व्यक्तित्व जितकें तेजस्वी असेल तितकें अधिकच ठरेल. स्वार्थ साधण्याचें माणसाच्या आंगचें सामर्थ्य जितकें अधिक तितकी त्याच्या स्वार्थत्यागाची थोरवी अधिक हें सामान्य तत्व कांहीं प्रकरणांपूर्वी मी स्पष्ट केलेंच आहे. तेंच विवाहित आयुष्याला लागू केलें कीं असें सहज दिसेल कीं, विवाहित आयुष्यांत पतिपत्नींचें संमीलन तर झालें पाहिजेच; पण या संमीलनांतही प्रत्येकाचें स्वतंत्र व्यक्तित्व— प्रत्येकाच्या स्वाभिमानाचा अंश – कमीअधिक प्रमाणांत राहिला तर तें साहाजिक व इष्ट आहे. आणि पतीनें पत्नीची व पत्नीनें पतीची स्वाभिमानाची नाजूक जागा कोणती तें चातुर्यानें ओळखून ठेवून त्या जागेला वावगा स्पर्श आपल्या हातून कधींही होणार नाहीं अशी खबरदारी घ्यावयास पाहिजे.

प्रीतीच्या अनेक चमत्कारांपैकीं हा एक आहे कीं आपण दुसऱ्यासाठीं सारें स्वत्व– सारा स्वाभिमान सोडावयास तयार

असलें पाहिजे, पण दुसऱ्या माणसानें आपल्यासाठीं असाच स्वाभिमान सर्वस्वीं सोडला पाहिजे अशी अपेक्षा आपण मनाशीं ठेवतां कामा नये, मग आग्रह तर बाजूलाच राहो. खऱ्या प्रीतीनें बहकलेल्या प्रियजनांपैकीं प्रत्येकाला — स्त्रीइतकेंच पुरुषालाही — वाटत असतें कीं, आपण भोक्ता नव्हे, तर उपभोग्य व्हावें. या वृत्तीची चढाओढ स्त्रीपुरुषांत लागली ह्मणजेच त्यांच्या प्रेमांत दिव्यत्वाचा भाग दिसूं लागतो, व तें प्रेम काव्याचा अलौकिक विषय होण्याच्या लायकीचें ठरतें. आपलें सारें स्वातंत्र्य गमावून पुरुषानें आपल्याशीं संसार करावा अशी पत्नीची अपेक्षा असतां कामा नये, आणि स्त्रीला स्वातंत्र्य नाहीं, तिच्या स्वतंत्र व्यक्तित्वाचा व हक्कांचा विचार करण्याची गरज नाहीं, तिनें केवळ वस्तूच्या छायेप्रमाणें आपल्याशीं रममाण व्हावें असले विचार पतीनेंही आपल्या मनांत ठेवून उपयोगी नाहीं.

ह्मणजेच असें कीं पतिपत्नींनीं एकमेकांचें बरोबरीचें नातें मान्य केलें पाहिजे. प्रत्येकानें दुसऱ्याच्या स्वाभिमानाविषयीं, स्वातंत्र्याविषयीं, हक्काविषयीं आदर ठेवला पाहिजे.

मात्र या समान हक्काच्या तत्वाचा विपर्यास होण्याचा संभव आहे, व पतिपत्नींनीं तो टाळला पाहिजे. संसार रम्य व्हावा एतदर्थ पुरुषाप्रमाणेंच स्त्रीलाही स्वातंत्र्य व हक्क पाहिजेत याबद्दल वादच नाहीं. पण आपापले समान हक्क ठरवितांना तरुण स्त्रीपुरुषांनीं एक महत्वाचा विचार ध्यानांत ठेवला पाहिजे,

समान स्वातंत्र्य व हक्क याचा अर्थ काय ?

या प्रश्नाची स्वतंत्र व सांगोपांग चर्चा करण्याचें हें स्थल नव्हे, पण आपल्या विषयापुरता आपल्याला त्याचा विचार केला पाहिजे.

स्त्रीपुरुषांचे समान हक्क ह्मणजे काय? समान हक्क ह्मणजे पुरुष जें जें करतील तें करण्याची, जेथें जातील तेथें जाण्याची, जे खेळ खेळतील ते खेळण्याची, पुरुषांप्रमाणें खाण्यापिण्याची, हिंडण्याची, पैसे खर्चण्याची, उद्योगधंदे करण्याची स्त्रियांस मुभा असावी असें ह्मणतां येईल काय?

'होय' असें उत्तर स्त्रियांच्या वतीनें दिलें गेलेलें आपण पुष्कळ ऐकतों. परंतु हें उत्तर जर केवळ बेजबाबदारीनें दिलें गेले नसलें तर त्याचें मर्म इतकेंच मानतां येईल, कीं अनेक वर्षांच्या दास्यत्वांतून मुक्त होऊं पाहणाऱ्या स्त्रियांना व त्यांच्या कैवाऱ्यांना पुरुष जातीच्या जुलमाची चीड आल्यामुळें आपला संताप व्यक्त करण्यासाठीं ह्यांना असलें उत्तर द्यावेसें वाटतें. "जें जें पुरुष करीत असतील तें तें आह्मी करणार" या हट्टवादाचा खरा अर्थ येवढाच समजणें बरें कीं केवळ स्त्रीत्वामुळें स्त्रीला विधिनिषेध पाळण्याची समाजाची सक्ति नसावी. वक्तृत्व, लेखन, शास्त्रीय संशोधन, राजकारण, मृगया, क्रीडा, युद्ध— अशा सर्व क्षेत्रांत वाटल्यास प्रवेश करण्याचा स्त्रीला हक्क असावा. सामाजिक जीवनाच्या कोठल्याही दालनावर 'येथें प्रवेश करण्याची स्त्रियांस सक्त मनाई आहे' अशी पाटी असतां कामा नये.

अशा तात्विक समान स्वातंत्र्याबद्दल स्त्रियांनीं आग्रह धरला तर त्यांत कांहींच वावगें नाहीं. मात्र तत्त्वापुरतें समाजानें हें

स्वातंत्र्य मान्य केल्यानंतर स्त्रियांनीं — व पुरुषांनींही — पुढील गोष्टीचा विचार केला पाहिजे.

स्त्री व पुरुष हीं स्वतंत्र प्रकृतीचीं दोन भिन्न प्रतिरूपें (types) आहेत, व प्रत्येकानें आपली विशिष्ट प्रतिकृति ध्यानांत घेऊनच आपल्या हक्कांचा व स्वातंत्र्याचा उपभोग घ्यावयास पाहिजे.

साऱ्या सेंद्रिय सृष्टींत पुरुषतत्त्व आणि स्त्रीतत्त्व यांत जो गुणभेद आहे तो मानवी स्त्रीपुरुषांत अतिशय उत्कट दिसून यावा हें साहजिकच होय. वनस्पति कोटींत गर्भकेसर जागच्या-जागीं स्थिर असतात व पुंकेसर आपल्या स्थानावरून उठून जाऊन त्यांशीं संयुक्त होऊन त्यांस सुफलित करतात. म्हणजे स्त्रीतत्त्वाची वृत्ति स्थिर असून पुरुषतत्त्वाच्या वृत्तींत चांचल्य व गतिप्रियता दिसून येते. दोन तत्त्वांतील हा स्थूलभेद गुणविकार-वादाच्या नियमाप्रमाणें प्रत्येक वरच्या कोटींत अधिकाधिक संकीर्ण होत जाऊन मानवजातींत तो भेद नाना प्रकारें प्रत्ययाला येतो, व स्त्री व पुरुष यांच्या प्रकृतींतील भिन्नता पुढें दिल्याप्रमाणें वर्णावी लागते.

जीवितबीजाचें धारण व संगोपन करणें हें स्त्रीचें मुख्य निसर्ग-सिद्ध कार्य होय. या कार्यास अनुकूल असेच स्वभावगुण तिच्या ठिकाणीं साहजिकपणेंच दिसून येतात. परंपरेविषयीं आदर, नव्याविषयीं साशंकपणा, लोकांकडून प्रियाराधन करून घेण्याची आसक्ति, दुसऱ्याच्या सद्गुणांस उत्तेजन देण्यासारखी बोलण्याचालण्याची व हावभाव करण्याची रीति, मृदुता, सौजन्य, मित्रपणा, स्वार्थत्याग, कष्टाळूपणा, अशा विविध स्वभावविशे-षांनीं स्त्री अलंकृत झालेली आहे. जीवितबीजाचें धारण व संगो-

पन करणें हें जें तिचें विशिष्ट कार्य त्यास अनुसरूनच तिची शारीररचनाच नव्हे तर मनोरचनाही बनलेली आहे. स्त्रीच्या ठिकाणीं दोन वेगवेगळ्या वृत्तींचें विलक्षण मनोहर मिश्रण झालेलें आहे. ती माताही असते, आणि कान्ताही असते. मातेच्या नात्यानें ती केवळ स्वत:च्या पोटच्या अपत्यांचेंच नव्हे तर एकंदर समाजाचें व राष्ट्राचें संगोपन करावयास उत्सुक आणि समर्थ असली पाहिजे; आणि कान्तेच्या नात्यानें आपल्या पतीस तिनें पराक्रमास उद्युक्त केलें पाहिजे, इतकेंच नव्हे तर ज्या ज्या पुरुषांशीं तिचा आप्तसंबंध असेल किंवा स्नेह जडेल त्यांना ती स्फूर्तिनिधानासारखी वाटली पाहिजे. आपल्या आकर्षक शक्तीमुळें नुसत्या पुरुषाच्या बीजासच नव्हे तर एकंदर मानवी समाजांतील साऱ्या सुप्त गुणशक्तींस चेतना देऊन मानवी जीवित सुफलित व संपन्न करावें अशी प्रत्येक स्त्रीच्या ठिकाणीं निसर्गानें उत्कंठा ठेवली आहे.

पुरुषांचें निसर्गसिद्ध कार्य अगदीं भिन्न आहे. त्याच्या अंगीं सृजनशक्ति आहे, परंतु सृजनानंतर धारण व संगोपन हीं जीं कष्टाचीं कार्यें अवश्यक आहेत तीं तो कधीं करीत नाहीं. तीं स्त्रीवर सोंपवून मोकळा होतो. आईच्या व बापाच्या अपत्यविषयक प्रेमांत फरक दिसतो तो यामुळेंच. जागेवर राहण्याऐवजीं भ्रमण करण्याची त्याची वृत्ति आहे; आणि परंपरेपेक्षां नाविन्याची आवड, धाडस, कठोरपणा, इत्यादि स्वभावविशेष त्याच्या नियत कार्याला आवश्यक असल्यामुळें त्याच्या ठिकाणीं दिसून येतात.

असो. हें विवेचन मनोरंजक असलें तरी अधिक लांबविण्याचें हें स्थल नव्हे. या विवेचनावरून मला सिद्धांत काढावयाचा तो

इतकाच कीं पतिपत्नींनीं या निसर्गसिद्ध स्वभावविशेषांचें अतिक्रमण करून आपापले समान हक्क गाजविण्याचा प्रयत्न केल्यास तो त्यांना व एकंदर समाजालाहि सुखावह होणार नाहीं. पतिपत्नींनीं एकमेकाचा स्वाभिमान आणि एकमेकाचें स्वातंत्र्य मान्य केलें पाहिजे हें तर खरेंच; पण निसर्गाच्या योजनेप्रमाणें जें कार्य आपल्या वांट्यास आलेलें आहे त्याविषयींची आपल्या अंगची क्षमता ज्यायोगें वाढेल अशा रीतीनेंच स्वातंत्र्याचा व समान हक्कांचा उपभोग घ्यावयाची सूज्ञता व दक्षता दोघांनींही ठेवली पाहिजे. ही ठेवली ह्मणजे त्यांचा स्वतःचा संसार रमणीय होईल, एवढेंच नव्हे तर सामाजिक व राष्ट्रीय कल्याणही त्यायोगें अंशतः साधल्यावांचून राहणार नाहीं.

## प्रकरण ११ वें

# समाजसेवेंतील रहस्य.

---

तरुण स्त्रीपुरुषांनीं आपापले संसार सौख्यपूर्ण आणि रमणीय करण्याची दृष्टि सतत ठेवली कीं बऱ्याच अंशानें एकंदर समाजाचें कल्याण आपोआपच साध्य होईल अशी समजूत मनाशीं ठेवूनच गेल्या प्रकरणाच्या अखेरपर्यंतचें विवेचन मीं केलें. सामाजिक किंवा राष्ट्रीय कल्याण साधण्याच्या भरांत विनाकारण कौटुंबिक सुखाची आबाळ करणें इष्ट नाहीं; आणि वास्तविक पाहतां सामाजिक कल्याणाचें कर्तव्य दूरचें आणि स्वतःच्या कुटुंबाचें कल्याण अधिक जवळचें कर्तव्य असल्यामुळें त्या कर्तव्याची उगीचच्या उगीच हेळसांड करणें हा एक प्रकारचा गुन्हा होय हें मागें एका प्रकरणांत मीं विशद करून दाखविलें आहे.

अर्थात् सामाजिक व राष्ट्रीय उन्नतीची फिकीर न करतां तरुण स्त्रीपुरुषांनीं आपापल्या संसारांत रममाण असावें असा माझ्या ह्मणण्याचा कोणी अर्थ केला तर तो विपर्यास होय. राष्ट्राच्या उद्धारासाठीं राष्ट्रांतील तरुण स्त्रीपुरुषांनींच नव्हे तर ह्मातान्या कोतान्यानीं आणि मुलांबाळांनी देखील सुखाची किंवा प्राणांची पर्वा न करतां खुशाल होमकुंडांत उडी घ्यावी अशा आणीबाणीच्या वेळां राष्ट्राच्या चरित्रांत मधून मधून येतात हें मला मान्य कां नाहीं ? अशा निकराच्या प्रसंगीं साऱ्यांचे संसार उध्वस्त झाले तरच पुढील पिढ्यांचे संसार सौख्याचे व आनंदाचे होतील हा हिशोबच खरा मानावा लागतो यांत काय संशय ?

परंतु एक तर, असल्या नैमित्तिक प्रसंगाबद्दल विचार करण्याचा प्रस्तुत लेखमालेचा उद्देशच नाहीं. नित्याच्या सामान्य परिस्थितींत तरुण स्त्रीपुरुषांनीं कोणते प्रश्न अगत्याचे मानले पाहिजेत, व त्या प्रश्नांविषयीं त्यांनीं कोणत्या दिशेनें विचार करावयास पाहिजे हेंच मला मुख्यत: सांगावयाचें आहे.

आणि शिवाय व्यक्तींनीं आपापल्या संसारांची उपेक्षा केल्याखेरिज राष्ट्रीय अभ्युदय साधत नाहीं हें नैमित्तिक प्रसंगांच्या वेळचें तत्व कायमचें खरें धरून चालण्याचा जो मोह पुष्कळांना झालेला दिसतो तो भ्रामक होय. कौटुंबिक सुखाचा बळी दिल्याखेरीज उद्धारदेवता राष्ट्रावर प्रसन्न होणार नाहीं असे प्रसंग केव्हां केव्हां उद्भवतात हें खरें. परंतु याचा अर्थ असा नव्हे कीं राष्ट्राच्या सामान्य, नेहमींच्या परिस्थितींतही राष्ट्रीय कल्याणासाठीं कौटुंबिक आनंदाचा व सुखोपभोगांचा बळीच पडला पाहिजे. राष्ट्रीय अभ्युदय आणि राष्ट्राच्या घटकांचें संसारसौख्य यांत तत्वत: विरोध आहे असें थोडेंच आहे ? व एक साधण्यासाठीं दुसऱ्याचा विनाश झालाच पाहिजे अशांतला भाग थोडाच आहे ?

परंतु समाजाचा संसार व व्यक्तीचा संसार यांत मूलभूत विरोध आहे अशा गैरसमजानें कित्येकदां तरुण स्त्रीपुरुषांस उपदेश केलेला ऐकूं येतो, व हा गैरसमज दूर करण्यासाठीं व्यक्तीच्या संसारांतील रमणीयतेचें व समाधानाचें महत्व केवढें मोठें आहे तें विशद करण्याचाच माझ्या आतांपर्यंतच्या लिहिण्यांत मी विशेष कटाक्ष ठेवला. कौटुंबिक सौख्याचेंच येथपर्यंत सारखें विवेचन झालेलें पाहून त्या सौख्यापुढें सामा-

जिक किंवा राष्ट्रीय सेवेची मातब्बरी नाहीं असा माझ्या लिहिण्याचा अविर्भाव आहे असें कोणाला वाटण्याचें कारण नाहीं. समाजावर किंवा राष्ट्रावर कांहीं असामान्य आपत्ति आली असतां सर्व व्यक्तींनीं आपापल्या गृहसौख्यावर पाणी सोडून राष्ट्रीय सौख्य कायम राखण्यास तत्पर असलेंच पाहिजे. तथापि नैमित्तिक कर्तव्यापेक्षां नित्याच्या कर्तव्याबद्दलच आपणांस विचार करावयाचा आहे हें विसरतां कामा नये; व हा विचार करतांना संसाराची होळी करण्याच्या उपदेशापेक्षां संसारांत बहुविध आनंद निर्माण करण्याचीच महति तरुण स्त्रीपुरुषांच्या अंतःकरणावर बिंबविली पाहिजे हें कोणीही कबूल करील.

कारण, कांहीं एका मर्यादेपर्यंत कौटुंबिक सौख्य हें सामाजिक सौख्यापासून भिन्न नसतें. प्रत्येक कुटुंब सुखी व आनंदी झालें कीं तितक्या अंशानें एकंदर समाज सुखी झाला असें मानण्यास हरकत नाहीं. गांधी टिळकांच्या योग्यतेचा एखादा लोकनायक एखाद्या शहरीं पाहुणा ह्मणून यावयाचा असला कीं प्रत्येक घरवाल्यानें व दुकानदारानें हौसेची शिकस्त करून आपली जागा शृंगारली कीं स्वागताची तयारी बहुतांशीं झाल्यासारखीच असते. त्याच न्यायानें समाजाच्या किंवा राष्ट्राच्या कल्याणाचा विचार कांहीं एका मर्यादेपर्यंत करतां येईल.

स्वतःचा असा संसारपाश यत्किंचितही न ठेवतां केवळ सार्वजनिक कार्यास स्वतःला वाहून घेणाऱ्या दहा पांच व्यक्ति समाजांत नेहमींच असाव्या लागतात. अशा व्यक्तींच्या पुण्याईनेंच समाजाची तेजस्विता नेहमीं वाढत असते. परंतु देशासाठीं स्वत्वाचा सर्वस्वीं संन्यास घेणाऱ्या अशा महात्म्यांचें व्रत

फार खडतर आहे. अंगीं अनेक प्रकारची तयारी असल्या-खेरीज हें व्रत आचरण्यांत अर्थ नाहीं. परमार्थांत जसा अकालीं संन्यास अहितकारक ठरतो तसाच देशकार्याच्या बाबतींतही अंगीं सामर्थ्य नसतां संन्यासवस्त्रें परिधान केलीं तर तीं क्लेश-कारकच होतात व त्या संन्यासापासून समाजाचें किंवा व्यक्तीचें कोणाचेंच कल्याण साध्य होत नाहीं.

देशासाठीं फकिरी पत्करण्यास लागणारा मनाचा खंबीर-पणा आपल्या अंगीं आहे असा ज्या तरुण स्त्रीपुरुषांस जबर आत्मविश्वास वाटत असेल त्यांनीं अवश्य ती फकिरी पत्क-रावी. अशा तरुणांच्या फकिरी वस्त्रांनींच स्वतंत्र सिंहासना-वरची मखमली वस्त्रें तयार व्हावयाचीं असतात. स्वाभिमा-नाची आणि स्फूर्तीची ज्योत अखंड जागती ठेवण्याचें दिव्य कार्य अशा तरुणांच्या हातूनच होत असतें. अशा तरुणांचीं स्तुतिस्तोत्रें पुरेशा आवेशानें गावयाइतकेंही सामर्थ्य माझ्या लेखणींत नाहीं.

मात्र अशा खडतर फकिरीवांचून देशसेवेचें किंवा सामा-जिक कार्याचें दुसरें साधन नाहीं असें मानण्याचें कारण नाहीं. स्वतःचा संसार सर्वस्वीं टाकल्याखेरीज व्यक्तीच्या हातून राष्ट्रसेवा घडणार नाहीं हा समज व्यर्थ होय. सर्वस्वी संन्यासी बनून राष्ट्रकार्याची ध्वजा उंच फडकत ठेवणारे महात्मे राष्ट्रीय सैन्याचे सेनापति ठरतील. पण सेनापतीखेरीज युद्धांत भाग घ्यायला दुसरी जागाच नाहीं असें थोडेंच आहे! अगदीं सामान्याहून सामान्य अशा व्यक्तीलाही स्वतःच्या

संसाराची उपेक्षा न करतां समाजाची व राष्ट्राची सेवा करणें शक्य आहे; आणि या सेवेचें मोलही कमीं मानण्याचें कारण नाहीं.

संसारांत बहुविध आनंद निर्माण करण्याचा प्रयत्न तरुण स्त्रीपुरुषांनीं केला पाहिजे हें जसें मी परोपरीनें स्पष्ट केलें, तसेंच आतां हें सांगितलें पाहिजे कीं, स्वतःचा संसार सजवितांना सहजासहजीं एकंदर समाजाच्या कल्याणांत भर पडावी असा हेतू तरुण स्त्रीपुरुषांस मनाशीं बाळगतां येईल, व त्या हेतूमुळें समाजाचा फायदा झाल्यावांचून राहणार नाहीं.

या हेतूनें वागण्याचा उत्तम मार्ग हा कीं तरुण स्त्रीपुरुषांनीं आपल्या कुटुंबपोषणाचें साधनच अशा प्रकारें ठरवावयाचें कीं त्यायोगें सहजासहजीं समाजाचें कोणत्या ना कोणत्या तरी रीतीनें हित होईल. स्वतःच्या संसाराची राख अंगाला फांसून बाहेर पडल्याविना समाजाची सेवा माणसाच्या हातून होणार नाहीं, अशी निराशा मनाशीं बाळगण्याचें कारण नाहीं. शिणलेल्या वाटसरूच्या नेत्रांना सुखविण्यासाठीं उंच तालवृक्षच झालें पाहिजे असें नाहीं, वाऱ्याच्या लहरीबरोबर हेलकावणाऱ्या हिरव्यागार गवताच्या काडींतही तें सामर्थ्य आहे; तद्वतच समाजाचें कल्याण साधावयासाठीं आपल्या कौटुंबिक जीवनाचा त्याग केलाच पाहिजे असेंही नाहीं, किंवा त्या जीवनाचा बाह्यात्कारी बडेजाव अमुक इतका पाहिजे असेंही नाहीं, अगदीं सामान्य प्रतीच्या स्त्रीपुरुषांसही आपल्या संसारसुखांतूनच तें कल्याण निर्माण करतां येईल.

हें पटण्यासाठीं समाजसेवेविषयींच्या आपल्या कांहीं रूढ खोट्या कल्पना मात्र आपण टाकल्या पाहिजेत. सामाजिक

कल्याणासाठीं झटणाऱ्या माणसाला स्वतःचें स्वतंत्र अस्तित्वच असतां कामा नये अशी एक वेडी समजूत आपल्यांत शिरली आहे. स्वार्थत्यागाच्या तत्वाचा असा कांहीं विलक्षण विपर्यास आपण मनाशीं करून ठेवला आहे कीं समाजसेवेच्या व्रतांत पडलेल्या व्यक्तीला, सुखोपभोग तर दूरच पण, शिणल्या-नंतर आळोखे पिळोखे देऊन जांभई द्यावयाचीदेखील सवड नसावी असें आपण समजतों. साधुत्वाच्या कसोटीनेंच देशभक्तांना आणि समाजसेवकांना पारखण्याची खोडी आपल्याला लाग-लेली आहे; व त्यामुळें महात्मा गांधींनीं सेकंड क्लासनें प्रवास करतांच कुटाळकीची कुजबुज करण्याचा बेशरमपणा आपल्या हातून घडतो. एकदां हातभर पंचा नेसलेल्या महात्माजींची प्रचंड मिरवणूक निघाली असतां एका इंग्लिशमननें आपल्या स्नेह्याच्या कानांत ह्मटलें– "India knows how to re-spect greatness in rags" ( वेष बावळा असला तरी महात्मा ओळखण्याचें शहाणपण हिंदुस्थानच्या लोकांत आहे ) अशी गोष्ट सांगतात. परक्यांनीं केलेली तारीफ या दृष्टीनें या गोष्टीचें मोल मानायला हरकत नाहीं. परंतु वस्तुस्थिति वर्णा-वयाची झाली तर "माणूस लंगोटी नेसला तरच त्याला महात्मा ह्मणण्याची हिंदुस्थानच्या लोकांना खोड आहे" असेंच ह्मणावें लागेल.

टिळामाळांच्या खुणावरून साधुत्व ओळखायचें नसतें असा प्रत्यक्ष साधुसंतांनींच आह्मांला उच्चस्वरानें उपदेश केला असला तरी अजून त्याबद्दलचा आग्रह आमच्या मनांतून जात नाहीं. जितका गबाळग्रंथी, जितका दुःखीकष्टी, जितका अधिक आंबट

चेहऱ्याचा समाजसेवक आपल्या दृष्टीस पडेल तितकी आपण त्याच्यावर अधिक श्रद्धा ठेवायला तयार असतों. याचा दुहेरी अनिष्ट परिणाम होतो. जे अंतःकरणपूर्वक समाजसेवा करीत असतात, पण ज्यांना सुखसोयींवाचून कष्ट करतां येत नाहींत त्यांचें कौतुक आपल्या हातून व्हावें तसें न होऊन त्यांची समाजकार्याविषयींची तत्परता मंदावत जाते; आणि शिवाय, भोंदू लोकांना टिळामाळांचें सोंग आणणें सोपें जाऊन अशा ढोंग्यांचा भरणा लोकनायकांमध्यें वाढत जातो.

समाजसेवकाबद्दल जशा आपल्या विपरीत कल्पना तशाच समाजसेवेबद्दल. समाजसेवा करायची ह्मणजे आधीं घरदार सोडलें पाहिजे. असा उगीचच्या उगीचच आपण आपल्या मनाचा ग्रह करून ठेवला आहे; व त्यामुळें पराकाष्ठेची असल्याखेरीज दुसऱ्याची समाजसेवा आपल्या दृष्टीला दिसत नाहीं, व आपल्या सामान्य भूमिकेवरूनही आपल्याला यथाशक्ति सामाजिक कार्य करतां येईल हाही विश्वास आपल्या अंतःकरणांत उरत नाहीं.

परंतु खरें पाहतां असे किती तरी व्यवसाय तरुण स्त्रीपुरुषांस मोकळे आहेत, कीं ज्यांत गृहसौख्य आणि समाजसेवा हीं दोन्हीही नीट साधतील. ज्यायोगें आपल्या समाजाच्या आचारविचारांना उत्तम वळण लागेल, ज्यायोगें आपल्या समाजाचें शारीरिक आरोग्य आणि बौद्धिक सामर्थ्य वाढेल, किंवा ज्यायोगें आपल्या समाजाची इभ्रत व प्रतिष्ठा वाढेल अशी कोणतीही गोष्ट जितक्या प्रमाणांत त्या एखाद्या व्यक्तीच्या हातून होईल तितक्या प्रमाणांत त्या व्यक्तीनें समाजसेवा केली असेंच मानलें पाहिजे. समाजसेवेसाठीं जे हातीं भिक्षापात्र घेतात ते मोठे यांत

सशयच नाहीं. परंतु ज्यांच्यामुळें समाजाची जगांतली प्रतिष्ठा वाढते तीं माणसें आपापल्या संसारांत मग्न दिसलीं तरी तीं एक प्रकारें समाजसेवाच करीत आहेतसें मानलें पाहिजे.

समजा, महाराष्ट्रांत एक गृहस्थ असा निपजला कीं ज्याच्या चित्रकलेनें महाराष्ट्राला किंवा हिंदुस्थानालाच नव्हे तर युरप-अमेरिकेंतील तज्ञांनाही मोहून टाकलें. असा अलौकिक चित्रकार निर्माण झाला तर त्यानें आपल्या संसारावर किती पाणी सोडलें या प्रश्नाच्या मापानें कां त्याची समाजसेवा मोजीत बसावयाचें ? समाजसेवेच्या शुद्ध हेतूनें त्याच्या हातून एकही कृत्य झालेलें दाखवितां येण्यासारखें नसेल. परंतु स्वतःच्या आनंदासाठीं आणि कलाकृतीच्या उन्मादासाठीं त्यानें ओढलेल्या एकेका रेषेंत समाजाची केवढी तरी सेवा सहज घडत असते हें विसरून चालायचें नाहीं.

जी गोष्ट चित्रकलेच्या व्यवसायाची तीच इतर व्यवसायांची. उत्तम वक्तृत्व संपादन करणें ही समाजसेवाच म्हटली पाहिजे. विवेकानंदांनीं आर्यसंस्कृतीचें खरें उज्वल स्वरूप पाश्चात्त्यांच्या मनावर ठसविलें ही कामगिरी तर फार मोठीच. परंतु ती सोडली तरी केवळ त्यांचें वक्तृत्व हीच एक श्रेष्ठ कामगिरी होती. कारण त्यांचें अलौकिक वक्तृत्व ऐकतांच असा वक्ता ज्या देशांत आहे तो भाग्यवानच असला पाहिजे असे उद्गार श्रोत्यांच्या तोंडून हमखास निघत. गणपतरावासारख्या नटानें समाजसेवेचा कधीं क्षणभरही विचार केला नसला तरी त्याच्या हातून केवढी तरी समाजसेवा घडली असेंच मानलें पाहिजे. रमणसारख्या शास्त्र-शोधकानें “ मला देशाच्या राजकारणांत कांहीं कळत नाहीं,

मी आपला शास्त्राचा अभ्यासक आहे " असें बोलून दाखविलें तरी त्याचे शास्त्रीय शोध म्हणजेच केवढें तरी राजकारण होय. कारण त्याच्या शोधांचें जें कौतुक होतें त्यामुळें राष्ट्राची सन्मानध्वजा किती तरी उंच चढते. सारांश, कला, शास्त्र, वाङ्मय, वैद्यकी, एंजिनिआरिंग असे किती तरी धंदे आहेत कीं ज्यांत शिकून तरुण स्त्रीपुरुषांना गृहसौख्य प्राप्त करून घेतां घेतां सहजासहजी समाजसेवा करतां येईल.

ज्या कोणत्याही लहानमोठ्या कृतीनें समाजाची मनोवृत्ति तेजस्वी होते, समाजांत आत्मविश्वास वाढतो, आणि समाजाच्या जगांतल्या कीर्तीला उजळा येतो त्या कृतीची समाजसेवेंतच गणना झाली पाहिजे. हा सिद्धान्त आमच्या तरुण स्त्रीपुरुषांनीं ध्यानांत घ्यावा, म्हणजे गृहसौख्य साधतां साधतां समाजसेवाही प्रत्येकाला करतां येण्यासारखी आहे याविषयीं त्यांस शंका राहणार नाहीं, आणि प्रत्येक स्त्रीपुरुषाला समाजसेवेचे अनेक मार्ग मोकळे असतात हेंही त्यांस स्पष्ट दिसेल.

वास्तविक एकंदर देशाच्या हितासाठीं जें जें कार्य होतें त्याचा समाजसेवेंतच अंतर्भाव केला पाहिजे. राजकारणाच्या चळवळी, आर्थिक प्रश्नासंबंधींच्या चळवळी, शास्त्रीय शोधांतील उलाढाली— हे सगळे खरें पाहतां सामाजिक कार्याचेच प्रकार होत. कारण त्या सर्वांच्या मुळाशीं एकंदर समाजाच्या हिताचाच हेतू असतो. परंतु कां कोण जाणे 'सामाजिक कार्य' या शब्दाला संकुचित अर्थ प्राप्त झाला आहे. विधवाविवाह, अनाथबालसंगोपन, जातिभेदनिर्मूलन असल्या चळवळींसच सामाजिक कार्य ह्मणण्याचा प्रघात पडला आहे. आपल्या मराठी भाषेंतच हा विचित्र

संप्रदाय पडला आहे असें नव्हे, तर इंग्रजींत देखील " Social Work " या शद्बाची व्याप्ति मर्यादितच मानली जाते.

शद्बप्रयोगांतील या चुकीच्या संकोचाचे अनिष्ट परिणाम झाल्यावांचून रहात नाहींत. सामाजिक कार्यांत राजकारणाचा, व्यापाराचा, शास्त्रसंशोधनाचा अंतर्भाव होत नाहीं अशी भलतीच समजूत करून घेतल्यामुळें राजकारण व सामाजिक चळवळ यांत भेदच नव्हे तर विरोध आहे, असा आमच्या लोकांच्या मनांत भ्रम उत्पन्न झाला आहे. आधीं राजकीय सुधारणा कीं आधीं सामाजिक सुधारणा या प्रश्नावर टिळक आगरकरांत केवढालीं रणें माजलीं होतीं त्याची कल्पना आजच्या तरुणांना केसरीच्या जुन्या फाइली वाचतांच होईल; आणि हा वाद अजूनही अनेक वेळां निघालेला त्यांना पहावयास सांपडत असेलच.

परंतु खरें पाहतां हा वाद व्यर्थ होय. आधीं राजकारण कीं आधीं समाजसेवा असा प्रश्न करणें वेडेपणाचें आहे. आधीं भात कीं आधीं भोजन असें विचारणें जितकें चमत्कारिक तितकेंच तें आपल्याला चमत्कारिक वाटलें पाहिजे. ज्या ज्या मार्गानें आपल्या समाजाची व राष्ट्राची किंचिदंशानें कां होईना उन्नति होते तो समाजसेवेचाच प्रकार समजला गेला पाहिजे; व आपापल्या अंगचें सामर्थ्य ओळखून तरुण स्त्रीपुरुषांनीं या अनेक मार्गांपैकीं कोणता तरी एक मार्ग धरला पाहिजे.

सामाजिक कार्याच्या सर्व प्रकारांत दोन सद्गुणांची अंमलबजावणी करण्याचा आपला आग्रह असतो; एक, व्यक्तीचें महात्म्य व दुसरा, व्यक्तीची लीनता. स्वातंत्र्य व सेवा हे दोन्हीही आपापल्या परीनें फार मोलाचे सद्गुण आहेत; परंतु या प्रत्ये-

काचा विपर्यास होण्याचा मानवी आयुष्यांत फार संभव असतो, व तसा विपर्यास होऊं नये अशी खबरदारी घेणें किंवा झाला असेल तर तो दुरुस्त करणें हेंच सर्व सामाजिककार्याचें सारभूत स्वरूप होय. स्वातंत्र्याची विकृति होऊन त्याला दडपशाहीचें व अरेरावीचें स्वरूप अनेक वेळां प्राप्त होतें तसेंच सेवेचा विपर्यास होत गेला कीं त्याला दीन दास्याची कळा प्राप्त होते. हे दोन्हींही प्रकार मानवी जीवितांतील माधुर्य नष्ट करतात. त्या माधुर्याचा झरा सतत शुद्ध व वाहतां ठेवणें हेंच साऱ्या सामाजिककार्याचें रहस्य होय.

आपण आपल्या राजकीय हक्कांसाठीं भांडत आहोंत याचा अर्थ हाच कीं इंग्लंडनें स्वतःच्या स्वतंत्रशक्तीला जें दडपशाहीचें स्वरूप दिलें आहे, व आपल्या देशबांधवांनीं लीनतेचा अतिरेक करून जें दैन्य पतकरलें आहे त्यामुळें एकंदर मानवी समाजाची अधोगति होत आहे ती आपल्याला पाहवत नाहीं. ती थांबविली पाहिजे असें आपल्याला उद्वेगानें वाटतें. आपल्या हिंदुसमाजांतील स्पृश्यास्पृश्य भेद नष्ट व्हावेत असा आपण प्रयत्न करतों त्याचा तरी अर्थ काय? हाच कीं, समाजांतील सर्व स्त्रीपुरुष एकाच निसर्गाचीं लेकरें आहेत व त्या सर्वांत जें मानवी तेज प्रगट झालेलें आहे त्याचा सारखाच बडेजाव मानला गेला पाहिजे या तत्त्वाची अवहेलना झालेली आपणांस अन्यायाची वाटते. विधवाविवाह, अनाथसंगोपन, अशा सर्व कार्यांची मीमांसा या न्यायानें करून सांगतां येईल.

माझा मुख्य मुद्दा येवढाच कीं मानवी श्रेष्ठत्व आणि मानवी क्षुद्रत्व या दोहोंची जाणीव सारख्या प्रमाणांत समाजांत, राष्ट्रांत—इतकेंच नव्हे जगांत जागती ठेवणें हा सर्व सामाजिक कार्याचा

मूल हेतू आहे. हें ओळखून ती जाणीव जागृत ठेवण्यासाठीं आपापल्या सामर्थ्यानुसार झटणें ह्मणजे समाजसेवा करणें होय, व ती राष्ट्रांतील सर्व तरुण स्त्रीपुरुषांनीं डोळसपणें केली पाहिजे.

'डोळसपणें' असें मी मुद्दाम ह्मणतों. कारण, अंध परंपरे-प्रमाणें समाजसेवा केली तर त्या सेवेपासून हितापेक्षां अहित झाल्यावांचून रहात नाहीं. मानवी श्रेष्ठत्वाची आणि मानवी क्षुद्र-त्वाची जाणीव समतोल प्रमाणांत अखिल समाजांत ताजी ठेवणें हें साऱ्या समाजसेवेचें सार होय असें मीं ह्मटलें. विचाराअंतीं वाचकांस दिसून येईल कीं 'धर्म' 'धर्म' ज्याला आपण ह्मणतों त्याचें नियोजित कार्य हेंच असलें पाहिजे. 'तुझ्यांत अनेक तेजस्वी शक्ति सुप्तावस्थेंत वसत आहेत त्यांस चालना देऊन तू स्वतःचा व इतरांचा उद्धार करूं शकशील!' असें धर्मानें माणसास सांगितलें पाहिजे; व त्याप्रमाणेंच 'विश्वांत खेळणाऱ्या अवाढव्य शक्तीच्या मापानें तुझी योग्यता तोलली तर तूं क्षुद्र धूलिकणायेवढाही नाहींस!' असाहि इशारा धर्माकडून माणसाला वेळोवेळीं मिळाला पाहिजे. 'उत्ति-ष्ठत जाग्रत' अशी स्फूर्तिदायक गर्जना धर्मानें पुनः पुन्हां केली पाहिजे; आणि 'विश्वसत्ता प्रचण्ड असून तूं त्या सत्तेच्या प्रवा-हावरचा क्षणमात्र विलास करणारा एक बुडबुडा आहेस' अशी इशारतही माणसाच्या कानांत धर्मानेंच प्रसंगोपात सांगितली पाहिजे.

खरा अविनाशी 'धर्म' हाच होय; व प्रत्येक समाजसेव-कानें या धर्माचेंच आचरण व प्रतिपादन केलें पाहिजे. तरुण स्त्रीपुरुषांच्या हातून खरी समाजसेवा घडावयाची असेल त्यांनीं या धर्मतत्त्वांत आपलीं अंतःकरणें बुचकळून काढलीं पाहिजेत. तरुण स्त्रीपुरुषांनीं श्रद्धावंत असावयास पाहिजे तें याच अर्थानें;

व अविचारानें अंधपरंपरा तरुणांनीं कवटाळूं नये असें जें मी म्हणतों तेंही याच संबंधांत.

श्रद्धेवांचून माणसाच्या हातून त्याग होत नाहीं, व त्यागावांचून व्यक्तीचा किंवा समाजाचा अभ्युदय साधत नाहीं यांत किमपि संशय नाहीं. परंतु तरुणांनीं सश्रद्ध असावें याचा अंधपरंपरेप्रमाणें असा अर्थ करण्यांत येतो कीं तरुणांनीं ईश्वराचें अस्तित्व मान्य करावें, व कर्ता करविता परमेश्वर असून आपण सारे केवळ निमित्तमात्र असून आपल्याकडे कसलेंच कर्तृत्व नाहीं असें तरुण स्त्रीपुरुषांनीं मानावें.

परंतु ही असली श्रद्धा तरुण स्त्रीपुरुषांच्या अंतःकरणांत रुजावी हें खरोखर इष्ट आहे काय? धर्म म्हणजे ईश्वराची अर्चा असें म्हणतां येईल काय? स्वतःच्या श्रेष्ठत्वाप्रमाणेंच स्वतःचें क्षुद्रत्व प्रत्येक मनुष्यानें ओळखावें हें खरें. परंतु याचा अर्थ ईश्वराची उपासना करावी व स्वतःकडे कांहीं कर्तृत्व न मानतां तरुणांनीं वागावें असा करावयाचा काय? श्रद्धा म्हणजे ईश्वरवाद काय?

मला स्वतःला वाटतें कीं ईश्वरवाद सर्वस्वी भ्रममूलक आहे, इतकेंच नव्हे तर या भलत्या श्रद्धेचें वारें आमच्या तरुण स्त्रीपुरुषांना लागतां कामा नये. आमचे तरुण स्त्रीपुरुष सामाजिक व राष्ट्रीय कार्य करण्यास समर्थ व्हावेत असें वाटत असेल तर ईश्वरभक्तीच्या आंधळ्या पंगुत्वाचा त्यांना संपर्कहि होऊं देतां कामा नये. माझीं हीं विधानें कदाचित् चमत्कारिक वाटतील. म्हणून त्यांची थोडीशी फोड माझ्या अल्प मतीप्रमाणें पुढच्या प्रकरणांत करणें अगत्याचें आहे.

———o———

## प्रकरण १२ वें

# नामर्दांचा 'दयाघन.'

तरुणांच्या अंगीं समाजसेवेसाठीं व देशकार्यासाठीं अवश्य तेवढी तेजस्विता रहावी अशी इच्छा असेल तर नेहमींच्या अंधपरंपरेनें मान्य झालेल्या ईश्वरवादाचा त्यांच्या अंतःकरणास स्पर्श होऊं देतां कामा नये, या माझ्या विधानाचा भलता विपर्यास कोणी करूं नये. तरुणांच्या मनांत श्रद्धा नसावी असें मी ह्मणत नाहीं. उलट, मागील प्रकरणांत एके ठिकाणीं ह्मटलें त्याचा पुनरुच्चार करतों कीं त्यागावांचून उद्धाराचे दरवाजे खुले होत नाहींत व श्रद्धेवांचून ही त्यागाची गुरुकिल्ली माणसाच्या हातीं येत नाहीं असें माझें ठाम मत आहे; व ह्मणून आमच्या तरुण स्त्रीपुरुषांच्या अंतःकरणांत श्रद्धेचा खंबीरपणा असला पाहिजे असें मी केव्हांहि कटाक्षानें सांगेन.

परंतु तरुणांनीं सश्रद्ध असावें असें ह्मणणें वेगळें आणि तरुणांनीं सामान्य, रूढ, आणि परंपरागत ईश्वरवाद मान्य करून आपली वागणूक ठेवावी असें ह्मणणें वेगळें. व्यक्तीच्या हातून समाजसेवा घडावी यासाठीं मानवी पराक्रम आणि मानवी लघुता या दोहोंच्या समतोल जाणीवेवर साऱ्या मनुष्यजातीचें कल्याण अवलंबून आहे हें त्या व्यक्तीनें ओळखलें पाहिजे व ती जाणीव स्वतःच्या ठायीं व आपल्या बांधवांच्या ठायीं ज्या ज्या प्रकारांनीं वाढेल त्या सर्व प्रकारांचा पुरस्कार केला पाहिजे. या जाणीवेलाच मी श्रद्धा ह्मणतों व 'धर्मा' चें अगत्यहि मी याच अर्थानें समजतों.

परंतु सामान्यपणें धर्मपरायणता जिला ह्मणतात ती वृत्ति फार वेगळी आहे, व ती तरुण स्त्रीपुरुषांच्या तेजस्वितेला विघातक आहे. ईश्वरवाद असें ज्या श्रद्धेला सामान्यपणें नांव देण्यांत येतें ती ज्या श्रद्धेचा मी वर उल्लेख केला तिच्याहून अगदीं निराळी आहे व त्या श्रद्धेचा पगडा तरुण स्त्रीपुरुषांच्या मनावर बसल्यास त्यांची मनोवृत्ति दुबळी होऊन देशसेवेस लागणारा प्रखरपणा त्यांच्या अंगीं उरणार नाहीं.

कारण रूढ अर्थानें ईश्वरवाद ह्मणजे काय समजलें जातें? कोणत्या समजुतींचा त्यांत अंतर्भाव होतो? ईश्वर ह्मणजे काय कल्पना असते? धर्मपरायणतेचा काय अर्थ केला जातो? ईश्वर व मानवी व्यक्ति यांचे परस्पर संबंध कसे असावेत असें प्रतिपादिलें जातें? मानवी व्यक्तीनें परमेश्वराबद्दल कोणत्या भावना ठेवाव्यात असा उपदेश केला जातो? ईश्वराच्या ठिकाणीं कोणकोणते गुण आहेत असें शिकविलें जातें? मानवी व्यक्तीच्या स्वतंत्र कर्तृत्वशक्तीला कितपत अवसर आहेसें समजलें जातें?

सकल विश्वाचा विधाता, नियंता, शास्ता व संहर्ता, जगांतील सर्व लहानमोठ्या घटनांचा कर्ता आणि सर्व व्यक्तींच्या नानाविध व्यापारांचा सूत्रचालक — अशा स्वरूपाच्याच ईश्वराची कल्पना सामान्यपणें मानलेली दिसते. बालपणापासून मुलांच्या मनावर हीच कल्पना बिंबविली जाते, तारुण्यांत विवेकशक्तीनें या कल्पनेचा डोलारा मधून मधून कोसळूं लागला तरी बालपणापासून त्याविषयीं आसक्ति उत्पन्न झालेली असल्यामुळें तो आपण पुनः पुनः उभा करीत असतों, आणि वार्धक्यांत तर शरीराबरोबरच विचारशक्तीलाहि शैथिल्य आल्यामुळें चालतांना

जशी काठी लागते तशी ईश्वरभक्तीची ही काठी आधारासाठीं हवी असें दुबळ्या मनाला सारखें वाटत असतें.

परमेश्वर दयेचा सागर आहे असें शिकविण्यांत येतें व या शिकवणीचे इतके आघात व्यक्तीच्या मनावर बाल्यावस्थेपासून झालेले असतात कीं परमेश्वराच्या त्या अखंड करुणेविषयीं शंका उत्पन्न करणारे कांहीं प्रसंग माणसाच्या अनुभवास आले तरी शंका घ्यावयास तो धजत नाहीं. तशी शंका घेणें हेंच भयंकर पाप आहे असें त्यांस गुरुजनांनीं व मातापितरांनीं पुनः पुनः सांगितलेलें असतें. माणसाची बुद्धि पंगू आहे, प्रमादशील आहे, कधीं कधीं ईश्वरनिष्ठेचा सन्मार्ग सोडण्याची तिची प्रवृत्ति झाली तर ती आपला घात करीत आहे हें ओळखून तिची ती स्वतंत्र प्रवृत्ति मारून टाकली पाहिजे असें मोठमोठ्या संतांकडून माणसानें ऐकलेलें असतें. त्यामुळें ईश्वराच्या दयाघनत्वाबद्दल जबरदस्त संशय उत्पन्न करण्यासारखे प्रसंग अनुभवास आल्यावर "खरोखरच परम दयाघन असा कोणी ईश्वर आहे काय ?" असा प्रश्न माणसाच्या मनांत उभा राहिला तरी त्याची धीटपणानें पुरी छाननी करावयास त्याचें मन कचरतें. मध्यरात्रींच्या वेळीं स्मशानभूमींत भूतपिशाच्चांचा वावर असतो असें अनेक वेळां ऐकल्यामुळें माणूस त्या वेळीं तेथें गेलाच तर मन शांत ठेवून सत्यान्वेषण करण्याऐवजीं पूर्वग्रहानेंच भेदरून जावा तशीच ईश्वरविषयक प्रश्नाचा स्वतंत्र बुद्धीनें विचार करूं पाहणाऱ्या माणसाची अवस्था बहुशः होते.

'आह्मी सांगतों त्यावर जो विश्वास ठेवील त्याचें कल्याण होईल व आमच्या सांगण्याबद्दल जो साशंक राहील त्याचें वाटोळें

होईल' हा हिप्नॉटिक मंत्र ईश्वरवाद्यांनीं पक्का पाठ करून ठेव-लेला आहे, व त्या मंत्राच्या जोरावर ते बहुतेक जग जिंकीत असतात. आपल्या कोत्या बुद्धीला हा विषय अगम्य आहे, व ईश्वराच्या अस्तित्वाविषयीं चिकित्सा करण्याचें पाप आपल्या बुद्धीकडून होऊं देण्यापेक्षां बुद्धीला आंधळ्या विश्वासाच्या पेटींत बंद करून टाकून सकलसूत्रचालक ईश्वरास अनन्य भावानें शरण जाण्यांतच आपलें हित आहे अशी आपल्या समाजांतल्या शेंकडा नव्याण्णव लोकांची समजूत झालेली असते. लहानपणा-पासून शिकविलेलीं स्तोत्रें, शाळेंत पाठ केलेल्या कविता, वडील-धाऱ्यांचे प्रसंगोपात ऐकलेले उद्गार, सामाजिक आचारविचार व रूढ कर्मठपणाच्या चाली, कथाकीर्तनें, पुराणें, प्रवचनें, व्याख्यानें पुस्तकें यांतील अंद्धश्रद्धेचे वक्तृत्वपूर्ण उपदेश, या सर्व संस्का-रांच्या योगानें शेंकडा नव्याण्णव स्त्रीपुरुषांनीं ईश्वरोपासनेचा मार्ग डोळे मिटून पत्करलेला असतो. हिप्नॉटिझमच्या आहारीं गेलेल्या माणसानें अंधाराला प्रकाश समजावें व नसलेल्या वस्तू मला दिसत आहेत असें सांगून त्या वस्तूंचीं भडाभड नांवेंसुद्धां सांगावीं तशी अवस्था बहुतेकांची झालेली असते. त्यामुळें नव्याण्णवांची समजूत भ्रामक ठरवून परमेश्वराविषयीं स्वतंत्र विचार करणारा एक इसम निघाला व त्यानें परंपरागत ईश्वर-वादाचें तर्कशून्यत्व दाखविण्यांत प्रारंभ केला तर बाकीचे नव्या-ण्णव त्याला म्हणतात "हं! तरुणपणाच्या जोरांत आहांत तों-पर्यंत चालेल तुमची ही नास्तिक बडबड! — म्हातारे झालांत कीं आपोआप लागाल हरि हरि करायला! — अशीं कितीक उदाहरणें आम्ही पाहिलीं आहेत!"

इतकेंच नव्हे तर एखाद्यानें नास्तिक बुद्धि स्वीकारून ईश्वरोपासना करण्याचें नाकारलें तर तोहि ईश्वरी प्रेरणेचा एक खेळ होय असा त्याच्यावर अर्थ बसविला जातो. अशा अर्थाला आधार हवा असला तर पुराणें चमत्कारांनीं खचून भरलेलीं आहेतच. नास्तिक, पापी, चांडाल, स्त्रीपुरुषांचा अखेर परमेश्वरी कृपेनें उद्धार झाल्याच्या नवलकथा पुराणांत पानागणिक सांपडण्यासारख्या आहेत; व या साऱ्या नवलकथांच्या तात्पर्याचें पालुपद हेंच कीं पापी मनुष्यही ईश्वराच्या प्रेरणेनेंच पापाचरण करीत असतो व त्याच्या पापकृत्यांचें माप पुरेपूर भरलें कीं शेवटीं ईश्वरच अनुग्रह करून त्याच्या बुद्धींत एकदम परिवर्तन घडवून आणतो व त्याला संतपदाची प्राप्ति करून देतो.

ईश्वरश्रद्धेच्या वादांत हाच तर सर्वांत मोठा अजब प्रकार आहे कीं जगांतील चांगल्यावाईट सर्वच गोष्टींचें कर्तृत्व ईश्वराकडे मानूनही ईश्वराच्या परम दयाळुत्वाला बाध येत नाहीं. जगांत अनंत प्रकारचें वैषम्य आढळतें. स्त्रीपुरुषांस नाना प्रकारच्या शारीरिक व मानसिक व्याधी सोसाव्या लागतात, मुग्ध, कोमल अर्भकांवर दुःखाचे प्रहार झालेले दिसतात; परंतु हे प्रकार चालू असले तरी " तूं सागर करुणेचा " असेंच ईश्वराचें स्तोत्र म्हटलें पाहिजे. उल्कापात, धरणीकंप, अग्निप्रलय, महापूर असे भयंकर अपघात जगांत सारखे घडत आहेत, सज्जनांचा छळ होत आहे, सुंदर अबलांवर बलात्कार होत आहेत, सात्त्विक राष्ट्रांस तामसी राज्यकर्ते पिळून काढीत आहेत — इतकेंच नव्हे तर ईश्वर ' सर्वसाक्षी ' असल्यामुळें त्याला ते सारे प्रकार स्पष्ट दिसत आहेत. परंतु तसें असूनही परमेश्वराच्या दयासागरत्वाची शंका घ्याव-

याची नाहीं. जे प्रकार स्वतःच्या डोळ्यासमोर घडविल्याबद्दल महंमद तखलगाला इतिहासकारांनीं पशु ठरविलें त्याच्या शतपट क्रूर प्रकार उघड्या डोळ्यांनीं पाहणाऱ्या व घडविणाऱ्या परमेश्वराला मात्र सकल करुणेचें निधान मानलें पाहिजे असें ईश्वरवाद्यांचें सांगणें ! वास्तविक नानाविध वैषम्य आणि छळ ज्या जगांत भरलेला आहे त्या जगाच्या कर्त्याला हे दोष दिसतात पण ते दूर करण्याची त्याच्या ठायीं बुद्धि व शक्ति नाहीं असे तरी समजणें प्राप्त आहे, किंवा त्याला ते दिसले तर ते निवारण्याचें सामर्थ्य त्याच्या अंगीं आहे पण ते त्याला दिसण्याइतकी सर्वसाक्षी त्याची दृष्टि नाहीं असें तरी कबूल करणें भाग आहे.

जगांत दुःख आणि वैगुण्य ज्या अर्थी धादांत दिसत आहेत त्या अर्थी ईश्वराच्या अंगीं सर्वसाक्षित्व तरी नसलें पाहिजे किंवा तो परमदयाघन तरी नसला पाहिजे. तो सर्वसाक्षी आहे असें समजावयाचें असेल तर तो दुष्ट आहे असें ह्मणा, सृष्टींतील बहुविध अन्याय आणि दुःख खुशाल उघड्या डोळ्यांनीं पहात राहण्याइतका तो निष्ठुर आणि लहरी आहे असें म्हणा; उलट, त्याला दयेचा सागर म्हणावयाचें असेल तर त्याची दृष्टि साऱ्या दुःखापर्यंत व वैगुण्यापर्यंत पोंचण्याइतकी पल्लेदार नाहीं, तो मर्यादित दृष्टीचा आहे असें मान्य करा.

परंतु हा शहकाटशहहि ईश्वरवादी लागूं करून घेत नाहींत. बुद्धीच्या चौरस पटावर ते धडपणें खेळतील तर शपथ ! बुद्धीचें घाटोळें करून वाद मांडल्यावर मग उत्तर प्रत्युत्तराचीं मोहोरीं हालवायचीं तरी कशीं ? वर जी अडचण दर्शविली त्याच्यावर मुळीं ईश्वरवाद्यांचें म्हणणें असें कीं सृष्टींत जीं वैगुण्यें व दुःखें

आम्हांला दिसतात तीं वास्तविक वैगुण्यें व दुःखेंच नव्हेत. आमच्या कोत्या बुद्धीला तीं तशीं दिसतात. आमची बुद्धि परमेश्वराच्या उपासनेनें व सद्गुरूच्या प्रसादानें निर्मळ व प्रगल्भ झाली म्हणजे ज्या प्रकारास आम्ही आज परमेश्वराच्या अन्यायाचें व निष्ठुरपणाचे दाखले म्हणून मानतों तेच न्यायाचे व दयेचे दाखले असल्याचें आम्ही मान्य करूं.

मानवी जीवितांत जन्मघडीपासून मरणाच्या घटकेपर्यंत जे अनंत क्लेश सर्वांच्या वांट्याला येतात, त्यांची संगति आज आपल्याला लागत नाहीं, व त्यामुळें परमेश्वराच्या दयाशीलत्वाविषयीं आपण शंका घेतों. उल्कापात, जलप्रलय, महायुद्धें, भूमिकंप इत्यादि महदापदांत लाखों मानवी जीव मुंग्यासारखे चिरडले जावेत यांतील परमेश्वरी अंतिम हेतू आपल्या मतीला ओळखतां येत नाहीं, व त्यामुळें परमेश्वराच्या अमर्याद सत्तेविषयीं व करुणेविषयीं आपण साशंक होतों. परंतु एक तर ज्या गोष्टी संकुचित दृष्टि ठेवल्यामुळें आपल्याला निर्दयपणाच्या वाटतात त्याच आपण आपली दृष्टि अतिशय व्यापक केल्यास अंतीं मानवी कल्याण साधणाऱ्या आहेत असें आपल्याला ह्मणावें लागेल. धरणीकंप ही दुष्ट आपत्ति वाटते, पण साऱ्या पृथ्वीला त्राहि त्राहि करून सोडणाऱ्या एखाद्या जुलमी राष्ट्राची राजधानी त्या धरणीकंपानें गडप झाली तर त्यानें अखेर मानव जातीचें हितच होणार नाहीं काय ? मुलाला छडी मारणाऱ्या शिक्षकाला पाहून कोणी त्या शिक्षकाला निर्दय ठरविलें तर तें चुकीचें नव्हे काय ? त्या मुलाच्या आंगावर होणारे छडीचे प्रहार दुष्टपणाचे दिसतात, पण अंतीं त्या मुलाचें कल्याण त्यायोगेंच साधावयाचें

असतें हा विचार केला ह्मणजे ते प्रहार न्यायाचे व दयेचेच ह्मणणें प्राप्त होईल.

ईश्वरवाद्यांची ही हातचलाखी ठरलेली आहे, व तरुण स्त्री-पुरुषांच्या मनावर तिचा परिणाम झालेला मी नेहमीं पाहतों. परंतु वर ईश्वरवाद्यांचा जो मुद्दा मांडला आहे त्यांत खरोखरीच कांहीं तथ्य आहे काय ? पाहूं या.

ईश्वरवाद्यांच्या ह्मणण्याचें तात्पर्य असें कीं जें क्रौर्य अपरिहार्य आहे व ज्या क्रौर्यानें अंतीं उपकारच व्हावयाचा असतो तें गर्हणीय नव्हे, व यासाठीं सृष्टींत दिसणाऱ्या वैषम्याचें, अन्यायाचें व आपत्तीचें निमित्त करून परमेश्वराची दया खोटी ठरविणें बरोबर नाहीं.

यावर मी असें ह्मणतों कीं आधीं मुळीं ज्या वैषम्यांनीं व आपत्तींनीं मानवी जीविताला कडवटपणा येतो, त्यांत आमच्या मतीला दिसत नसला तरी परमेश्वराचा सद्धेतू व कृपाच आहे असें मानावयाचें, ह्मणजे अंधश्रद्धेचाच प्रश्न आला ना ? परमेश्वराचा हेतू केव्हां काय असतो तें आह्माला कळत नाहीं त्याप्रमाणेंच परमेश्वरापुढें सतत टाळ कुटीत बसणाऱ्यांना किंवा भगवद्गीतेचीं पारायणें करणाऱ्यांनाही कळत नाहीं ! आह्मांला जसा तो गूढ आणि अदृष्ट आहे तसाच तो त्यांनाही आहे ! मग जो हेतू गूढ व अदृष्ट आहे तो मनुष्याच्या हिताचा, दयाप्रेरित, करुणाकृत असणारच असा हवाला ते कसा काय देतात ? व त्यांनीं तो कितीही दिला तरी तो आह्मी काय ह्मणून ग्राह्य समजावयाचा ?

शिवाय, असें कीं आज जो अन्याय व आपत्ति अनुभवावी लागते तिनें पुढें कितीही मोठें कल्याण व्हावयाचें असलें तरी त्यामुळें आजचा शारीरिक आणि मानसिक यातनांचा अनुभव थोडाच खोटा ठरतो ? शिक्षकानें मारलेल्या छड्यामुळें मुलगा पुढें मोठा कवि व्हावयाचा असला तरी आज छडीमुळें त्याच्या तळहाताला येणाऱ्या झिणझिण्या कांहीं सुखाच्या समजतां येत नाहींत !

आणि छडी मारल्याखेरीज शिष्याच्या बुद्धींत ज्ञान घालतां येऊं नये हा तरी गुरूचा कमीपणाच नव्हे काय ? ही तरी त्याच्या सामर्थ्यांत उणीवच नव्हे काय ? छडी मारून विद्यार्थ्याला हुशार बनविणाऱ्या गुरूपेक्षां छडी न वापरतां प्रेमानें शिकवून त्याचें कल्याण साधणाऱ्या गुरूला आपण केव्हांहि अधिक मोठा समजूं त्याची सत्ता व करुणा अधिक उच्च कोटीची होय असें आपण ह्मणूं. या दृष्टीनें विचार केला म्हणजे मानव जातीला अनंत प्रकारचीं दुःखें भोगावयास लावून तद्द्वारां तिचें कल्याण साधणारा परमेश्वर – तसा त्याचा गूढ हेतू सदैव असतो असें वादासाठीं गृहीत धरलें तरी – सर्वसत्ताधीश आणि परमदयाळू ठरत नाहीं ! व तसा तो नसेल तर त्याची सतत भक्ति व उपासना करावयाची व नेहमीं त्याला शरण जावयाचें तें कशासाठीं ?

वाद इतक्या थराला आणला कीं ईश्वरवादी एक ठरीव कोलांटी घेतात. ते म्हणतात 'अहो, जें तुह्मांला आज दुःख वाटतें तें अंतिम सुखाचें साधन आहे येवढेंच नव्हे तर तें सुखच आहे. प्रियजनांचे मृत्यू, दुर्जनांनीं केलेला छळ, सज्जनांचे क्लेश , पंचमहाभूतांकडून होणारी प्राणांची व वित्ताची नासधूस हे सारे

सुखाचे व कल्याणाचेच प्रकार होत. ते पाहून आपण दुःख मानतों ते मायामोहानें आपली बुद्धि मलिन झालेली असते म्हणून !

ही कोलांटी अजब आहे खरी. पण येथेंहि असें विचारतां येईल कीं बरें बुवा सृष्टींतील दुःखेंसुद्धां दुःखें नसून सुखेंच आहेत, पण तीं वास्तविक सुखें असून मला तेवढीं दुःखासारखीं भासावींत ही योजना तरी कोणी परमेश्वरानेंच केली ना ? माझ्या बुद्धीवर मायेचें पटल यावें आणि सुखाला दुःख मानून मी टाहो फोडावा ही योजना तरी परमेश्वराचीच ना ? आणि या योजने-मुळें 'हाय हाय ! भाजलों ! पोळलों!' म्हणून मी ओरडतांना माझ्या जीवाला जे क्लेश होतात ते तरी खरेच ना ? – आणि ते तरी परमेश्वरानेंच निर्मिलेले ना ? मग हा परमेश्वराचा दुष्टपणा काय कमी निंद्य आहे ? घोंगडें पांघरून जेव्हां एखादा माणूस एखाद्या हट्टी रडक्या मुलाला गप्प करतो तेव्हां त्या करण्यानें त्या मुलाचें हित व्हावयाचें असतें हेंही खरें, आणि तें मूल ज्याला भयंकर घोंगड्याबुवा समजतें तो वस्तुतः तसा भयंकर नसतो हेंही खरें. पण घोंगड्याबुवाच्या त्या भासानें त्या मुलाच्या हृदयाला जो जबर-दस्त धक्का बसतो त्याच्या यातना व सारे हुंदके एकदम गिळून टाकून चूप होतांना होणाऱ्या यातना त्या मुलाला भोगाव्या लागतात हें तर खोटें नाहीं ? व त्याबद्दलची जबाबदारी बुवा दाखविणाऱ्या माणसाकडे राहते यांत तर शंका नाहीं ?

आणि हें जर खरें तर माणसाच्या बुध्दीवर मायेचें पटल टाकून सताला असत् आणि सुखाला दुःख मानण्याचा प्रमाद

ईश्वरानें त्याजकडून घडवावा, आणि त्याला ऊर बडवायला लावावें ही तरी परमेश्वराची निर्घृणताच नव्हे काय ?

इतक्या निकरावर वाद आणला म्हणजे ईश्वरवादी म्हणतात, 'हें मायेचें कोडें असें चुटकीसरसें सुटत नसतें, त्याला परमेश्वरावर श्रध्दा ठेवून दीर्घ तपश्चर्या करावी लागते.'

छान ! ' स्वस्कंधारोहण ' म्हणून जो न्यायदोषाचा प्रकार आहे त्याचें याहून गमतीचें उदाहरण सांपडणें मुष्कील जाईल खास ! ईश्वराचें अस्तित्व सिद्ध करायला निघायचें आणि शेवटीं म्हणायचें 'हें पहा, ईश्वर आहे असें गृहीत धरून त्याची नवविधाभक्ति जन्मोजन्म करीत रहा म्हणजे तुह्माला केव्हां तरी साक्षात्कार होईल !'

तरुण स्त्रीपुरुषांना माझें आग्रहानें सांगणें आहे कीं त्यांनीं ईश्वरभक्तीच्या रिकामटेकडया उद्योगाला आपल्या अंतःकरणांत यत्किंचितहि थारा देऊं नये. अखिल सृष्टींतील परमतत्त्व या अर्थानें ईश्वराचें अस्तित्व मानावें. परंतु अशा परमतत्त्वाची पूजाअर्चा करणें, त्याला शरण जाणें, त्यावर सर्व कर्तृत्वशक्तीचा आरोप करून स्वतःचें कर्तृत्व शून्यवत् समजणें -- हा सारा प्रकार तर्कशून्य आहे इतकेंच नव्हे तर माणसाच्या अंगची सारी पराक्रमबुध्दि नष्ट करणारा आहे. पूजेचें व अर्चेचें स्थान या नात्यानें ईश्वर मानण्याचें तरुण स्त्रीपुरुषांनीं साफ सोडून दिलें पाहिजे. अंगीं श्रध्दा यावी यासाठीं आदरस्थान हवें असेल तर आपली माता, पिता, गुरूजनांपैकीं कोणी, ऐतिहासिक विभूतीपैकीं एखादी, किंवा हयात लोकनायकांपैकीं कोणी आपल्या दृष्टीपुढें सतत ठेवल्यास काम भागेल.

ईश्वर हें नांव परमतत्त्वाला दिलें ह्मणजे त्याची पूजाअर्चा करणें हास्यास्पदच ठरेल. परमतत्त्व या अर्थी ईश्वराचें अस्तित्व मी स्वतः मानतों. परंतु ईश्वराला भक्तीनें व स्वतःच्या शरण-वृत्तीनें प्रसन्न करून घेणें, व त्याच्या कृपेच्या जादूवर विसं-बून राहणें असल्या गोष्टी वेडेपणाच्याच मानाव्या लागतात. माझ्या घरांतल्या नळाला फक्त सकाळीं तीन तास व संध्या-काळीं तीन तास पाणी यावें असा कोल्हापूर म्युनिसिपा-लिटीचा नियम आहे. हा नियम मी समजून घ्यावा व मान्य करावा हें ठीक आहे. परंतु या नियमाच्या छापील कागदाची मी अनन्य भावानें पूजाअर्चा करावी हें सांगणें किती वेडेपणाचें? तशी पूजा मी कितीही केली, व मी कितीही लोटांगणें घातलीं तरी माझ्या घरांतल्या नळाला तिहींच्याऐवजीं चार तास थोडेंच पाणी येणार आहे? आणि तसें येणार असेल तर मग तीन तासांचा तो नियम तरी काय ह्मणावयाचा? तद्वतच पूजाअर्चा करण्यानें प्रसन्न होणारा खुशामतप्रिय ईश्वर असेल तर त्याला ईश्वर कां ह्मणावयाचें?

सारांश, ईश्वराचीं स्तुतिस्तोत्रें गावयास, त्याला शरण जावयास, व साऱ्या कर्तृत्वाचा मक्ता त्याच्याकडे द्यावयास शिकविणारा ईश्वरवाद तरुण स्त्रीपुरुषांनीं सर्वस्वीं त्याज्य समजावा. आपल्या हातून घडणाऱ्या बऱ्यावाईट गोष्टींचा धनीपणा आपल्याकडे घेण्यांत लाज कसली? आपल्या सुखदुःखाचे कर्ते आपणच आहोंत असें समजण्यास संकोच कां? नाहीं तरी सदाचारानें वागूनही हाल सोसावे लागले म्हणजे ईश्वरभक्तीचा वेदांत म्हणा-वयास तयारच असतो कीं ही तुमच्या कर्माचीं फळें आहेत.

तीं तुह्माला भोगायलाच हवींत ! ह्मणजे जें चांगलें होईल तेवढ्याचें कर्तृत्व ईश्वराकडे, व तेवढयाचें श्रेय ईश्वराच्या करुणामयत्वाला; आणि जें वाईट घडेल त्याचें कर्तृत्व माणसाकडे व तें निस्तरण्याची कामगिरीही माणसाकडेच ! असा दोन डगरीवर हात ठेवणारा ईश्वरवाद कशासाठीं उराशीं बाळगायचा ?

त्यापेक्षां धीटपणें ईश्वरोपासनेचा भेकड मंत्र पार टाकून देऊन सारें कर्तृत्व व भोक्तृत्व स्वतःकडे घेण्यास तरुण स्त्रीपुरुष शिकले तर त्यांच्या मनाला प्रामाणिकपणाचा व सरळपणाचा जोर तरी येईल व समाजाचा व राष्ट्राचा अभ्युदय आपण घडवून आणूं असा आत्मविश्वास व निश्चय त्यांच्या अंगीं वाढत्या प्रमाणांत दिसेल !

REFBK-0004348

प्रो० ना. सी फडके, एम्. ए. कृत

# प्रतिभा साधन

श्रीयुत बाबूराव पेंटर यांनीं मुद्दाम काढलेल्या चित्राचें तीन रंगी कव्हर, कापडी बांधणी, सुबक छपाई, अगदीं नव्या तऱ्हेचा आकार. **किं. २ रु.** टपालखर्च वेगळा.


ग्रंथकर्त्यांची सही पुष्कळ ग्राहक मागतात. अशा सहीच्या प्रतीस १ रु. जादा आकार पडेल. तरी ज्यांस सही असलेली प्रत हवी असेल त्यांनीं मागणी करतांना तसें कळवावें.

**प्रत्येक रसिकानें अवश्य संग्रहीं ठेवावा**
**प्रत्येक जिज्ञासूनें आवडीनें वाचावा, व**
**प्रत्येक लेखकानें मननपूर्वक अभ्यासावा**

असा, लेखनकलेविषयींचा मराठींतील पहिला अपूर्व ग्रंथ होय. यांत—

प्रतिभा ही ईश्वरी देणगी आहे काय? ती अंगीं यावयास कांहीं प्रयत्न करतां येईल काय? तिच्यावर परिश्रमाचे संस्कार कसे करावे? इत्यादि मानसशास्त्र-विषयक सुंदर व सुबोध विवेचन असून शिवाय कादंबरी, नाटक, लघुकथा इत्यादींच्या तंत्राविषयीं संपूर्ण आणि मार्गदर्शक चर्चाहि केलेली आहे.

**पत्ता—हंस-प्रकाशन संस्था, कोल्हापूर.**




# आकर्षक जाहिराती

चित्रांशिवाय जाहिराती वाचकांचें लक्ष वेधूं शकत नाहींत हें सर्वमान्य आहे. आपली जाहिरात चित्रांच्या साह्यानें अधिक परिणामकारक कशी करावी असा तुह्मांस प्रश्न पडला असेल तर आमची मदत घ्या. आमचकडे जाहिरातीच्या उपयोगाचे अनेक लहान मोठे ब्लॉक मिळूं शकतात. सचित्र क्याटलाग फुकट.

**किर्लोस्कर आर्ट डिपार्टमेंट**

**किर्लोस्करवाडी.**

# प्रो. फडकेकृत

# पुस्तकें

## चरित्रें

१. दादाभाई नौरोजी
१. टेरेन्स मॅक्स्विनी
३. डी व्हॅलेरा

## कादंबऱ्या

१. अल्ला हो अकबर
२. कुलाब्याची दांडी
३. जादूगार
४. दौलत
५. अटकेपार

## प्रबंध

१. मानसोपचार
२. मानसोन्नति
३. संततिनियमन
४. आजचे तरुण स्त्री-पुरुष व त्यांजपुढील प्रश्न
५. सुखाचे संसार
६. प्रतिभा-साधन

## नाटक


१. युगान्तर

## इंग्रजी

1. Sex Problem in India
2. Psychology
3. Elements of Ethics
4. Manual of Logic


# तुमच्या घरांत

सोय, शिस्त, स्वच्छता
व टापटीप
राखण्याकरतां



## किर्लोस्कर फर्निचरच

उपयोगांत
आणा.



घराच्या शोभेंतही भर घालेल. सुंदर, मजबूत व माफक आहे.
सविस्तर माहिती मागवाः—

**किर्लोस्कर बंधु, लिमिटेड,**
**किर्लोस्करवाडी** (जि. सातारा)

# Kirloskar

खालील वस्तूंपैकीं आपणांस कोणत्या पाहिजेत

**नांगर, चरक, शेंगायंत्रें, कडबा यंत्रें,**

**मोटा, मोटेचीं चाकें, बैलरहाट, पंप्स,**

**कुळव, मका यंत्रें, कठडे, ब्रॅकेट्स्,**

**बांक, खुर्च्या, स्टुलें, पलंग,**

**कॉट्स्, शेल्फ, कोच, पाळणे.**

**इ० इ०**

—: सविस्तर माहितीचा कॅटलॉग मागवा :—

## किर्लोस्कर बंधु, लिमिटेड,

**किर्लोस्करवाडी, (जि. सातारा.)**